
# लोकराज्य

मे २०१५ / पाने ६० / किंमत ₹१०



# मुद्रा अभिमानाची




महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ऐतिहासिक दिवस १ मे १९६० अर्थात वैशाख १९, १८८२ साजरा करण्यासाठी राज्य स्थापना महोत्सव समितीने महाराष्ट्र राज्य महोत्सव मुद्रा जारी केली. सोने, चांदी आणि निकेल ह्या तीन धातूंमध्ये घडवण्यात आलेल्या या मुद्रेमध्ये लामण दिव्याची प्रतिमा आणि शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक प्रसंगीच्या राजमुद्रेतील संस्कृत पंक्ती उद्धृत करण्यात आली आहे. राज्य स्थापनेचा महोत्सव साजरा करण्यासाठी केंद्रशासनाने टपाल खात्यामार्फत एक विशेष शिक्काही जारी केला. मुंबईत आलेल्या तसेच मुंबईतून बाहेर पाठविलेल्या प्रत्येक पत्रावर त्याचे शिक्कामोर्तबही लागलीच होऊ लागले.

(राज्याच्या मुहूर्तमेढीचे साक्षीदार असलेल्या एम. आर. आचरेकर यांनी त्यानिमित्त झालेल्या विविध उत्सव आणि कार्यक्रमांना आपल्या रेखाचित्रांमधून मूर्तस्वरूप दिले. या रेखाचित्रांपैकीच हे एक रेखाचित्र.)

वर्ष ६६ वे | अंक ११ | मे २०१५

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

## संपादन

- अतिथी संपादक मनीषा पाटणकर-म्हैसकर
- मुख्य संपादक चंद्रशेखर ओक
- प्रबंध संपादक देवेंद्र भुजबळ
- संपादक सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक प्रवीण टाके
- उपसंपादक प्रवीण कुलकर्णी, राजाराम देवकर

## प्रशासन

- प्रशासन व वितरण अधिकारी दिगंबर पालवे
- वितरण अधिकारी विलास बोडके
- साहाय्य विद्या कदम, नितीन कुटे

## मांडणी

- मुखपृष्ठ सीमा रनाळकर
- मांडणी, सजावट शैलेश कदम
- मुद्रण एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
**email :** lokrajya2011@gmail.com

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
वितरण - ०२२-२२८१८३१२
**email :** lokrajyavitaran@gmail.com
lokvitaran@dgipr.maharashtra.gov.in

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

# अंतरंग


## ६ आपला अभिमान, आपला महाराष्ट्र



१ मे च्या महाराष्ट्र दिनाच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या सद्य:स्थितीविषयी आणि आगामी योजनांविषयी ज्येष्ठ पत्रकार अभय मोकाशी यांनी घेतलेली महामहीम राज्यपाल सी. विद्यासागर राव यांची विशेष मुलाखत..

## ८ माझा महाराष्ट्र माझे स्वप्न



भविष्यातील समृद्ध आणि समर्थ महाराष्ट्राची जडणघडण करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही स्वप्न पाहिली आहेत. महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने या स्वप्नांबद्दल त्यांचे मुक्त चिंतन...

## १२ जर्मनीत महाराष्ट्राचा ठसा

जर्मन उद्योजकांसाठी महाराष्ट्र गुंतवणुकीसाठी चांगले माध्यम ठरू शकते. या अनुषंगाने वातावरण निर्मितीकरिता मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस आणि उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्या नेतृत्वाखालील राज्याच्या शिष्टमंडळाने नुकतीच जर्मनीला भेट दिली.

## १५ महाराष्ट्राच्या शेतीला इस्रायलची मदत

इस्रायलमध्ये आयोजित जागतिक पातळीवरील ॲग्रीटेक या कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इस्रायलचे कृषिमंत्री यायीर शमीर यांच्या हस्ते संयुक्तरीत्या करण्यात आले. या प्रदर्शनाच्या उद्घाटनाचा मान महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना देऊन संयोजकांनी महाराष्ट्राचाच गौरव केला.

## १८ राष्ट्र निर्माणाचे नवे पर्व



केंद्र सरकारला २५ मे रोजी एक वर्ष पूर्ण होत असून या सरकारच्या एक वर्षातील कारभाराविषयी आणि महाराष्ट्राला केंद्राकडून मिळालेल्या सहकार्याविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

## २४ सामाजिक न्यायाची नवी दिशा



समाजातील वंचित आणि दुर्लक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य सरकारच्या अनेक योजना प्रभावीपणे राबवण्याचा संकल्प सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले यांनी केला आहे.

## २८ गतिमान तयारी सुयोग्य नियोजन



येत्या जुलै महिन्यात देवभूमी नाशिक येथे हजारो साधुंच्या उपस्थितीत सिंहस्थ कुंभमेळा भरणार आहे. यात कुठलीही कमतरता राहू नये, म्हणून जिल्ह्याचे पालकमंत्री आणि राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन या कामांवर सातत्याने लक्ष ठेवून आहेत. या कामांचा ते नियमित आढावा घेत आहेत.

## याशिवाय


- शेंद्रा-बिडकीन, नव्या वळणावर...
- शिवशाहिरांचा सन्मान
- हवामानाचं चाललंय तरी काय?
- मला आणा कोल्हापुरी साज...
- महाराष्ट्रातील गडकिल्ले
- दिल्लीतील महाराष्ट्र
- **भ्रमंती:** नवा ऋतू.. नवा पन्हाळा
- आणि नियमित सदरे...

## सप्रेम नमस्कार

### महामानवाला आदरांजली

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त लोकराज्यच्या एप्रिलच्या अंकात समाविष्ट करण्यात आलेले लेख खूप वाचनीय होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अनेक पैलूंवर यामुळे प्रकाश पडला आहे. जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीची घटना निर्माण करण्याचे काम डॉ. आंबेडकरांनी केले आहे. त्याचबरोबर दलित आणि शोषित समाजाला जगण्याचे आत्मभान मिळवून देण्याचे मोठे कार्य त्यांनी केले आहे. त्यांच्या या कार्याला सलाम. 'लोकराज्य'ने डॉ. आंबेडकरांचे मुखपृष्ठावर वापरलेले छायाचित्र अप्रतिम.

**– जीवन कांबळे, कोल्हापूर**










### दर्जेदार

लोकराज्यचे सर्वच अंक वाचनीय असतात. मार्चचा अंकही वाचनीय आणि दर्जेदार आहे. अनेक शासकीय योजनांची माहिती लोकराज्यमधून मिळते. त्याबरोबरच निरामय या सदरामुळे आरोग्याची काळजी कशी घ्यायची याचीही माहिती मिळते.

**– नितीन कापरे, खामगाव**

### प्रेरणादायी अंक

फेब्रुवारी २०१५ चा 'लोकराज्य' चा अंक वाचून अतीव आनंद झाला. समाजाभिमुख आणि तरुणांना एका नव्या औद्योगिक जगताकडे नेणारा महत्त्वपूर्ण घटकांचा आलेख अंकात मांडण्यात आला आहे. लोकराज्यचा अंक नेहमीप्रमाणे प्रेरणादायी आहे.

**– प्रा. विनोद मेश्राम, भंडारा**

### व्यसन सोडा, आरोग्य जपा

राज्याचे कामगार व गृहनिर्माण मंत्री प्रकाश मेहता यांनी आर. आर. पाटील अर्थात आबा यांच्या शोकसभेत तंबाखूचे व्यसन सोडण्याचा संकल्प केला हे निश्चितच स्वागतार्ह आहे. पुढच्यास ठेच मागचा शहाणा या उक्तीप्रमाणे तरुणांनी प्रकाश मेहता यांचे अनुकरण करावे.

**– प्रदीप जोशी, अलिबाग**

### भ्रमंती – प्रत्यक्ष भेटीचा आनंद

लोकराज्यमधून सुरू झालेले भ्रमंती सदर खूप वाचनीय आहे. या सदरामुळे महाराष्ट्रातील पर्यटन स्थळाला प्रत्यक्ष भेट दिल्यासारखे वाटते. अनेकदा आपल्या शेजारी असलेल्या पर्यटनस्थळांविषयीही माहिती नसल्याने जाता येत नाही. लोकराज्यच्या या सदरामुळे मात्र महाराष्ट्रातील पर्यटनस्थळांची माहिती होत आहे.

**– लक्ष्मीकांत चांडक, शेगाव**

### उपयुक्त प्रेरणा


लोकराज्यच्या अंकात यशस्वी आयएएस अधिकाऱ्यांचे लेख विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहेत. या अधिकाऱ्यांनी दिलेल्या यशाच्या फॉर्म्युल्यानुसार अभ्यास केला तर यश निश्चित मिळणार आहे. 'लोकराज्य' मधील सर्वच सदरे वाचनीय असतात. मात्र प्रेरणा हे सदर सर्वात जास्त उपयोगी आहे.

**– हरिश जीवन कल्याणकर, मोठी उमरी, अकोला**

### वाचनीय अंक


'लोकराज्य' चा फेब्रुवारीचा अंक खूप छान झाला आहे. चंद्रपूर जिल्ह्यात दारूबंदीचा निर्णय हा ऐतिहासिक निर्णय आहे. याबद्दल मी राज्याचे वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे विशेष आभार मानतो. लोकराज्यचे सर्वच अंक वाचनीय असतात.

**– जयकिशन लोखंडे, वसमत**










### प्रतिक्रियांचे स्वागत

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आम्हाला हव्या आहेत.

**पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई–४०० ०३२**

## वार्षिक वर्गणी

**वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई–४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)**

लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी http://dgipr.maharashtra.gov.in

* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

अतिथी संपादकीय



# आपला महाराष्ट्र

महाराष्ट्राची स्थापना १ मे १९६० रोजी झाली. त्यानंतर गेल्या ५५ वर्षात महाराष्ट्राने आर्थिक, सामाजिक, औद्योगिक, शैक्षणिक आणि इतर क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती करून देशात क्रमांक एकचे स्थान प्राप्त केले आहे. ही बाब आपणा सर्वांसाठी अभिमानाची आणि आनंदाची ठरते.

महाराष्ट्राच्या या गौरवशाली परंपरेची महती सांगणारी मा. राज्यपाल सी. विद्यासागर राव यांची विशेष मुलाखत या अंकात आम्ही समाविष्ट केली आहे. विविध क्षेत्रात क्रमांक एकवर असलेल्या महाराष्ट्राला आणखी सक्षम आणि समृद्ध करण्यासाठी आपण नेमके काय करणार आहोत, याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेले चिंतन आम्ही या अंकात घेतले आहे.

गुंतवणूक आणि आर्थिक विकासातील महाराष्ट्राचे स्थान यापुढे कायम राहून त्यात भर पडावी यासाठी **'मेक इन महाराष्ट्र'** हा उपक्रम राबवला जात आहे. त्याच आनुषंगाने मुख्यमंत्र्यांनी जर्मनीतील हॅनोवर आणि इस्त्रायल येथे जाऊन महाराष्ट्राचे ब्रँडिंग करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. या दोन्ही देशांनी महाराष्ट्रात अधिकाधिक गुंतवणूक करण्यात आणि उद्योग उभारण्यात स्वारस्य दाखवले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला या महिन्यात एक वर्ष पूर्ण होत आहे. हे वर्ष नव्या आत्मभानाचे आणि आत्मविश्वासाचे ठरले आहे. महाराष्ट्राची प्रगती आणि विकासासाठी आवश्यक असणाऱ्या अनेक प्रकल्पांना या कालावधीत मंजुरी मिळाली, काही प्रकल्पांना मान्यता मिळाली, काही प्रकल्पांमधील पर्यावरण आणि प्रदूषणाचे अडथळे दूर झाले. हा महाराष्ट्रासाठी शुभसंकेतच समजला पाहिजे.

**'लोकराज्य'चा** अंक अधिकाधिक माहितीपूर्ण, वाचनीय करण्याकडे आम्ही आवर्जून लक्ष देत असतो. वाचकांनी बहुश्रुत व्हावे यासाठी **प्रेरणा, निरामय, श्रमंती, दिल्लीतील महाराष्ट्र, महाराष्ट्रातील गड-किल्ले, एक दिवस मंत्र्यांसोबत** या सदरांसोबत या अंकापासून आम्ही **'संस्कृती'** हे नवे सदर सुरू करत आहोत. महाराष्ट्राच्या विविध वैभवशाली परंपरांची माहिती त्यात दिली जाईल. इतर सदरांप्रमाणेच हे सदर वाचकांच्या पसंतीस उतरेल असा विश्वास आहे.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्वाची महती सांगणाऱ्या विशेष लेखांचा समावेश असलेल्या एप्रिल लोकराज्यच्या अंकाचे प्रकाशन गेट वे ऑफ इंडिया येथे सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले यांच्या हस्ते झाले. हा अंक सर्वांना खूप आवडल्याच्या प्रतिक्रिया प्राप्त झाल्या आहेत. **महाराष्ट्र अहेड, उर्दू लोकराज्य, महान्यूज, दिलखुलास, जय महाराष्ट्र** या आमच्या माध्यमांना मिळणारा प्रतिसाद उत्साहवर्धक म्हणूनच मनाला उभारी देणारा आहे.

हा अंक आमच्या वाचकांना नेहमीसारखाच आवडेल अशी आशा आहे.

**मनीषा पाटणकर-म्हैसकर**
सचिव
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)

# आपला अभिमान आपला महाराष्ट्र



राज्यपाल सी. विद्यासागर राव यांची मुलाखत घेताना ज्येष्ठ पत्रकार अभय मोकाशी

**राज्यातील युवकांवर माझा दृढ विश्वास आहे. ते राज्यात खूप काही करु शकतात. कौशल्य विकासाचा मोठा उपक्रम केंद्र व राज्य शासनाकडून राबवण्यात येत आहे. याशिवाय युवकांचा सहभाग वाढवण्यासाठी राज्य शासन अग्रेसर आहे. राज्यातील घटती महिलांची संख्या मला चिंतेची वाटते, तर दुसरीकदे आनंद होतो की आदिवासींमध्ये दर हजार पुरुषांमागे महिलांची संख्या अधिक आहे, मात्र सुशिक्षित लोकांमध्ये स्त्रियांची संख्या घटत आहे, ही चिंतेची बाब आहे.**

**१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्यानंतर अनेक क्षेत्रात महाराष्ट्राची घोडदौड सुरू झाली. महाराष्ट्राने गेल्या ५५ वर्षांत केलेली प्रगती विस्मयकारक असली तरी अनेक क्षेत्रात अजून बरेच काम बाकी आहे. विशेषत: शेती टिकण्यासाठी आणि शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळण्यासाठी राज्य सरकारने ठोस पावले उचलली आहेत. १ मे च्या महाराष्ट्र दिनाच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या सद्य:स्थितीविषयी आणि आगामी योजनांविषयी ज्येष्ठ पत्रकार अभय मोकाशी यांनी घेतलेली महामहीम राज्यपाल सी. विद्यासागर राव यांची विशेष मुलाखत..**

**महाराष्ट्र दिनाकडे आपण कसे पाहता?**

महाराष्ट्राचे भाग्य आहे की या भूमीवर अनेक थोर व्यक्तींनी जन्म घेतला. यात संत, समाजसुधारक, महान योध्ये तसेच थोर महिलांचा समावेश आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, गाडगेबाबा, तुकडोजी महाराज अशा थोर संतांची ही जन्मभूमी आहे, तसेच जोतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचीही भूमी आहे. आंध्रप्रदेश व तेलंगणा या राज्यातील अनेक लोकांना जोतीबा फुलेंबद्दल काही वर्षांपूर्वी फार कमी माहिती होती, पण आता या दोन्ही राज्यांमध्ये अनेक ठिकाणी या थोर व्यक्तींचे पुतळे दिसतात.

**राज्यात सिंचनाची परिस्थिती कशी आहे?**

या राज्यात सिंचनाचे फार महत्त्व आहे. कारण अनेक लोक आपल्या उदरनिर्वाहाकरिता शेतीवर अवलंबून आहेत,मात्र सिंचनाच्या बाबतीत राज्यातील विविध विभागांमध्ये प्रचंड असमतोल दिसून येतो. या असमतोलावर तातडीने उपाय करणे अत्यंत गरजेचे आहे. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी मी समाजातील विविध घटकांशी आणि सिंचनतज्ज्ञांशी अनेकदा चर्चा केली आहे. यातून असा निष्कर्ष निघाला की, मोठी धरणे बांधण्यापेक्षा चेक- डॅम्स बांधली तर ते कमी खर्चाचे होईल. अशा धरणांचे पर्यावरणावर विपरीत परिणाम होणार नाहीत आणि म्हणूनच ते अत्यंत उपयुक्त ठरेल. मराठवाड्याचेच उदाहरण घेतले तर तेथे असे अनेक चेक-डॅम्स बांधले तर तेथे सिंचनाची मोठ्या प्रमाणात व्यवस्था होईल. मला खात्री आहे जर स्थानिक लोकांना अशा प्रकल्पांबाबत सविस्तर माहिती दिली तर ते या प्रकल्पांमध्ये आपणहून सहभागी होतील.

**राज्यातील आदिवासींची अवस्था कशी आहे?**

माझ्या सूचनेवरून राज्य अर्थसंकल्पातील आदिवासी उपयोजनेतील तरतुदींपैकी पाच टक्के निधी थेट ग्रामपंचायतींकडे देण्यात येत आहे, ज्यामुळे ग्रामसभा या निधीतून गावातील आदिवासींकरिता पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करू शकतील. अर्थसंकल्पातील रु १६ हजार कोटीच्या पाच टक्के म्हणजे थोडी-थोडकी रक्कम नव्हे.

पेसा (पंचायत अनुसूचित क्षेत्र विस्तार अधिनियम १९९६) हा कायदा १९९६ मध्ये पारित झाला. मात्र १८ वर्षांनंतरही त्याचे नियम



**संत गाडगेबाबांच्या कार्याने तसेच त्यांच्या स्वच्छता अभियानाने मी फारच प्रभावित झालो आहे आणि म्हणूनच मी अलीकडे त्यांच्या छोट्याशा चरित्राचा तेलुगूमध्ये अनुवाद केला असून तो लवकरच प्रकाशित होईल.**

तयार करण्यात आले नव्हते. राज्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर मी बैठका घेतल्या आणि पेसांतर्गत (पंचायत विस्तार (अनुसूचित क्षेत्र) अधिनियम) ग्रामसभांना देण्यात येणाऱ्या २९ अधिकारांपैकी राज्यातील ग्रामसभांना किती अधिकार देण्यात आले आहेत याची चौकशी केली, तेव्हा मला सांगण्यात आले की अगदी मोजकेच अधिकार ग्रामसभांना हस्तांतरित करण्यात आले आहेत. ग्रामसभांना स्वराज्य मिळावे आणि त्या स्वावलंबी व्हाव्यात, ही माझी तीव्र इच्छा आहे. वनउत्पादनांचा वापर करणे हा ग्रामसभांचा अधिकार आहे आणि म्हणूनच तेंदूपत्ता, बांबू व गावतळ्यातील मासे वापराचे अधिकार ग्रामसभांना देण्यात आले आहेत, याचा फायदा आदिवासींना मोठ्या प्रमाणात झाला आहे. कारण अनेक आदिवासी आपल्या उत्पन्नाकरिता तेंदुपत्ता व इतर गौण वनसंपत्तीवर अवलंबून असतात.



**राज्यात पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी काय करणे गरजेचे आहे?**

मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहे आणि तिचे स्थान तसेच अबाधित राहील. मुंबईमध्ये अनेक पर्यटन स्थळे आहेत. पर्यटक मोठ्या प्रमाणात चैत्यभूमीला भेट देतात. इंदू मिल येथे उभारण्यात येत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाची जपानी लोक उत्सुकतेने वाट पाहत आहेत. मुंबईमध्ये बौद्ध गुंफा आहेत तसेच लवकरच समुद्रात शिवाजी महाराजांचे स्मारक होणार आहे. हे एक आकर्षक पर्यटन स्थळ ठरेल. कामठी (नागपूर) येथील ड्रॅगन पॅलेस टेम्पल येथे जपान, श्रीलंका, थायलंड, म्यानमार, इंग्लंड, अमेरिका तसेच इतर देशांमधून पर्यटक मोठ्या प्रमाणात येतात. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी महाराष्ट्रामध्ये अनेक स्थळे आहेत, त्यामध्ये किल्ले समुद्रकिनारे आणि वने आहेत.

महाराष्ट्राला ७२० कि.मी.चा समुद्रकिनारा लाभला आहे आणि याचा पर्यटनस्थळ म्हणून विकास करण्याची क्षमता आहे. गोदावरी नदीवरून नाशिक ते नांदेड जल वाहतूक सुरू करण्याचा प्रस्ताव आला आहे व या प्रस्तावावर अभ्यास चालू आहे. नाशिक आणि नांदेड दोन्ही शहरांना धार्मिक महत्त्व आहे. या दोन शहरांना जोडणारी जल वाहतूक सुरू झाली तर लोकांना मोठ्या प्रमाणात त्याचा लाभ होईल. या मार्गावर आणखी एक पर्यटन स्थळ लागते ते म्हणजे औरंगाबाद. अनेक विदेशी पर्यटक औरंगाबाद येथूनच पुढे अजंठा-एलोराला जात असतात. जल वाहतुकीमुळे पर्यटनाला चालना मिळेलच, परंतु प्रवाहाच्या दोन्ही बाजूच्या लोकांना त्याचा फायदा होईल.

**स्वच्छ महाराष्ट्र अभियान कसे चालले आहे?**

पंतप्रधानांच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छ महाराष्ट्र कार्यक्रमही राबवला जात आहे. मुंबई येथील जे. जे. रुग्णालयात स्वच्छ महाराष्ट्र अभियान राबवण्यात आले होते. त्या कार्यक्रमानंतर जे. जे. रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. तात्याराव लहाने यांनी माझ्या निदर्शनास आणले की, अधिक रुग्णांवर उपाय करण्यासाठी नवीन इमारत बांधण्याचा प्रस्ताव हेरिटेज कमिटीच्या ना हरकत परवान्याअभावी अडकून आहे. यावर मी संबधितांशी चर्चा केली व लगेचच आवश्यक त्या मान्यता देऊन रुग्णालय विस्ताराचा मार्ग खुला झाला. स्वच्छ महाराष्ट्र अभियानाबद्दल बोलताना मला सिनेकलाकार मकरंद अनासपुरे यांचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. त्यांनी अहमदनगर जिल्ह्यातील गोगलगाव येथे तीन आठवड्यांपेक्षा अधिक काळ ग्रामस्थांबरोबर घालवून गाव स्वच्छ केले आणि जनतेसमोर एक आदर्श मांडला. अशा कार्यक्रमांमध्ये जनतेचा सहभाग अति-महत्त्वाचा आहे आणि जनता साथही देते. मुळातच फार वर्षापूर्वी संत गाडगेबाबांनी महाराष्ट्रासमोर स्वच्छतेचा संदेश व आदर्श ठेवला आहे. ❐❐

# माझा महाराष्ट्र माझे स्वप्न



**भविष्यातील समृद्ध आणि समर्थ महाराष्ट्राची जडणघडण करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही स्वप्ने पाहिली आहेत. महाराष्ट्र दिनाच्या निमित्त या स्वप्नांबद्दल त्यांचे मुक्त चिंतन...**

आज ज्यावेळी महाराष्ट्रासंदर्भातील मी माझी संकल्पना ठेवण्याचा प्रयत्न करतो, त्यावेळी मला मार्टिन ल्यूथर किंग यांच्या शब्दांची आठवण येते. I have dream. त्यांनी ज्याप्रकारे अमेरिकेबाबत स्वप्न बाळगले होते. त्याचप्रमाणे आपण सर्वांनी भविष्यातील महाराष्ट्र कसा असावा याचे स्वप्न बाळगले आहे. तसेच स्वप्न मीही बाळगले आहे.

निवडणुकीपूर्वी मी व्हिजन डॉक्युमेंट मांडले होते. मला सांगण्यास आनंद होतो की विरोधी पक्षात असताना जी मते मांडली, जी स्वप्ने मांडली ती सत्तेत आल्यावर पूर्ण करण्यास आम्ही सुरुवात केली आहे. आज महाराष्ट्रातील सकल उत्पादनातील शेतीक्षेत्राचा वाटा अवघा दहा टक्के आहे त्यावर रोजगारासाठी अवलंबून असणाऱ्यांची संख्या ५० टक्के आहे. याचाच अर्थ शेतीवर अवलंबून असणाऱ्या महाराष्ट्रात आणि उर्वरित महाराष्ट्रात मोठी विषमता आहे आणि ही विषमता मोठे आव्हान आहे. अन्य क्षेत्रात रोजगाराच्या संधी न मिळाल्याने किंवा अन्य क्षेत्राला आवश्यक असलेले कौशल्य नसल्याने शेतीवरील अवलंबित्व वाढले आहे.

एकीकडे महाराष्ट्राच्या जीडीपीची वाढ आठ, नऊ, दहा टक्क्याने होत असताना शेतीची वाढ मात्र ऋण प्रमाणात होत आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे महाराष्ट्रात सिंचनाचा असलेला अभाव आणि अवर्षणग्रस्त प्रदेश. महाराष्ट्रामध्ये सिंचनासाठी ज्याला आपण फ्लो इरिगेशन म्हणतो त्याला मर्यादा आहेत. अगदी ४० ते ५० टक्क्यापर्यंतच आपण इरिगेशन करू शकतो. त्यामुळे ५० ते ६० टक्के क्षेत्र कोरडवाहूच राहील अशी स्थिती आहे. गेल्या काही वर्षात हजारो कोटी रुपये खर्च करूनही अवघे १७ टक्के जमीन सिंचनाखाली आणता आली. त्यातच जी कोरडवाहू शेती आहे त्यात खरिपाच्या प्रमाणात अवघे २५ टक्केच रब्बी पीक घेतले जाते. देशातील मोठ्या धरणांपैकी ४० टक्के मोठी धरणे महाराष्ट्रात आहेत. परंतु त्यांच्या काही मर्यादा आहेत. त्यामुळे आता सिंचनासाठी वेगळा विचार करणे आवश्यक आहे.

त्यामुळे इथून पुढच्या काळात जलयुक्त शिवाराशिवाय पर्याय नाही. जलसंधारणाच्या सध्याच्या १४ योजना एकत्रित करून जिल्हाधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली त्याचे नियोजन केले जाईल. दरवर्षी पाच हजार गावे जलयुक्त करण्याचे सरकारचे उद्दीष्ट आहे. ही योजना पाणलोट क्षेत्राचा विचार करून केली आहे. या प्रकारचे उपचार करून महाराष्ट्रातील वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या पॅटर्नचा उपयोग करण्यात आला आहे. सगळीकडे सगळे पॅटर्न

चालत नाहीत. त्यामुळे प्रत्येक गावाने आपला पॅटर्न तयार करावा आणि तो राबवावा. सरकार प्रत्येक ठिकाणी मदत करेलच पण लोकसहभागातून ही कामे व्हावीत. या कामासाठी जिथे कंत्राटदारांची गरज आहे तिथे ती त्याला दिली जातील. मात्र ग्रामसभेने कामे मंजूर केली तरच त्याचे बिल दिले जाईल. यंदा ६ हजार गावात ही योजना राबवण्यास सुरुवात झाली आहे. त्यातील २५०० गावात कामे सुरूही झाली आहेत. गावे जलयुक्त होणे महत्त्वाचे, त्यामुळे हे काम करत असताना जुन्या योजना कार्यान्वित करण्यावरही भर देण्यात आला आहे. कारण जुना एखादा पाझर तलाव दुरूस्त करायचा असेल तर ते करणे सोपे आहे. यासाठी काही कार्पोरेट कंपन्यांचाही सक्रिय सहभाग घेतला जाईल. या विकेंद्रित जलसाठ्यातून शेतकरी समृद्ध होईल. शेतकरी बहुपिकांकडे वळेल. आज शेतकऱ्यांची दुरवस्था ही केवळ एकाच पिकावर अवलंबून राहिल्यामुळे झाली आहे. ती बदलण्याची गरज आहे. शेती शाश्वत होण्यासाठी शेतकऱ्यांना शाश्वत वीज मिळायला हवी. त्यासाठी सौर कृषी वीज पंप देणे आवश्यक आहे. यामुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळेलच त्याचबरोबर राज्यशासनाचा दीर्घ मुदतीचा फायदा होईल. हे काम असताना कृषिमूल्याचा प्रश्न आहे. शेतीमालात रास्त भाव मिळत नाही. त्यासाठी कृषी प्रक्रिया उद्योगाकडे वळणे आवश्यक आहे. मध्यंतरी मी दाव्होसला गेलो होतो. तेथे वर्ल्ड इकॉनॉकिम फोरममध्ये चर्चा झाली त्यानुसार व्हल्यू चेन (मूल्य साखळी) करण्यासाठी राज्यशासनाने पुढाकार घेतला आहे. कृषी प्रक्रिया उद्योग करणाऱ्यांनीच शेतकऱ्यांना बी-बियाणे पुरवावे आणि उचित भावाने खरेदी करावे. आता ५ लाख शेतकरी या साखळीमध्ये आले आहेत, ते २५ लाख करण्याचे उद्दिष्ट आहे. शेतीत मूलभूत गुंतवणूक आवश्यक आहे. त्यासाठी नाबार्डसह इतर बँकासोबत बैठक झाली. त्यात त्यांना सांगितले की मूलभूत गुंतवणुकीसाठी पतपुरवठा करा. सध्या आपण ८ लाख कोटी रूपये पीक कर्जासाठी देतो. त्यातील २५ टक्के रक्कम शेती विकासावर खर्च करता येईल का याकडे राज्य शासनाचे लक्ष आहे. मी पहिल्यांदा म्हटल्याप्रमाणे ५० टक्के लोकांचा रोजगार शेतीवर अवलंबून आहे तो ३५ टक्क्यांवर आणणे आवश्यक आहे. उर्वरित १५ टक्क्यांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. त्यासाठी कौशल्य आधारित शिक्षण उपलब्ध दिले पाहिजे. जगातील सर्वात तरूण देश म्हणून भारताकडे बघितले जाते. पण या तरुणांच्या हाताला काम मिळवून दिले पाहिजे. त्यासाठी पंतप्रधानांनी 'मेक इन इंडिया' चा नारा दिला. त्याचप्रमाणे आम्ही 'मेक इन महाराष्ट्रा'चा नारा दिला. आता लोक भारताकडे आणि त्यातही महाराष्ट्राकडे आशेने बघत आहेत. बॉशसारखी कंपनी २५ आयटीआय चालविण्यास घेणार आहे. त्यातून जे विद्यार्थी शिकतील त्यांना नोकरीची संधीही उपलब्ध करून देणार आहोत.

सध्या महाराष्ट्रात इतर राज्यांच्या तुलनेत वीज महाग आहे. त्यामुळे उद्योग इथे येण्यास नाखूश असतात. मात्र आगामी काळात औद्योगिक वीज एक ते दीड रुपयांनी स्वस्त करण्याचा आमचा प्रयत्न आहे. उद्योग टिकले, वाढले तरच राज्याची प्रगती होईल. हे करत असताना घरगुती वापराची वीजही स्वस्त झाली पाहिजे. किमान स्थिर राहिली पाहिजे, यासाठी आमचा प्रयत्न राहणार आहे. हे करत असताना राज्यातील कारभार चांगला आणि पारदर्शक होण्यासाठी सेवा हमी कायदा आणला जाणार आहे. या कायद्याद्वारे नागरिकांना आपली सेवा मिळण्याचा मूलभूत अधिकार मिळेल. राज्यातील शिक्षण सम्राटांना चाप बसावा यासाठी शुल्क नियंत्रण कायद्याची अंमलबजावणी केली जाईल. त्यामुळे मनमानी शुल्काला आळा बसेल. हे राज्य जनतेचे आहे. जनतेने जो विश्वास आमच्यावर दाखवला आहे त्याची जपणूक होईल. राज्याचा विकास करण्यासाठी आमचे सरकार कटिबद्ध आहे. ❐❐

**(१४० वर्षांची परंपरा असलेल्या पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'माझ्या स्वप्नातील महाराष्ट्र' या विषयावर दिलेल्या व्याख्यानाचा संपादित भाग.)**

**शेतीवरचा रोजगाराचा भाग अन्य क्षेत्राकडे वळवणे आवश्यक. एका बाजूला राज्यात तरुणांची संख्या तीन कोटींच्या घरात गेली असताना त्यांच्या हाताला काम मिळवून देण्यावरच राज्य सरकारचा भर आहे.**

**देशपातळीवर 'मेक इन इंडिया'चा नारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे. त्याच धर्तीवर राज्यात उद्योगांनी यावे आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी 'मेक इन महाराष्ट्र'चा नारा आम्ही दिला आहे.**

**शिक्षणाच्या सार्वत्रीकरणात त्याचे बाजारीकरण होऊ नये. शुल्क आकारणीत पालकांचा खिसा कापला जाऊ नये, यासाठी ठोस कायदा करण्यात आला असून त्याची अंमलबजावणी ताकदीने करण्यात येईल.**

**राज्यातील ५० टक्के जनता शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे शेतीचा शाश्वत विकास होणे गरजेचे आहे. जलयुक्त शिवाराच्या माध्यमातून शाश्वत शेती विकासाच्या दृष्टीने आम्ही पावले उचलली आहेत.**

# समृद्ध आणि समर्थ

**महाराष्ट्र म्हणजे महान राष्ट्र. महाराष्ट्र म्हणजे संतांची भूमी. महाराष्ट्र म्हणजे शुरांची, वीरांची पावनभूमी. छत्रपती शिवरायांचा हा महाराष्ट्र म्हणजे भारताचा खड्गहस्त. त्यागाची, शौर्याची, प्रतिभेची, कलांची, बुद्धिमंतांची, समाजसुधारकांची, स्वातंत्र्ययोद्ध्यांची भूमी म्हणजे महाराष्ट. सातवाहन काळापासून महाराष्ट्राची ओळख इतिहासात ठळक आहे. नाशिकचे देवीलेणे, अजंठा-वेरुळची लेणी अतिप्राचीन आहेत. हाल सातवाहनाने लिहिलेल्या गाथा सप्तशती या सुमारे अठराशे वर्षापूर्वीच्या प्राकृत ग्रंथात नर्मदा आणि गोदावरी तीरावरील महाराष्ट्राचे वर्णन आहे. सहाव्या शतकात प्रसिध्द चिनी प्रवास ह्यु एन त्संग आणि आठव्या शतकात फा हैन यांनी भारताचा दौरा केला होता. त्यांनी त्या वेळच्या महाराष्ट्राचे वर्णन लिहून ठेवले आहे.**

चिंतामणी सहस्त्रबुद्धे

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, अशी गर्जना करीत चांद्यापासून बांद्यापर्यंत ऐतिहासिक लढा उभा राहिला. सर्वशक्तिमान दिल्लीश्वरांना नमवून संयुक्त महाराष्ट्राचा सुवर्णकलश आणण्यात आला. त्या ऐतिहासिक घटनेचा ५५वा वर्धापनदिन आपण १ मे रोजी साजरा केला. या ५५ वर्षांच्या वाटचालीत नर्मदा, गोदावरी, कृष्णा, तापी, वैनगंगा, पंचगंगा अशा अनेक नद्यांतून बरेच पाणी वाहून गेले आहे. बरचसे अडवले गेले आहे. त्यापैकी काही जमिनीत जिरले आहे. त्यामुळे महाराष्ट्र समृद्ध झाला आहे.

कोकण, विदर्भ, खानदेश, मुंबई, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा असे महाराष्ट्राचे ठळक विभाग आहेत. त्या प्रत्येक विभागात पुन्हा भिन्न-भिन्न हवामानाचे, भौगोलिक परिस्थिती असलेले उपविभाग आहेत. मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा आहे. प्रमुख बोलीभाषाही आहे. मात्र मराठीच्या वेगवेगळ्या बोली वेगवेगळ्या प्रांतांत आणि विभागात बोलल्या जातात.

भाषा मराठीच परंतु त्या त्या ठिकाणची बोलीची वैशिष्ट्ये मराठीने जपली आहेत. त्या त्या बोली भाषेत साहित्याचीही निर्मिती उदंड झालेली आहे. आता राज्य सरकारने मराठी भाषेसाठी स्वतंत्र खाते निर्माण केले आहे. त्यासाठी कॅबिनेट मंत्रिपद निर्माण केले आहे. इंग्रजीचे महत्त्व जागतिक आहेच, हिंदी ही आपली राष्ट्रभाषा आहे. परंतु या दोन्ही भाषांच्या दडपणात विशेषत: इंग्रजीच्या अतिक्रमणात मराठीची गळचेपी होऊ नये यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांचे मंत्रिमंडळातील सहकारी, अधिकारी वर्ग चांगले प्रयत्न करीत आहेत. विशेषत: मराठीचा वापर प्रशासन, शिक्षण आणि लोकव्यवहारात वाढवण्याचे आव्हान सरकारला पेलावे लागणार आहे.

महाराष्ट्राने गेल्या ५५ वर्षांत नेत्रदीपक अशी प्रगती केली आहे. कला, क्रीडा, साहित्य, समाजकारणात महाराष्ट्राचा आदर्श इतर राज्ये घेऊ लागली आहेत. राज्यातील नागरिकरणाचा आणि प्रगतीचा वेग हा अनेक युरोपीयन देशांपेक्षाही जास्त आहे. नैसर्गीक साधन संपत्तीचा योग्य वापर, प्रतिभावंत पिढी आणि कष्टाची तयारी यांमुळे महाराष्ट्राने आपला वेगळा ठसा निर्माण केला आहे. संत ज्ञानेश्वर माऊलीपासून महाराष्ट्रात जी संताची परंपरा सुरू झाली ती अखंडपणे सुरू राहिली. संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराजांपर्यंत ही परंपरा कायम राहीली. भक्तीमार्गातून समाजकारण ही संताचे कार्य त्यांनी अखंडपणे जपले. साहित्य क्षेत्रातही महाराष्ट्राने आपला वेगळा ठसा निर्माण केला आहे. महाराष्ट्राने चार चार ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त केले आहेत. एकेकाळी हरि नारायण आपटेंच्या कादंबऱ्या वाचणारा महाराष्ट्र आज नेमांडेंच्या 'कोसला' कादंबरीने अंतर्मुख होतो. विष्णुदास भावे यांनी लावलेले मराठी नाटकांच्या रोपट्याचा वटवृक्ष बनला आहे. दिनानाथ मंगेशकर, केशवराव भोसले, बालगंधर्वांचा वारसा आता प्रशांत दामले निभावत आहेत. आंतरराष्ट्रीय क्रिकेटचा इतिहास ज्या दोन पानांशिवाय पूर्ण होणार नाही ती सुनील गावस्कर आणि सचिन तेंडुलकर ही पाने ही महाराष्ट्राचीच देण आहे.







दादासाहेब फाळकेंनी चित्रपटसृष्टीचा पाया रचला. ती चित्रपटसृष्टी महाराष्ट्राच्या मुंबईतच वाढली, फुलली. मराठी चित्रपटसृष्टीचा सुवर्णकाळ सरला असला तरी तिने पुन्हा एकदा आता पंखात बळ

# आपला महाराष्ट्र

**महाराष्ट्राचे वैशिष्ट्य म्हणजे सध्या येथे युवा पिढीतल्या नेत्यांकडे सत्तेची सूत्रे आहेत. त्यामुळेच उद्योग, शिक्षण, सिंचन अशा क्षेत्रात नवनवे निर्णय होत आहेत. नुकताच पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी फ्रान्स, जर्मनी आणि कॅनडा अशा तीन देशांचा दौरा केला. व्यापार, ऊर्जा, उद्योग या दृष्टीने या दौऱ्यात अनेक करार झाले. मुख्यमंत्री फडणवीस जर्मनीच्या दौऱ्यात पंतप्रधानांबरोबर सहभागी झाले होते. तिथे त्यांनी कौशल्य विकासाच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण करार केला. त्यामुळे महाराष्ट्रातल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय) मधील विद्यार्थ्यांना आता विशेष तंत्रप्रशिक्षण मिळणार आहे. परिणामी त्यांना कारखान्यात नोकरी मिळण्याच्या अधिक त्वरित संधी उपलब्ध होणार आहेत.**



घेतले आहे. उत्तम कथावस्तू आणि अमीट ठसा उमटविणाऱ्या कलाकारांमुळे मराठी चित्रपटांचा झेंडा आता जागतीकपातळीवर अभिमानाने डौलत आहे. सप्तसुरांना आपल्या गळ्यात वश करणारे लता मंगेशकर आणि पं. भीमसेन जोशी ही तर जगाला दिलेली महाराष्ट्राची देण आहे. सी. रामचंद्र ते आजचे अजय अतुल यांनी मराठी बरोबरच हिंदीतही आपला ठसा उमटविला आहे. लेखाच्या विस्तारभयामुळे अनेक नावे राहिली आहेत. जणू महाराष्ट्र भूमी ही सर्वच कलांसाठी परीस भूमी आहे. नेमबाजी, जलतरण, कबड्डी अशा अनेक खेळात महाराष्ट्राने आपला झेंडा जागतीक पातळीवर रोवला आहे. पूर, अवर्षण, भूकंप. दहशतवादी हल्ले अशा असंख्य अडचणींना सामोरे जात महाराष्ट्र प्रगती करत आहे. आजही भारतात गुंतवणुकीसाठी उद्योगपतींची पहिली पसंती महाराष्ट्र हीच आहे. राकट देशा म्हणून आपले राकटपण जपणाऱ्या महाराष्टाच्या मनात फुलांचा ताटवा कायम फुललेला असतो. त्याचमुळे गणेशोत्सव आणि शिवजयंतीचा उत्सव हा उत्सवालाच भरते आणणारा असतो. संस्कृती आणि अधुनिकतेची कास धरणारा महाराष्ट्र हा पुरोगामी आहेच, त्याचमुळे महिलांना, पद दलीतांना महाराष्ट्र आपला वाटतो, सुरक्षीत वाटतो.

एकविसाव्या शतकातील सव्वा तप आता संपले आहे. उद्योग, प्रशासन, शिक्षण, गृहनिर्माण, तंत्रशिक्षण, माहिती व तंत्रज्ञान, ग्रामीण विकास, सिंचन, भाषा विकास अशा सर्व क्षेत्रात आता नवी दृष्टी आली आहे. प्रचलित व्यवस्थेचा आदर करीत, ज्येष्ठांचे मार्गदर्शन घेत आता नवा महाराष्ट्र उभा राहात आहे. कमीत कमी परवान्यांत उद्योग सुरू करण्यासाठी सरकारने पावले उचचली आहेत. तसेच औद्योगिक वसाहतींमधील रस्ते, पाणी, वीजपुरवठा, अग्निशमन यंत्रणा अशा सुविधांकडेही खास लक्ष पुरवले आहे. उद्योग आणि कामगार यांचे नाते अतूट आहे. त्या दृष्टीने नवे औद्योगिक व कामगार धोरण राबवण्याची तयारी सरकारने चालवली आहे. तसे कामगारमंत्री प्रकाश महेता यांनीही जाहीर केले आहे. शेतीपूरक आणि शेतीमाल प्रक्रिया उद्योगांना चालना देण्याचही धोरण राज्य सरकारने स्वीकारले आहे. शेतीमालावर आधारित उद्योग सुरू करण्याकडे सरकारने अधिक लक्ष द्यायला सुरुवात केली आहे. सिंचनातून समृद्धी ही संकल्पना राज्य सरकारने स्वीकारली आहे. आगामी काही वर्षातच महाराष्ट्र देशातीलच नव्हे तर जागतिक स्तरावरील सर्वात प्रगत प्रदेश होईल, यात शंका नाही.

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.**संपर्क :** ०८८०५००७१५२)



# जर्मनीत मह

**जागतिक पातळीवर आघाडीवर असणाऱ्या जर्मन उद्योजकांसाठी महाराष्ट्र हे गुंतवणुकीसाठी चांगले माध्यम ठरू शकते. फोक्सवॅगन, बॉश, थायसन कृप, मर्सिडीज डायम्लेर ऑडी यासारख्या जर्मन इंजिनिअरिंगच्या सुमारे तीनशे प्रकल्पांनी यापूर्वीच राज्याला पसंती दर्शवलेली होती. या पार्श्वभूमीवर 'मेक इन इंडिया' चे स्वप्न 'मेक इन महाराष्ट्र'शिवाय साकार करता येणार नाही. ही बाब लक्षात घेऊन गुंतवणुकीसाठी आणखी अनुकूल वातावरण निर्मितीकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्या नेतृत्वाखालील राज्याच्या शिष्टमंडळाने नुकतीच जर्मनीला भेट दिली.**

अर्चना शंभरकर

महाराष्ट्राची निम्याहून अधिक लोकसंख्या पंचविशीच्या आतील तरुणांची असून ती तंत्रकुशल आहे. या सर्वांसाठी रोजगार उपलब्ध व्हावा आणि देशासाठी मानव संसाधन निर्मिती व्हावी यासाठी देशात जास्तीत जास्त उत्पादन वाढावे, या उद्देशाने मेक इन इंडिया घोषित करण्यात आले. याचाच भाग म्हणून राज्यातील आर्थिक गुंतवणूक वाढावी आणि मेक इन महाराष्ट्रचे उद्दिष्ट गाठता यावे यासाठी वेगवेगळ्या देशांशी चर्चा करणे आवश्यक होते.

हॅनोव्हर येथील मेळाव्यात गुंतवणूकदारांसाठी खुले व्यासपीठ उपलब्ध करून देणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य होते. त्यावर २०० हून अधिक जर्मन तसेच भारतीय उद्योगसमूहांनी आपला सहभाग नोंदवला. केवळ शाब्दिक पातळीवर आश्वासन देण्यापेक्षा राज्य सरकारने घेतलेल्या कृतिशील उपक्रमांची माहिती येथे देण्यात आली.




मेळाव्यात राज्यातील गुंतवणूक संधीचे व्यासपीठ असलेल्या 'मॅग्नेटिक महाराष्ट्र' या आकर्षक स्टॉलला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भेट दिली. महाराष्ट्रात जर्मन उद्योग चांगली कामगिरी करीत असून आपण महाराष्ट्राला आवर्जून भेट द्यावी, असे निमंत्रण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जर्मनीच्या चान्सलर अँजेला मार्केल यांना यावेळी दिले. प्रत्यक्ष देशाच्या पंतप्रधानांनी हे आमंत्रण देणे म्हणजे आपल्या राज्याचा हा बहुमान आहे.

मर्सिडिज बेन्झ या कंपनीला वर्षभर ज्या बाबींसाठी संघर्ष करावा लागला, त्याची पूर्तता या सरकारने अवघ्या १५ दिवसांत केली. एका कायद्याच्या अर्थामुळे शिंडलर कंपनीची गुंतवणूक



# ...हाराष्ट्राचा ठसा

खोळंबली होती. सरकारने त्या कायद्यात १५ दिवसांतच दुरुस्ती करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय केवळ कंपनीला लाभान्वित करण्यासाठी नव्हता, तर त्या कायद्याचे आलेखनच चुकीच्या धर्तीवर होते. या आणि अशाच प्रकारच्या प्रागतिक निर्णयांमुळे केंद्र आणि राज्य सरकारबद्दल उद्योजकांना विश्वास वाटू लागला आहे.

येथे झालेल्या एका सत्रात जलविद्युत क्षेत्रातील काही प्रयोगांची माहिती जाणून घेण्यात आली. गावांतील नद्यांच्या मदतीने कशाप्रकारे जलविद्युत जनरेटर्स तयार करता येतात आणि त्यातून गावांत सहज वीज कशी उपलब्ध होऊ शकते, याची माहिती मुख्यमंत्र्यांनी बघितले. अभियांत्रिकीच्या क्षेत्रात होत असलेल्या नित्यनूतन बदलांच्या मालिकेत उत्पादन क्षेत्र अधिक स्मार्ट होण्याच्या दृष्टिकोनातून यासाठी रोबोला कसे प्रशिक्षित करायचे, याचे प्रात्यक्षिकही मुख्यमंत्र्यांनी घेतले.

माहिती तंत्रज्ञानाशी समन्वय साधून उद्योगात त्या दृष्टीने गतिमानता आणण्यासाठी प्रयत्न करणे हे हॅनोव्हरच्या मेळाव्याचे एक प्रमुख उद्दिष्ट होते. मानवी कौशल्याला रोबोटिक तंत्राची जोड देण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती यावेळी काही उद्योगांकडून देण्यात आली. याबाबत आघाडीवर असणाऱ्या एबीबी उद्योगसमूहाशी मुख्यमंत्र्यांनी चर्चा केली. नागपूर येथे रोबोटिक्स ट्रेनिंग सेंटर उभारण्यासह महाराष्ट्रात रोबोटिक्स उत्पादनासाठी या कंपनीने अनुकूलता दर्शविली.

या मेळाव्यातील एक प्रमुख उपलब्धी म्हणजे वाहननिर्मितीत जागतिक पातळीवर आघाडीवर असणाऱ्या फोक्सवॅगन या उद्योगसमूहाने महाराष्ट्रातील विविध पातळीवर गुंतवणुकीसाठी दाखविलेला उत्साहवर्धक प्रतिसाद. महाराष्ट्रात येऊ पाहणाऱ्या उद्योगांना वीज, जमीन आणि पर्यावरणविषयक परवानग्या तातडीने मिळाव्यात यासाठी राज्य सरकार घेत असलेल्या पुढाकाराबाबत फोक्सवॅगनचे भारतातील




जर्मनी-हॅनोव्हर दौऱ्या दरम्यान 'महाराष्ट्रातील गुंतवणुकीच्या संधी' या चर्चासत्रात मुख्यमंत्र्यांनी उद्योजकांना सहकार्याबाबत आश्वस्त केले.



**हिंजेवाडी आयटी पार्कमध्ये एसक्यूएस या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनीला दोन एकर जागा महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात आली. या कंपनीने महाराष्ट्रात विस्तार करण्याचा निर्णय घेतला असून, त्यामुळे आणखी २००० नवीन रोजगार निर्माण होणार आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी ही जागा देण्यासंबंधीचे पत्र या परिषदेदरम्यान एसक्यूएसला सुपूर्द केले.**

मुख्य कार्यकारी अधिकारी महेश कोडुमुडी यांनी प्रशंसोद्‌गार काढले.

महाराष्ट्र सरकारच्या वतीने फोक्सवॅगनशी झालेली चर्चा यशस्वी ठरली आहे. फोक्सवॅगनसाठी लागणाऱ्या अनेक सुट्या भागांचे उत्पादन भारतात लहान आणि मध्यम उद्योजकांच्या माध्यमातून व्हावे हा या बैठकीचा मुख्य उद्देश होता. राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या (आयटीआय) माध्यमातून फोक्सवॅगनने प्रशिक्षित मनुष्यबळाची निर्मिती करावी ही सरकारची विनंती समूहाच्या संचालक मंडळातील ज्येष्ठ सदस्य थॉमस उल्ब्रिच यांनी मान्य केली. या चर्चेत थिसनक्रप, डव्वा, कुका रोबोटिक्स, वोको आदी उद्योगसमूहांच्या प्रतिनिधींचा समावेश होता. या कंपन्यांच्या राज्यातील गुंतवणुकीतील विविध पातळ्यांवर येणारे अडथळे प्रशासनाकडून तातडीने दूर केले जातील, असे आश्वासन यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले. या समूहाला विविध सुट्या भागांचा पुरवठा करणाऱ्या लहान व मध्यम उद्योगांचे महाराष्ट्रात जाळे निर्माण व्हावे यासाठी संबंधित उद्योगसमूहांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली. कुका रोबोटिक्स, वोको, थिसनक्रप आदी समूहांनाही महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी प्रोत्साहित केले.

हॅनोव्हर येथील मेळाव्यासोबतच

- **एरिक्सन या टेलिकम्युनिकेशन उपकरण बनविणाऱ्या कंपनीने पुणे येथे ३०० कोटी गुंतवणुकीची तयारी दर्शविली आहे.**
- **देवेंद्र फडणवीस हे बहुधा जर्मन इंजिनिरिंग पद्धतीने तयार झाले असावेत ,कारण ते अत्यंत कार्यक्षम, विश्वासू आणि सदैव तत्पर असतात, असे उद्‌गार इंडिया इनव्हेस्टर कॉन्फरन्सला भेट देण्यास आलेले चित्रपट अभिनेते विवेक ओबेराय यांनी काढले.**

स्वीडनमधील काही प्रमुख उद्योगसमूहांशी मुख्यमंत्र्यांनी संवाद साधला. त्यात सॅब या प्रमुख समूहाशी त्यांनी विविध टप्प्यात दीर्घ चर्चा केली. हवाई क्षेत्रातील संरक्षणविषयक उपकरणे तसेच लढाऊ विमाने निर्मितीक्षेत्रातील सॅब ही जागतिक पातळीवर प्रमुख कंपनी आहे. या कंपनीच्या लिंकोपिंग येथील प्रकल्पाचीही पाहणी केली. भारत फोर्ज ही या समूहाची एक प्रमुख पुरवठादार कंपनी आहे. तिच्या माध्यमातून महाराष्ट्रात होऊ शकणाऱ्या संभाव्य गुंतवणुकीबाबत या समूहाच्या संचालक मंडळाशी चर्चा केली.

स्वीडनमधील इतर उद्योजकांशीही यावेळी मुख्यमंत्र्यांनी संवाद साधला. स्वीडिश-भारतीय गुंतवणूकदारांच्या मंचाच्या माध्यमातून त्यांनी राज्यात अनेक स्वीडिश कंपन्या चांगल्या पद्धतीने कार्यरत असल्याचा दाखला दिला. याकरिता या कंपन्यांसाठी महाराष्ट्रात विस्तारीकरणाचा एक चांगला प्लॅटफॉर्म तयार करण्याचे मुख्यमंत्र्यांनी आवाहन केले.

'मेक इन महाराष्ट्र'साठी मोठ्या प्रमाणावर कुशल मनुष्यबळाची गरज भासणार आहे. राज्यात उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाला औद्योगिक क्षेत्राच्या वाढीसाठी प्रशिक्षित करण्यासाठी यावेळी प्रयत्न केले. त्यास अनुकूल प्रतिसाद देताना बॉश या प्रसिद्ध कंपनीने राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील (आयटीआय ) विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याचे मान्य केले. एवढेच नव्हे तर या तरुणांना बॉशसह आपल्या सहयोगी कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष रोजगार देण्याचे जाहीर केले. महाराष्ट्रातील सर्व आयटीआयमध्ये प्रशिक्षण देण्याचा प्रस्ताव बॉश या कंपनीने स्वीकारला आहे. केवळ प्रशिक्षणच नाही तर आपल्या उद्योगात अभियांत्रिकी क्षेत्रातील या प्रशिक्षित तरुणांना रोजगार देण्याचे या कंपनीने मान्य केले आहे.

उद्योगाची गंगा ही केवळ मोठ्या शहरांपुरती मर्यादित न राहता ती सर्वत्र पसरावी या उद्देशाने राज्यात गुंतवणूक करण्यास तयार असलेल्या औद्योगिक कंपन्यांना औरंगाबाद, नागपूर, अमरावती अशा सर्व भागात आपले उद्योग सुरू करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे. या दौऱ्याच्या फलश्रुतीचे अवलोकन केले असता, राज्याच्या गुंतवणुकीसाठी गुणात्मकदृष्ट्या कौतुकाची थाप पाठीवर पडली आहे. भारताची अर्थव्यवस्था नव्या पर्वात प्रवेश करत आहे. त्यात सहभागी होण्याची उद्योगांनाही मोठी संधी आहे. ती साधल्यास उद्योगांनाही स्वत:च्या वाढीचे ध्येय साधता येईल. ❑ ❑



**इन्डो डॅनिश फोरमचे अजय चौहान व जवाहरलाल मातु यांच्यासोबत मुख्यमंत्री**

**इस्रायलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या जागतिक पातळीवरील ॲग्रीटेक या कृषी प्रदर्शनाचे उद्‌घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इस्रायलचे कृषीमंत्री यायीर शमीर यांच्या हस्ते संयुक्तरित्या करण्यात आले. या प्रदर्शनाच्या उद्‌घाटनाचा मान महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना देऊन संयोजकांनी महाराष्ट्राचा गौरव केला. राज्यातील कृषी आणि माहिती-तंत्रज्ञानक्षेत्राच्या विकासामध्ये इस्रायल सोबत संयुक्त प्रकल्प राबवण्याची इच्छा मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली. इस्रायलमधील कंपन्यांना सोयीचे व्हावे, यासाठी एमआयडीसीमार्फत स्पेशल इस्रायल इंडस्ट्रीयल झोन तयार करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासनही त्यांनी दिले.**

पाण्याची कमतरता असतानाही इस्रायलने उपलब्ध अत्यल्प पाण्याचा शेतीसाठी सुयोग्य व काटेकोरपणे वापर करून जगापुढे एक आगळावेगळा आदर्श निर्माण केला आहे. त्या दृष्टीने इस्रायलचे तंत्रज्ञान राज्यासाठी मार्गदर्शक ठरू शकेल. मात्र 'मेक इन महाराष्ट्र'च्या सूत्राशी आम्ही बांधील असल्याने हे तंत्रज्ञान आम्हाला केवळ आयात करायचे नसून ते महाराष्ट्रातच विकसित करायचे आहे. सूक्ष्म सिंचन, कापणीनंतरचे तंत्रज्ञान, कृषी उपकरणे या सर्व क्षेत्रात आम्हाला प्रगत व अद्ययावत तंत्रज्ञानाची गरज आहे. जगातील भूक मिटविण्यासाठी शेतीच्या शाश्वत विकासासाठी आणि हवामान बदलावर मात करण्याचे उपाय निश्चितपणे या प्रदर्शनातून सापडतील, अशी आशा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या इस्रायल दौऱ्यादरम्यान व्यक्त केली.

# महाराष्ट्राच्या शेतीला इस्रायलची मदत



**इस्रायलमध्ये आयोजित जागतिक पातळीवरील 'ॲग्रीटेक' या कृषी प्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इस्रायलचे कृषिमंत्री यायीर शमीर, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन.**




मुख्यमंत्र्यांनी इस्रायल दौऱ्यातील दुसऱ्या दिवशी मुख्य शास्त्रज्ञ कार्यालयातील चमूची भेट घेतली. इस्रायलमधील संशोधन आणि विकासासाठी काम करणारे हे एक सर्वात मोठे आणि महत्त्वाचे केंद्र आहे. विशेषत: कृषी संशोधन, पीक कापणीनंतरचे तंत्रज्ञान, अन्न साठवणूक आणि सौर कृषिपंप यासारखे विविध प्रकल्प राज्यात राबवण्याची इच्छा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

## शेतकऱ्यांच्या मदतीसाठी इस्रायलचा पुढाकार

महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रातील अडचणी सोडविण्यासंदर्भात संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री. नेतान्याहू यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी मुख्यमंत्र्यांना आश्वासित केले.

उत्पादन क्षेत्र, अंतर्गत सुरक्षा आणि सायबर सुरक्षा या बाबतीतही सहकार्य करण्याची तयारी श्री. नेतान्याहू यांनी दाखविली. उत्पादन, अभियांत्रिकी आणि हवाई तंत्रज्ञान क्षेत्रात महाराष्ट्रात मोठ्या संधी असल्याचे मुख्यमंत्र्यांनी श्री. नेतान्याहू यांना सांगितले. त्याला त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. 'स्मार्ट सिटी'च्या निर्मितीमध्ये योगदान देण्याचेही मान्य केले.

इस्रायलमधील सेंटर फॉर पीस या फाऊंडेशनच्या माध्यमातून नवीन तंत्रज्ञानाच्या देवाणघेवाणीसह महाराष्ट्रातील आत्महत्याग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पुढाकार घ्यावा.

विशेषत: यवतमाळ आणि उस्मानाबाद जिल्ह्यात अशा मदतीची अधिक गरज आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी इस्रायलचे ज्येष्ठ नेते शिमॉन पेरेज यांच्याशी झालेल्या चर्चेदरम्यान सांगितले.



**इस्त्राईलचे माजी पंतप्रधान यित्झॅक राबिन यांच्या स्मारकाला मुख्यमंत्र्यांनी भेट दिली. यावेळी तेलअविवचे महापौर रान हुल्दाई उपस्थित होते.**

मुख्यमंत्र्यांनी श्री. पॅरेज यांना महाराष्ट्र भेटीचे निमंत्रण दिले. इस्रायलमधील एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून श्री. पेरेज यांची ओळख आहे. श्री. पेरेज हे २००७ ते २०१४ या काळात इस्रायलचे राष्ट्राध्यक्ष होते. तसेच सलग दोनवेळा ते इस्रायलचे पंतप्रधानही होते. त्यांच्या संकल्पनेतून पेरेज सेंटर फॉर पीस ही संघटना साकारली आहे. महाराष्ट्रात एकत्रितपणे काम करता येऊ शकणाऱ्या क्षेत्राबाबत या दोन नेत्यांमध्ये व्यापक चर्चा झाली.

## मुख्यमंत्र्यांचा झंझावात...

- मुख्यमंत्र्यांनी तेलअविव विद्यापीठाला भेट दिली. त्यांनी विद्यापीठाचे अध्यक्ष प्रा. जोसेफ क्लाफ्टर, उपाध्यक्ष रानानरेन आणि त्यांच्या सहकाऱ्यांशी चर्चा केली. विद्यापीठातर्फे विविध विषयावर संशोधनपर सादरीकरण करण्यात आले.
- तेलअविव विद्यापीठात सुमारे ३० हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून सुमारे ५ हजार नावीन्यपूर्ण संशोधन प्रकल्प येथे राबवण्यात येत आहेत.
- नान दान-जैनइरिगेशनच्या स्टॉलचे उद्‌घाटन केले.
- नेटफीन या सूक्ष्म सिंचन यंत्र उत्पादक कंपनीला राज्यात उत्पादन करण्याचे निमंत्रण दिले.
- या दौऱ्यादरम्यान इस्रायल येथील सुमारे शंभर शेतकऱ्यांशी संवाद साधला.
- इस्रायलचे माजी पंतप्रधान यित्झॅक राबिन यांच्या स्मारकाला भेट दिली.
- वॉररूमला भेट देऊन संपूर्ण शहरावर देखरेख करणाऱ्या यंत्रणेची पाहणी केली.
- शहरातील सीसीटीव्ही यंत्रणा व आपत्कालीन यंत्रणेची माहिती घेतली.
- मध्य-पूर्वेतील सर्वात मोठ्या शिंडर कॅन्सर हॉस्पिटललाही त्यांनी भेट दिली.
- या प्रदर्शनाच्या निमित्त १०० भारतीय आणि इस्रायलमधील कंपन्यांनी मेक इन महाराष्ट्र, इन कोलॅबरेशन विथ इस्रायलमध्ये सहभाग नोंदवला.

या चर्चेत श्री. पेरेज यांनी सांगितले, इस्रायलमधील शेतकरी हा मूलत: संशोधक वृत्तीचा आहे. जुन्या विचारांना तो चिकटून बसत नाही. नवीन स्वीकारण्याकडे त्याचा कल असतो. महाराष्ट्रातील शेतकरीसुद्धा समृद्ध होऊ शकतो. मात्र, त्याला आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करावा लागेल. इस्रायलकडे तेल नाही, पण तेल निर्मिती करणाऱ्या इराणपेक्षाही त्याचे सकल घरेलू उत्पन्न अधिक आहे. आर्थिक प्रगतीसाठी कृषी आणि तत्सम क्षेत्रात संशोधन आणि विकासावर भर देण्यामुळेच हे शक्य झाले. कृषीच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या जेथ्रो तसेच डिमिटर या दोन्ही समूहांशी महाराष्ट्राच्या अधिकाऱ्यांनी यावेळी चर्चा केली. या दोन्ही संघटनांनी यवतमाळ आणि उस्मानाबाद येथे पथक पाठविण्याचे मान्य केले आहे. जेथ्रो हा निरनिराळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या तज्ज्ञांचा समूह असून, इस्रायलमधील मोशाव (कृषीगाव) या संकल्पनेवर काम करणारा तो मोठा गट आहे. डिमिटर हाही तज्ज्ञांचा समूह असून तो कृषी, पाणी आणि ऊर्जा क्षेत्रातील प्रकल्पांमध्ये काम करतो. अशा प्रकल्पांच्या नियोजनासह संशोधन, तंत्रज्ञान यासाठी हा समूह साहाय्य करतो. दोन्ही समूहांच्या पथकांनी महाराष्ट्रात येण्याचे मान्य केले असून, कृषी क्षेत्राला मूल्याधिष्ठित करून उत्पादन, जैविक खते याबाबत तांत्रिक मदत करण्याचे आश्वासन दिले.

**राज्यातील कृषी आणि माहिती–तंत्रज्ञानक्षेत्राच्या विकासामध्ये इस्रायल सोबत संयुक्त प्रकल्प राबवण्याची इच्छा मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली. इस्रायलमधील कंपन्यांना सोयीचे व्हावे, यासाठी एमआयडीसीमार्फत स्पेशल इस्रायल इंडस्ट्रीयल झोन तयार करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.**

**महाराष्ट्र हे औद्योगिक विकासात अग्रेसर आहे. औद्योगिकीकरणामुळे नागरीकरणातही सातत्याने वाढ होत असल्याने शहरांच्या शाश्वत विकासासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. त्यासाठी तेलअविव येथे स्मार्ट सिटीची संकल्पना आणि त्याबाबत करावयाच्या उपाययोजना याबाबत चर्चा करण्यात आली. शहरांचा सुनियोजित विकास साधण्यासाठी तंत्रज्ञान, समाज माध्यमे, लोकसहभाग आणि ई-गव्हर्नन्स यांच्या मदतीने राज्यातील मोठ्या शहरांना स्मार्ट सिटीमध्ये विकसित करण्याबाबत यावेळी चर्चा झाली.**



संयुक्त भागीदारीबाबत तेलअविवचे महापौर रान हुल्दाई यांच्यासोबत मुख्यमंत्री

### स्मार्ट सिटीसाठी इस्रायलची मदत

इस्रायलच्या सहकार्याने राज्यातील नागपूर, मुंबई, अमरावती औरंगाबाद आणि नाशिक या शहरांना स्मार्ट सिटी बनविण्याचा प्रयत्न करण्याबाबत तेलअविवचे महापौर रान हुल्दाई यांच्याशी संयुक्त भागीदारीबाबत मुख्यमंत्र्यांनी चर्चा केली.

महाराष्ट्र हे औद्योगिक विकासात अग्रेसर आहे. औद्योगिकीरणामुळे नागरीकरणातही सातत्याने वाढ होत असल्याने शहरांच्या शाश्वत विकासासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. त्यासाठी तेलअविव येथे स्मार्ट सिटीची संकल्पना आणि त्याबाबत करावयाच्या उपाययोजना याबाबत चर्चा करण्यात आली.

शहरांचा सुनियोजित विकास साधण्यासाठी तंत्रज्ञान, समाज माध्यमे, लोकसहभाग आणि ई–गव्हर्नन्स यांच्या मदतीने राज्यातील मोठ्या शहरांना स्मार्ट सिटीमध्ये विकसित करण्याबाबत यावेळी चर्चा झाली. तेलअविव हे शहर 'स्मार्ट सिटी एक्स्पो वर्ल्ड काँग्रेस २०१४'मध्ये जगातील सर्वात 'स्मार्ट सिटी' म्हणून गौरविले गेले आहे. या शहरात राबवण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती मुख्यमंत्र्यांनी यावेळी जाणून घेतली. तसेच शहरांसमोरील संयुक्त आव्हाने आणि उपाययोजना, स्मार्ट शहर उपाय योजनेत भारतीय माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग, आनुषंगिक कार्यक्रम राबविण्यासाठी लागणारे तज्ज्ञ, तंत्रज्ञान आणि उपाययोजना आदींबाबत सहकार्य करण्याचे यावेळी उभयपक्षी ठरविण्यात आले. महापालिकेकडून ऑनलाइन सेवा, माहिती तंत्रज्ञानाच्या मदतीने वाहतूक आणि वाहनतळ व्यवस्थापन, नागरीसुरक्षा आणि सेवा, शहरांच्या विकासाला प्रोत्साहन, हरित बांधकाम आणि शहरातील जमिनीचा महत्तम उपयोग करण्यासाठी राबवण्यात येणाऱ्या सर्वोत्तम उपाययोजनांचा उपयोग याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. ❑ ❑

# राष्ट्रनिर्माणाचे नवे पर्व

**केंद्र सरकारला २५ मे रोजी एक वर्ष पूर्ण होत असून या सरकारच्या एक वर्षातील कारभाराविषयी आणि महाराष्ट्राला केंद्राकडून मिळालेल्या सहकार्याविषयी लिहीत आहेत**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

देशाचे लाडके पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांच्या सरकारला २५ मे रोजी एक वर्ष पूर्ण होत आहे. २६ मे २०१४ रोजी त्यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली, तेव्हा जनतेच्या अपेक्षांचे प्रचंड ओझे केंद्र सरकारवर होते. पण, आज जेव्हा आपण विचारांच्या त्या अवस्थेचे सिंहावलोकन करतो, तेव्हा आपल्या लक्षात येते की, देशातील वातावरण पूर्णत: बदलून गेले आहे. आज लोकांच्या मनामध्ये आत्मविश्वासाचे वातावरण आहे. या देशात सरकार आहे, या अस्तित्वाचे भान लोकांना आहे. परवा व्हॉट्स ॲपवर एक वाक्य वाचनात आले. वर्षभरापासून एकही घोटाळा कानावर आला नाही, या देशात सरकार आहे की नाही? मला वाटते की, या वाक्यात एक मोठा अर्थ दडला आहे. सरकारच्या वाटचालीची दिशा त्यातून स्पष्ट होते.

सरकारचे शंभर दिवस आणि त्यानंतर पहिले, दुसरे, तिसरे वर्ष अशी कामगिरीची मोजदाद करण्याची प्रथा माध्यमांनी रूढ केली. एका अर्थाने स्वत:च्या कामगिरीचा काही क्षण शांत बसून घेतलेला हा आढावा उपयुक्तच ठरावा. केंद्रातील सरकारबद्दल महाराष्ट्राच्या संदर्भातून आढावा घ्यावा, अशी विनंती करीत माहिती आणि जनसंपर्क खात्याने मला लिहिते केले. मला या विकासाच्या, आत्मविश्वासाच्या, इच्छाशक्तीच्या आणि भारताच्या उदयपर्वाकडे बघताना देशाचा आणि पर्यायाने महाराष्ट्रासह इतरही राज्यांचा उज्ज्वल भविष्यकाळ स्पष्टपणे दिसून येतो आहे.

येथे एक बाब प्रामुख्याने नमूद केली पाहिजे की, महाराष्ट्र कायमच पंतप्रधान मा. नरेंद्र मोदीजी यांच्या अजेंड्यावर प्राधान्यक्रमावर राहिला आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे आणि देशाचा आर्थिक विकास साधायचा असेल, तर मुंबईचा विकास करावाच लागेल, हे मा. मोदीजींना ठाऊक आहे. त्यामुळेच महाराष्ट्राचा ते अतिशय आपुलकीने विचार करतात. देशाच्या एकूण विकासात महाराष्ट्राची ताकद किती मोठी राहू शकते, हे जाणून असल्यामुळे त्यांनी राज्याला कायम प्राधान्य देण्याचा प्रयत्न केला आहे.

### विदेश दौऱ्यात प्राधान्य

दाव्होस येथे झालेली जागतिक आर्थिक परिषद असो की हॅनोव्हर येथे झालेली उद्योग परिषद, प्रत्येक ठिकाणी त्यांनी महाराष्ट्राला संधी दिली. इस्त्रायल येथे होणाऱ्या शेती प्रदर्शनातही त्यांनी महाराष्ट्राला संधी दिली. संपूर्ण जगात महाराष्ट्राला एक मोठी ताकद देण्याचा पंतप्रधानांचा प्रयत्न आहे. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री या नात्याने मी निश्चितपणे याचे स्वागत करतो, आणि महाराष्ट्राच्या जनतेच्या वतीने त्यांचे आभारही मानतो.

मुख्यमंत्री झाल्यापासून आर्थिक परिषदांसाठी दोन विदेश दौऱ्यात सहभागी होण्याची संधी मा. मोदीजींनी महाराष्ट्राला दिली. या प्रत्येक दौऱ्यात एक महत्त्वाचा अनुभव आला तो म्हणजे तेथील





राजदूत हे मुख्यमंत्र्यांचे स्वागत करताना, येणारे मुख्यमंत्री हे संपूर्ण भारताचे प्रतिनिधी आहेत, या भावनेतून स्वागत करीत होते. त्यांचा प्रतिसाद अतिशय सकारात्मक होता. त्यालाही कारण आहे. सर्व राजदूतांची एक बैठक मा. पंतप्रधानांनी घेतली, तेव्हा त्यांना ही बाब स्पष्टपणे सांगितली गेली होती. सर्व राज्य मिळूनच भारत देश तयार होतो. भारत म्हणजे केवळ केंद्रातील सरकार नव्हे, तर त्यात राज्य सरकारेही अंतर्भूत होतात. त्यांना मदत करा, असा स्पष्ट संदेश मा. मोदीजींनी दिला होता. मोदीजींच्या या आवाहनाला मिळालेला अतिशय चांगला प्रतिसाद आज दिसून येतो. त्यामुळे विदेशातील दूतावासांचा एकूणच राज्यांच्या संदर्भातील दृष्टिकोन मोठ्या प्रमाणात बदललेला आहे.

## महाराष्ट्र फास्ट ट्रॅकवर

महाराष्ट्रात आमचे सरकार येऊन अवघे सहाच महिने झाले आहेत. त्यामुळे आम्हाला केंद्रासोबत काम करण्याची संधी याच कालावधीत मिळाली असली तरी या सहा महिन्यात जितका भक्कम पाठिंबा मा. नरेंद्र मोदीजींकडून आम्हाला प्राप्त झाला, त्याबद्दल महाराष्ट्राला त्यांचा गौरवच वाटतो. येणाऱ्या काळातही मा. पंतप्रधानांकडून असाच मदतीचा हात महाराष्ट्राला सतत मिळत राहणार आहे. आज येथे एक गोष्ट अगदी आवर्जून सांगावीशी वाटते ती म्हणजे महाराष्ट्राचा कुठलाही प्रकल्प असेल तर त्याला अगदी प्राधान्यक्रमावर मंजुरी मिळते.

महाराष्ट्राचे प्रकल्प फास्टट्रॅकवर आहेत, ते केंद्र सरकारच्या भक्कम पाठिंब्यामुळेच. नवी मुंबईतील विमानतळ असो की, छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला इंदू मिलची जागा देण्यासाठी पंतप्रधान मा. नरेंद्र मोदीजी यांनी घेतलेला पुढाकार तर खरोखरच मोलाचा आहे. कोस्टल रोडला मान्यता शेवटच्या टप्प्यात आहे. आजवर कोणत्याही राज्याला मिळाली नाही, इतकी मदत केंद्राने महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिली. २००० कोटी रूपये केंद्र सरकारने एकाचवेळी मंजूर केले.

## पूर्वानुभावाचा फायदा

सर्वांत महत्त्वाची बाब कोणती असेल तर ती म्हणजे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदीजी हे प्रत्येक मुख्यमंत्र्यांना अगदी सहजपणे भेटतात. ते खऱ्या अर्थाने 'ॲप्रोचेबल' आहेत. याचे खरे कारण कोणते असेल तर सलग १५ वर्षे त्यांनी मुख्यमंत्रिपद सांभाळले आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या नेमक्या अडचणी काय असतात, याची त्यांना पूर्ण कल्पना आहे. पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी आपल्या भूमिकेत कोणताही बदल केलेला नाही. पूर्वीच्या मुख्यमंत्र्यांना जो त्रास भोगावा लागला तो आताच्या मुख्यमंत्र्यांना भोगावा लागू नये, हीच त्यांची मनोमन इच्छा असते. नीती आयोगाच्या माध्यमातून त्यांनी मुख्यमंत्र्यांना जादा अधिकार प्रदान केले.

राज्यांना अधिक संसाधने उपलब्ध व्हावीत, हा त्यांचा सातत्याने प्रयत्न असतो. नीती आयोगात पंतप्रधानांनी जेव्हा भाषण केले, तेव्हा त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, भारत हा खऱ्या अर्थाने कोणता म्हणायचा? राज्य वजा करता देश उरतो तरी काय? भारत हा साऱ्याच राज्यांमध्ये राहतो. त्यामुळे राज्यांची अधिक काळजी

### सर्वसमावेशक नेतृत्व

मा. मोदीजींच्या कार्यशैलीचा आणि त्यांच्या वैचारिक भूमिकेचा अतिशय जवळून परिचय मला अनेकदा झाला, हे मी माझे भाग्य समजतो. एक सर्वसमावेशक नेतृत्व कसे असावे, हे मा. मोदींजींकडे पाहिले की पटते. खरे तर त्यांच्या रूपात एक समर्थ मार्गदर्शकच मला लाभला आहे. एक प्रसंग आठवतो. नीती आयोगाची बैठक झाली, तेव्हा मोदीजींनी सर्व मुख्यमंत्र्यांसाठी एक अनौपचारिक बैठक ठेवली होती. त्यात कोणताही कागद नव्हता आणि कोणताही सरकारी अजेंडा नव्हता. प्रत्येक मुख्यमंत्री करीत असलेले चांगले काम इतरांनी ऐकायचे आणि त्याचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करायचा, असा हा मुक्तसंवाद होता. मग ते मुख्यमंत्री भाजपाचे असो, काँग्रेसचे असो की कम्युनिस्ट पक्षाचे. राजकीय पक्षभेद बाजूला सारून इतक्या स्वच्छ मनाने प्रशासनातील प्रयोगांना मान्यता देण्याचे मोठेपण दाखवावे ते फक्त मा. नरेंद्र मोदीजी यांनीच!




करणारे पंतप्रधान आम्हाला लाभले, ही साऱ्याच राज्यांसाठी अतिशय भूषणावह बाब आहे.

### आत्मविश्वासाचे वर्ष

आज मा. नरेंद्र मोदीजी यांनी संपूर्ण जगात भारताबद्दल प्रचंड आत्मीयता आणि उत्सुकता निर्माण केली आहे. या संधीला गुंतवणुकीत परावर्तित करण्याची जबाबदारी आता राज्यांची आहे. या प्रचंड अनुकूलतेत आपल्या राज्याचा विकास खऱ्या अर्थाने साधून घेणे ज्यांना जमेल, तेच खरे या प्रक्रियेतील यशाचे वाटेकरी होऊ शकणार आहेत.

आतापर्यंतच्या तिन्ही विदेश दौऱ्यात मला आणखी एक बदल जाणवला तो म्हणजे आपले भारतीयत्व सांगण्याचा. जेथे जेथे गेलो, तेथे जगाचा भारताप्रती बदललेला दृष्टिकोन अनुभवता आला. डाव्होसमध्ये भारताबद्दल कुणी बोलत नव्हते, अशी स्थिती होती आणि आता फक्त भारताचाच बोलबाला आहे. तेथील नागरिकांमध्ये सुद्धा निर्माण झालेला आत्मविश्वास याचेच निदर्शक होता.

**केवळ उद्योगजगतासाठीच चांगले निर्णय झाले, असे नाही, तर शेतकऱ्यांच्या हिताचेसुद्धा अनेक निर्णय झाले आहेत. शेती आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी महाराष्ट्र सरकारने केलेली विनंती सातत्याने केंद्र सरकारने मान्य केली. आमच्या शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमत (एमएसपी) देऊन अडचणींच्या काळात भरीव मदत मा. मोदीजी यांच्या सरकारने दिली आहे. आजवरच्या कुठल्याही सरकारांनी विश्व व्यापार संघटनेच्या (डब्ल्यूटीओ) कराराच्या विरोधात जाण्याची हिंमत दाखविली नाही. पण, ते काम मा. मोदीजींनी केले. जागतिक बाजारपेठ असली तरी शेतकऱ्यांचे हित दृष्टिआड करणार नाही, अशी ठाम भूमिका घेत, तो करार मोडीत काढण्याचे काम मा. मोदीजींनी केले, ते केवळ शेतकऱ्यांसाठीच! विकसनशील देशांना किमान आधारभूत किंमत ठरविण्याची मोकळीक असावी, असे आग्रही प्रतिपादन त्यांनी केले. हे त्यांचे फार मोठे राजनैतिक यश आहे.**

भारताची ताकद नुसती ओळखून चालणार नव्हते, तर त्यांचे योग्य सादरीकरणसुद्धा आवश्यक होते आणि ते काम मा. मोदीजी यांनी अगदी लीलया केले. 'मेक इन इंडिया' असो की 'मेक इन महाराष्ट्र' केवळ मा. मोदीजींमुळेच त्याला गती देता आली.

### दबदबा वाढला

महाराष्ट्राचा राजकीय दबदबा दिल्लीत वाढला आहे. राजकीय इच्छाशक्ती व राज्याविषयी तळमळ या भरवशावर राज्य वाटचाल करत आहे. दाव्होस येथे झालेली जागतिक आर्थिक परिषद असो की हॅनोव्हर येथे झालेली उद्योग परिषद अथवा इस्त्रायलचे शेती प्रदर्शन असो महाराष्ट्राचे प्रतिबिंब त्यात उमटलेले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा भारतभेटीवर आलेले असताना पंतप्रधानांनी त्यांच्यासोबत संवादाची संधी उपलब्ध करून दिली. अमेरिकेशी मुंबईचे असलेले सामाजिक व आर्थिक नाते या संवादातून आणखी दृढ होऊ शकले. त्या संधीचे महाराष्ट्रासाठी सोने करण्याचे आम्ही

ठरवले आहे. केंद्राच्या पाठबळामुळे महाराष्ट्रातील जनहिताच्या प्रकल्पांना प्राधान्यक्रमावर मंजुरी मिळते.

अलीकडच्या काळातील अत्यंत महत्त्वाची घटना म्हणजे, मुंबईच्या इंदू मिल्सची जागा केंद्र सरकारने राज्य सरकारला देणे होय. ही जागा केंद्र सरकारने एका सामाजिक जाणिवेच्या भूमिकेमधून तत्काळ दिली. केंद्र सरकारच्या मान्यतेने राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळ (एनटीसी) ही जागा राज्य सरकारला हस्तांतरित करणार आहे. यापूर्वीच्या सरकारने या जागेसाठी संसदेत कायदा करावा लागेल, अशी भूमिका घेतली होती. पण, आम्ही कायदेशीर मत घेतले, तेव्हा त्यांनी संसदेत कायदा करण्याची काहीएक गरज नाही. केंद्र सरकारच्या पूर्वपरवानगीने एनटीसी ही जागा राज्य सरकारला देऊ शकते, असा अभिप्राय दिला. त्यानंतर आम्ही पाठपुरावा केला.

'द टेक्सटाईल अंडरटेकिंग्ज नॅशनलायझेशन' ॲक्ट १९९५च्या कलम ११ अन्वये केंद्र सरकारची पूर्वपरवानगी घेऊन एनटीसी ही जागा राज्य सरकारला हस्तांतरित करू शकते, ही बाब निदर्शनास आणली. त्यामुळे स्वत: पंतप्रधान मा. नरेंद्र मोदीजी आणि केंद्रीय वस्त्रोद्योग राज्यमंत्री (स्वतंत्र कारभार) संतोष गंगवार यांच्या उपस्थितीत यासंबंधीचा करार करण्यात आला. केंद्र सरकारच्या मान्यतेने आता इंदू मिलची जागा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक बांधण्यासाठी राज्य सरकारला हस्तांतरित करण्यात येणार आहे. या बदल्यात राज्य सरकार या जागेचा मोबदला एनटीसीला देईल.

महाराष्ट्रातील ५३ टक्के लोकसंख्या ही २५ वर्षे वयोगटापेक्षा कमी आहे. जगात कुशल मनुष्यबळाची प्रचंड गरज आहे आणि ती भागविण्याचे सामर्थ्य महाराष्ट्रातील युवकांमध्ये आहे. त्यामुळे आपल्या या लोकसंख्येला खऱ्या अर्थाने फायदा होईल, असे रोजगाराचे स्रोत तयार करावे लागतील. ७० कोटी कौशल्य प्रशिक्षित भारतीयांच्या हाताला काम देण्याचे मोठे आव्हान आज आपल्यापुढे आहे. ते आपण देऊ शकलो नाही, तर देश विनाशाकडे जाईल आणि तेच 'मेक इन इंडिया'चे खरे प्रयोजन आहे. खरे तर ही वास्तविकता ओळखून १० वर्षांपूर्वीच प्रयत्न होण्याची गरज होती. पण, दुर्दैवाने आजवर त्या दृष्टीने पुढाकार घेतला गेला नाही. तो प्रयत्न मा. मोदीजी करताहेत, यामुळेच भारताचा आणि महाराष्ट्राचासुद्धा भविष्यकाळ अतिशय उज्ज्वल आहे. महाराष्ट्रातही अवकाळी पावसाने, गारपिटीने यंदा धुमाकूळ घातला आहे.


शिवस्मारक : संकल्पचित्र

**अरबी समुद्रातील शिवस्मारकास तातडीने मिळणाऱ्या केंद्रीय परवानग्या हा राज्याचा केंद्राशी असलेल्या नात्यांचा उत्तम परिणाम मानला जावा. या शिवस्मारकामुळे देशातील जनतेला देशभक्तीची प्रेरणा मिळेल. स्मारकास भेट देणाऱ्या पर्यटकांमुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, या ठिकाणी कराच्या माध्यमातून जमा होणारा महसूल राज्यातील शेतकऱ्यांच्या व ग्रामीण भागाच्या विकासाकरिता खर्च करण्यात येईल. शिवस्मारक केवळ स्मारक न राहता राज्याचे ऐतिहासिक महत्त्व दर्शविणारे आणि राष्ट्रप्रेमाचे प्रतीक म्हणून येणाऱ्या पिढ्यांना मार्गदर्शक ठरेल.**

कधी नव्हे इतके नैसर्गिक संकट यंदाच्या वर्षी आले आहे. पण, मा. मोदीजींनी शेतकऱ्यांना मिळणाऱ्या मदतीचे निकष ५० टक्क्यांवरून ३३ टक्के करण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला. पूर्वी ५० टक्क्यांच्या वर नुकसान झाले तरच ते शेतकरी मदतीस पात्र ठरत. आता ३३ टक्क्यांच्या वर नुकसान झाले तरी ते शेतकरी मदतीस पात्र ठरणार आहेत. हा फार मोठा क्रांतिकारी निर्णय आहे. नुकत्याच झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आम्ही या निर्णयाची राज्यात अंमलबजावणी सुनिश्चित केली.

महाराष्ट्राला भरभरून देणाऱ्या पंतप्रधान मा. नरेंद्र मोदीजी यांना या वर्षपूर्तीबद्दल मनापासून शुभेच्छा देतो आणि देशातील या उज्ज्वल विकासपर्वात महाराष्ट्र आपला मोठा वाटा उचलेल, असे महाराष्ट्रातील ११ कोटी जनतेच्या वतीने आश्वस्तही करतो. ❐ ❐

# विकासाला गती, सुविधांमध्ये वाढ

दिल्लीत बसून मी महाराष्ट्राची सेवा करणार आणि महाराष्ट्राला गुजरातच्याही पुढे नेणार,असे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे विधानसभा निवडणुकांच्या प्रचारासाठी आल्यावर बीडच्या सभेत म्हणाले होते आणि त्यापाठोपाठ राज्याने प्रगतीचा वेध घेतला.

नागपूर शहरात मेट्रो धावेल का, की हे फक्त स्वप्न असेल? उत्तर खुद्द पंतप्रधानांनीच दिले. नरेंद्र मोदी यांनी भूमिपूजन केले आणि विकासाचे मार्ग विस्तारले. आता मुंबई मेट्रोचा तिसरा टप्पा आणि पुढे पुण्याची मेट्रो प्रत्यक्षात येईल.

मुंबई देशाची जशी आर्थिक राजधानी आहे तसेच महाराष्ट्राबद्दल कमालीची ओढ केंद्रीय नेतृत्वाला आहे. त्यामुळेच महाराष्ट्राचा विकास आता झपाट्याने होईल. मुख्यमंत्र्यांना राज्याचा गाडा चालविताना कोणत्या व कशा अडचणी येतात व त्यांची सोडवणूक केंद्र सरकारने कशी करावी हे नरेंद्र मोदी यांनी १५ वर्षे गुजरातचे मुख्यमंत्री राहिल्याने अनुभविले होते. म्हणूनच त्यांनी राज्यांना जादा अधिकार देण्यासाठी पुढाकार घेतला.

**रघुनाथ पांडे**

**केंद्र आणि राज्याच्या उत्कृष्ट समन्वयामुळे महाराष्ट्रातील अनेक विकास योजना गतीने मार्गी लागत आहेत. राज्याच्या योजनांकडे अतिशय सहानुभूतीने बघितले जात आहे. त्यामुळे राज्याचे प्रश्न केंद्रीय पातळीवरून सुटण्यास मदतच होत आहे.**




### रेल्वे प्रकल्प

रेल्वेने महाराष्ट्रासाठी अनेक प्रकल्प हाती घेतले आहेत. मुंबईतील एमयूटीपी-३ साठी ८५०० कोटी व राज्यातील प्रकल्पांसाठी ११ हजार ४४१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पुणे-मिरज-लोंढा या मार्गासाठी ४६७० कोटी, राजनंदगाव-नागपूर तिहेरीकरण १२७३ कोटी, बल्लारशहा-वर्धा ६३० कोटी, मध्य व कोकण रेल्वेचा सेतू ठरणाऱ्या कराड-चिपळूण मार्गासाठी १२०० कोटी, पुणे-लोणावळा तिसऱ्या मार्गासाठी ८०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या शिवाय पुणे-नाशिक,रामटेक-तुमसर, नांदगाव-मनमाड या रेल्वेमार्गांचे सर्वेक्षण होणार आहे.

मुंबई व महाराष्ट्रासाठी नव्या गाड्या मिळाल्या नसल्या किंवा काही भागांची उपेक्षा झाली असली तरी सध्या काम सुरू असलेल्या प्रकल्पांसाठी अर्थसंकल्पात जवळपास २० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील अविकसित भागातील लोहमार्गाचा विस्तार तसेच नव्या लोहमार्गासाठी रेल्वे मंत्रालय व महाराष्ट्र सरकार यांच्यात करार झाला. विदर्भ, मराठवाडा व कोकणातील रखडलेल्या प्रकल्पांसाठी रेल्वेच्या नव्या धोरणानुसार रेल्वे मंत्रालय व महाराष्ट्र सरकारच्या मदतीने नव्या कंपनीची निर्मिती झाली. राज्यातील विदर्भ, मराठवाडा व कोकणातील प्रलंबित लोहमार्ग, नवे लोहमार्ग व विस्तारीकरण करणे हे या कंपनीचे मुख्य काम राहील. यामुळे राज्यातील लोहमार्गांचे जाळे विकसित होऊन मागास भागाचा विकास साधण्यास मदत होईल. यातील पुढचा भाग म्हणजे दिघी बंदर आणि रेल्वे विकास महामंडळात करार झाला. नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यात नव्या लोहमार्गामुळे हा भाग देशाच्या मूळ प्रवाहाशी जोडला जाईल. मुंबई विद्यापीठात रेल्वेचे पदव्युत्तर शिक्षण केंद्र म्हणजे महाराष्ट्र विकासाच्या गतीतील पुढचे पाऊल ठरू शकेल.

रेल्वेमंत्री सुरेश प्रभू व मुख्यमंत्री फडणवीस यांच्यातील समन्वयातून हे प्रकल्प रुळावर येत आहेत. मुंबई रिंगरोडविषयी चर्चा असते, पण इतर शहरांप्रमाणेच मुंबईचे रस्ते भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत येत नसल्याने रिंगरोड समस्यांवरील पर्याय म्हणून समुद्रीय रोड, सी लिंक आणि ट्रान्स हार्बर लिंक यांचा विचार होत आहे. राज्य व केंद्रीय परिवहन मंत्रालयाने यासाठी घेतलेला पुढाकार मुंबईला नवी झळाळी आणेल. दळणवळणाच्या पातळीवर हा विचार सर्वतोपरी असला तरी पर्यटनाच्या बाजूनेही त्याला विशेष महत्त्व आहेच.

### सॅटेलाइट पोर्ट

नौकावहन विभागाने मुंबईतील इंदिरा डॉकचे १५० मीटर समुद्रीय शयनयान भारतीय तटरक्षकाला दिले. त्याचा महाराष्ट्र सरकारला प्रदूषण



नियंत्रण कृती कार्यक्रम आणि तत्काळ सेवेसाठी याचा उपयोग होईल. वाहतूककोंडी आणि प्रदूषणातून मुंबईकरांची सुटका करण्यासाठी केंद्र सरकारने निर्णायक पाऊल उचलले आहे. रस्त्यावर आणि पाण्यातही वेगाने धावू शकेल अशी बस मुंबईकरांच्या सेवेत दाखल झाली. त्याचा योग्य वापर झाला पाहिजे, ते संबंधितांनाही पाहायला हवे. मरिन ड्राइव्हच्या समुद्रात ५०० रुम्सचे एक आलिशान हॉटेल उभारण्याचा प्रस्ताव असून चार फ्लोटिंग रेस्टॉरंट आणि फ्लोटिंग हेलिपॅडचाही प्रस्ताव आहे. गेट वे ऑफ इंडियासमोर समुद्रात होणारी गर्दी कमी करण्यासाठी रेडिओ क्लबच्या बाजूला नवीन जेट्टीचा विचारही होतो आहे. जलवाहतुकीसाठी रेवस, डहाणू, विजयदुर्ग येथे ‘सॅटेलाइट पोर्ट’ उभारण्यात येतील. त्याव्यतिरिक्त औरंगाबाद, जालना आणि वर्धा इथे ड्राय पोर्ट उभारण्यात येणार आहेत. भविष्यातील वाहतूक खर्च कमी करण्यासाठी नदीपात्रातून जलमार्गाने वाहतूक करण्यावर लक्ष दिले जाणार आहे. महाराष्ट्रातील दहा नद्यांचा समावेश नव्या जलवाहतूक योजनेत असून, त्या माध्यमातून राज्याला नवा आकार मिळेल. जलवाहतुकीमुळे रस्ते अपघात, प्रदूषण आणि इंधनावरील खर्च वाचणार आहे.

राज्यातील विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण विभागाला जोडणारा नागपूर ते रत्नागिरी रस्ता राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित झाल्याने तो चार पदरी सिमेंटचा महामार्ग होईल. यासाठी नऊ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. आळंदी – पंढरपूर व देहू – पंढरपूर या संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम पालखी मार्गाचा चार पदरी सिमेंटचा रस्ता म्हणजे महाराष्ट्राला केंद्राने दिलेली देणगी आहे. सोलापूर – अक्कलकोट – गाणगापूर – गुलबर्गा हा चार पदरी सिमेंटचा रस्ता होणार आहे.

### सुविधांमध्ये भर

सोलापूरमधील टेक्सटाइल उद्योगाला चालना दिली जाणार आहे. येथील उत्पादित मालाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्यासाठी प्रोत्साहन देण्याची योजना केंद्र तयार करत आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कोळसा खाणीतून कोळसा तसेच वीज व गॅस महाराष्ट्र राज्याला उपलब्ध करून दिला जातो आहे. महाराष्ट्राच्या विजेसाठी पंतप्रधानांनी नर्मदा प्रकल्पातून ४०० कोटींची वीज महाराष्ट्राला मोफत देण्याची तयारी केली.

जैतापूर अणू प्रकल्पाबाबत आता मागे हटता येणार नसून कोणत्याही परिस्थितीत हा प्रकल्प होणारच असा निर्धार मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला. ही त्यांची भूमिका या प्रकल्पाची केंद्रीय स्तरावरील तयारी पाहूनच पक्की झाली. विशेषत: जर्मनीच्या दौऱ्यावरून परतल्यावर तर ते अजूनच ठाम झाले. त्याला कारण म्हणजे, ‘मेक इन इंडिया’च्या धर्तीवर ‘मेक इन महाराष्ट्र’ची रूपरेषा अधिक ठाशीव झाली. परदेशी गुंतवणुकीमध्ये ग्रामीण महाराष्ट्राला प्राधान्य दिले जाणार असल्याने या प्रकल्पातून आता माघार घेणे चुकीचे ठरेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या फ्रान्स दौऱ्यात एकूण १७ करारांवर सह्या झाल्या असून जैतापूर येथील अणुऊर्जा प्रकल्प हा एक आहे. फ्रान्समधील अरेवा ही कंपनी या प्रकल्पाच्या उभारणीत भारताला मदत करणार आहे. केंद्रीय खते व रसायन राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी पेट्रोकेमिकल्सवर आधारित काही प्रकल्पावर राज्य सरकारसोबत चर्चा सुरू केली आहे. हिन्दुस्थान ॲन्टिबायोटीक्स, महाराष्ट्र ॲन्टिबायोटीक्स आदी कारखान्यांना बळ दिले जाणार आहे. या कंपन्यांचे पुनरुज्जीवन झाल्यास चीनकडून औषधांची आयात कमी करता येईल. विदर्भात कोल टू गॅस या प्रकल्पावर विचार सुरू आहे. यातून युरिया निर्मितीचा कारखाना उभारण्याचे विभागाचे प्रयत्न आहेत. आरसीएफचे आणखी प्लँट उभारण्याबाबत प्रयत्न होत आहेत. मुंबईचा समुद्रकिनारा जमेची बाजू मानून त्याचा वापर पेट्रोकेमिकल्स उद्योगासाठी करण्याचे नियोजन



**माझगांव डॉकने निर्माण केलेल्या प्रकल्प ७५ श्रेणीतील पहिल्या पाणबुडीचे संरक्षण मंत्री मनोहर पर्रीकर यांच्या हस्ते व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय नौदलाला हस्तांतरण करण्यात आले.**

आहे. महाराष्ट्रात प्लास्टिक इंडस्ट्री उभारण्यासाठी केंद्रीय पेट्रोरसायन विभागाचा प्रस्ताव तयार आहे. या उद्योगासाठी १० लक्ष कोटींची गुंतवणूक होण्याची शक्यता आहे. अवजड उद्योग मंत्रालयाकडून मुंबईत बॅटरीवर चालणाऱ्या बसेस धावणार आहेत. राजधानी दिल्लीनंतर मुंबईचा क्रमांक या विभागाचे मंत्री अनंत गिते यांनी लावला. याशिवाय काही योजना लवकरच प्रत्यक्षात येतील. आणखी एक महत्त्वाची घडमोड म्हणजे गेली अनेक वर्षे रखडलेला अभिजात मराठी भाषेच्या दर्जाचा प्रस्ताव यंदा मार्गी लागण्याची शक्यता आहे. केंद्रीय सांस्कृतिकमंत्री डॉ. महेश शर्मा यांच्याकडे राज्याने पाठपुरावा केला. त्याला यश आले. ग्रामीण विकासातही मोठी झेप सरकारने घेतली आहे.

(लेखक हे लोकमत वृत्तपत्र समूहाचे नवी दिल्ली येथील विशेष (राजकीय) प्रतिनिधी आहेत.)
**संपर्क :** ०९८१८२१३५१५

विशेष मुलाखत

# सामाजिक न्यायाची नवी दिशा



**समाजातील उपेक्षित घटकाला न्याय देण्यासाठी सध्या कार्यरत असलेल्या योजना योग्य आहेत का?**

विकासाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित असलेल्या प्रत्येक समाजातील दुर्लक्षित, उपेक्षित आणि मागास असलेल्या घटकांतील जनतेला न्याय देण्यासाठी सामाजिक न्याय विभाग महत्त्वाची भूमिका बजावत आहे. सामाजिक न्याय विभागाची सूत्र हाती घेतल्यानंतर सर्वप्रथम सामान्य जनतेच्या विविध समस्यांशी निगडित असलेल्या या विभागाच्या सध्या सुरू असलेल्या योजनांचा आढावा घेतला. तेव्हा माझ्या असे लक्षात आले की, काही योजना योग्य आहेत मात्र, सर्वसामान्य जनतेला वेळेत योजनांचा लाभ मिळण्याकरिता कार्यरत असलेल्या अनेक योजनेत प्रशासकीय सुधारणा करून त्या गतिमान करण्याची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे तातडीने या सुधारणा करण्याचा आदेश विभागाला दिले. मागास घटकांसाठी असलेल्या योजना या वेळेत लाभार्थ्यांपर्यंत पोहोचल्या तरच खऱ्या अर्थाने सरकार न्याय देऊ शकेल, असे मला वाटते.

**समाजातील वंचित आणि दुर्लक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे. यासाठी अनेक योजना सध्या कार्यरत असून समाजाच्या भल्यासाठी त्यात आवश्यक ते बदल करण्यात येतील. ज्या योजना चांगल्या आहेत, त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येईल. विकासाच्या मुख्य प्रवाहात मागास घटकांना कसे आणता येईल, त्यासाठी राज्य शासन काय उपाययोजना राबवत आहेत, आणखी काय योजना राबवता येतील, याविषयी सांगताहेत सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले.**

**मागास घटकांच्या विकासासाठी नव्याने काही उपक्रम राबवण्याचा संकल्प आहे का?**

सध्या कार्यरत असलेल्या योजनेत अनेक बदल करायचे आहेत. हे बदल केल्यास आणि योग्य वेळेत त्या त्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवल्यास या योजनातून मागास घटकांच्या विकासासाठी नक्की यश मिळेल. त्याचबरोबर नव्या योजनाही राबवण्याचा माझा मानस असून त्याप्रमाणे विभागाला त्या तयार करून प्रस्तावित करण्याच्या सूचना दिल्या आहे. विशेष घटक योजनेत मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था निधी देऊन उभारण्यात येत आहे. मात्र या उद्योगात गुणवत्ता वाढविण्यासाठी या उद्योजकांना उद्योगांबद्दल प्रशिक्षण देऊन त्यांना योग्य ते मार्गदर्शन देणारी योजना लवकरच सुरू करण्यात येणार आहे. शिवाय मागास घटकातील बेरोजगारांना रोजगार निर्मिती करण्यासाठी सामाजिक न्याय विभागांतर्गत एकूण ६ महामंडळे कार्यरत आहे. मागास घटकांतील तरुण बेरोजगारांना स्वयंपूर्ण आणि स्वावलंबी बनविण्यासाठी ही महामंडळे प्रयत्नशील आहेत.

प्रवीण राऊत

मागास घटकातील सुशिक्षित तरुणांना शासनाच्या सेवेत सहभागी करून घेण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्थांमार्फत अनुसूचित जातींच्या गुणवंत व होतकरू विद्यार्थ्यांना आवश्यकता जाणवली. त्यामुळेच आम्ही तातडीने राज्यात ३ ठिकाणी युपीएससी परीक्षेचे प्रशिक्षण केंद्राची उभारणी केली. त्याचबरोबर सध्या जातपडताळणी करतांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असून त्या दूर करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जातपडताळणी समितीचे गठन करायचा निर्णय घेतला आहे.

**राज्यातील मतिमंद, अपंग आणि अंधांना न्याय देण्यासाठी आपण काय करणार आहात?**

मतिमंद, अपंग, अंध व्यक्तींसाठी राज्यात सामाजिक न्याय विभागांतर्गत सुरू असलेल्या आणि विना अनुदानित असलेल्या आश्रमशाळा या कार्यरत आहे. त्यासाठी अपंगांना शिक्षण देणाऱ्या १२३ खाजगी संस्थांना अनुदान देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला असून याद्वारे अपंग विद्यार्थ्यांना उत्तम सुविधा मिळवून देण्याचा आमचा मानस आहे. महाराष्ट्र राज्य आर्थिक विकास महामंडळ हे अपंगांच्या प्रगतीसाठी मोठे काम करत असून या महामंडळाचा विस्तार आम्ही करणार आहोत. जेणेकरून राज्याच्या कान्याकोपऱ्यात राहणाऱ्या अपंग बांधवांना योजनांचा लाभ घेण्यासाठी मुंबई गाठावी लागणार नाही. त्याचबरोबर अपंगांच्या विकासासाठी एक स्वतंत्र संहिता तयार करण्याचे आदेशही देण्यात आले असून यामुळे अपंगांना न्याय देण्यासाठी योग्य दिशा मिळणार आहे.

**राज्यात अंधश्रद्धा ही एक मोठी समस्या आहे. त्यासाठी सामाजिक न्याय विभागाने कठोर कायदा केला असून या कायद्यांतर्गत राज्यात सर्वत्र कार्यवाही केली जाणार आहे. त्याचबरोबर शासनस्तरावर मोठ्या प्रमाणात प्रचार आणि प्रसारही केला जात असून तो अधिक व्यापक स्वरूपात करायचा आहे. त्याचबरोबर अंधश्रद्धा निर्मूलनासाठी त्या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींच्या सल्ल्यानुसार अधिक उपाययोजना सुरू आहे.**

**राज्यात ज्येष्ठ नागरिकांच्याही मोठ्या समस्या आहे, यावर आपण काय उपाययोजना करणार आहात?**

सध्या ज्येष्ठ नागरिकांची वयोमर्यादा ही ६५ असून ती ६० वर्ष करण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहे. ज्येष्ठ नागरिकांवर होणारे हल्ले आपण पाहत असून ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या कायद्यांची अंमलबजावणी अधिक कठोरपणे राबवण्यासाठी भर दिला जाणार आहे. शहरी भागात आणि ग्रामीण भागातील ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या काही प्रमाणात वेगवेगळ्या आहे. त्यांच्या आरोग्यविषयी असलेल्या समस्या, त्यांच्या करमणुकीसाठी योजना निर्माण करायच्या आहेत. ठाणे-मुंबईसारख्या शहरात ज्येष्ठ नागरिकांना सुरक्षा देण्यासाठी पोलीस विभागाशी चर्चा करून मार्ग काढण्याचा प्रयत्न करणार आहे.

**निराधार व्यक्तींच्या मानधनात वाढ करण्याची मागणी होत आहे.**

राज्यात एकूण २७ लाख निराधार लाभार्थ्यांना त्यांचे जीवनमान सन्मानजनक होण्यासाठी राज्य सरकारच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागामार्फत दरवर्षी २२०० कोटी रुपये दिले जातात. या योजनेत सध्या ६०० रुपये प्रती लाभार्थी आर्थिक मदत दिली जाते. मात्र दिली जाणारी रक्कम कमी असल्याने त्यात वाढ करण्याची मोठी मागणी केली जात आहे. या मागणीची दाखल घेऊन वाढ करण्यासंदर्भात सकारात्मक चर्चा शासनस्तरावर सुरू आहे. त्याचबरोबर स्वत:चे घर नसणाऱ्या गरजूंना घरकूल देण्यासाठी रमाई घरकूल योजनांची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी योग्य कारवाई सुरू आहे. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजना अधिक सक्षम करण्यासाठी आम्ही संकल्प केला असून या माध्यमातून भूमिहीन लाभार्थ्यांना लाभ त्वरित देण्यासाठी लवकरच सुधारित योजनांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

**लंडन येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवासस्थान मिळविण्यासाठी राज्य सरकार काय पावले उचलत आहे?**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लंडन येथे शिक्षण घेत असताना वास्तव्य केलेले निवासस्थान तेथील घरमालक लिलाव करीत असल्याचे कळले होते. त्याबाबत राज्य सरकारने त्वरित पाऊले उचलून बाबासाहेबांचे घर घेण्याकरिता सकारात्मक दृष्टिकोनातून निर्णय घेतला आहे व ही प्रक्रिया लवकरच पूर्ण होणार असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या निवासस्थानी आंतरराष्ट्रीय स्तरावरचे स्मारक आणि परदेशात शिकणाऱ्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी राहण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचा मानस मुख्यमंत्र्यांचा असून तसे निर्देशही देण्यात आले आहे.




**या विभागात मंत्री म्हणून काम करताना जनतेकडून काय अपेक्षा आहे ?**

राज्याच्या वंचित आणि शोषित घटकांसाठी काम करत असताना सामाजिक न्याय विभागामार्फत विविध योजना राबवण्याचा मानस आहे. त्याप्रमाणे काम सुरू असून लवकरच या विभागात बदल दिसून येतील. त्याचबरोबर या विभागात कोणकोणते आमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे त्या मार्गदर्शक सूचनाही मला जनतेतून येणे अपेक्षित असून आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे राज्य सरकार नक्कीच स्वागत करेल.

(लेखक हे तरुण भारत नागपूरचे मंत्रालय प्रतिनिधी आहेत.)
**संपर्क :** ०९४०३६४०९३३

# अचूकतेवर भर

**लोकराज्य अंकात 'एक दिवस मंत्र्यांसोबत' हे नवीन सदर गेल्या काही महिन्यांपासून सुरू झाले आहे. दर महिन्याचे नवीन लोकराज्य आले की आपसूकच या महिन्यात कोणते मंत्री आहेत याची उत्सुकता लागलेली असते. यावेळी 'एक दिवस मंत्र्यांसोबत' या सदरात राज्यमंत्री दीपक केसरकर यांची दिनचर्या जाणून घेण्याचा आम्ही प्रयत्न केला केला आहे...**



दोन महिन्यांपूर्वी मी मार्च महिन्यातील लोकराज्य अंकासाठी पर्यावरण मंत्री रामदास कदम यांच्याबाबत या सदरासाठी लिखाण केले होते. राज्यमंत्री दीपक केसरकर यांच्याबाबतही या सदरासाठी लिखाण करायचे ठरले, तेव्हा त्यांच्या कार्यालयात तसेच राज्यमंत्री दीपक केसरकर यांना मी याबाबतची कल्पना दिली. मागील महिन्यात( मार्च/एप्रिल) अर्थसंकल्पीय अधिवेशन असल्याने अधिवेशन संपल्यानंतरची वेळ मला या सदरासाठी त्यांच्या कार्यालयाकडून मिळाली. सदराचे नावच 'एक दिवस मंत्र्यांसोबत' असे असल्याने आमच्या टीमला या सदरासाठी एक दिवस मंत्रिमहोदयांसोबत राहायचे होते. तसे आम्ही राज्यमंत्री आणि त्यांच्या कार्यालयाला याबाबत कल्पना दिली. तेव्हा त्यांनी याबाबत उत्सुकता दाखविली. राज्यमंत्री यांच्या कार्यालयातून वेळ मिळाली. मग याबाबतचे नियोजन केले. श्री. केसरकर यांच्या कार्यालयातून बुधवारची वेळ मिळाली. मी आणि आमच्या विभागाचे छायाचित्रकार प्रज्ञेश कांबळी एकमेकांशी बोलून या मुलाखतीसाठी सज्ज झालो.

दुसऱ्या दिवशी ठरल्यानुसार आम्ही राज्यमंत्री दीपक केसरकर यांच्या बंगल्यावर सकाळी ८.३० वाजता पोहोचलो. हा शासकीय बंगला मंत्रालयाच्या समोरच आहे. बंगल्यावर पोहोचताच बंगल्यावरील निवासी स्वीय साहाय्यकांनी आम्हाला बसण्यास सांगितले. मंत्रिमहोदय रात्री उशिरा गोव्याहून आले होते.

**वर्षा फडके**

पणजी इथल्या शिवसेना शाखेच्या उद्‌घाटनाच्या कार्यक्रमाला ते उपस्थित होते. तो कार्यक्रम आटोपून ते रात्री उशिरा आल्याची माहिती स्वीय साहाय्यकांनी आम्हाला दिली. रात्री कितीही वाजता साहेब झोपले असले तरी त्यांचा दिवस सकाळी ९ वाजल्यापासून सुरू होत असल्याची माहिती या स्वीय साहाय्यकांनी दिली.

मी बंगल्यावर आलेली वृत्तपत्र चाळत असतानाच सकाळी ९ वाजता मंत्रिमहोदय बंगल्यातील आपल्या कार्यालयात आले. त्यानंतर अवघ्या काही मिनिटातच आम्हाला त्यांनी त्यांच्या कार्यालयात बोलावले. निवासी स्वीय साहाय्यकांना बोलावून आम्हाला चहा देण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या. राज्यमंत्री महोदयांनी त्यांचा आजचे कार्यक्रम आम्हाला थोडक्यात सांगितले. ते आम्हाला म्हणाले की, गेले दीड दिवस मी गोव्याला गेलो होतो. त्यामुळे या काळात मला आलेले टपाल आता मी पाहीन.... त्यानंतर ९.३०


वाजता मला सिंधुदुर्गचे काही स्थानिक प्रतिनिधी भेटायला येणार आहेत. आमच्याशी संवाद साधत असतानाच काही  लोक त्यांना भेटायला आले. कोणतीही पूर्वसूचना न देता आलेल्या लोकांनाही राज्यमंत्री भेटत होते. त्यांची निवेदने स्वीकारत होते. त्यांच्याशी बोलत होते, त्यांच्याशी संवाद साधत होते. (श्री. दीपक केसरकर सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री असल्याने त्यांना तिथले लोकप्रतिनिधी आणि नागरिक सतत भेटायला येत असतात.)

आमच्याशी संवाद साधत असताना राज्यमंत्र्यांनी त्यांना वेळ घेऊन आलेल्या लोकप्रतिनिधींना भेटायला सुरुवात केली. यावेळी त्यांच्या नेमक्या अडचणी ते समजून घेत होते. त्या अडचणी कशा सोडविता येतील याबाबत चर्चा करीत होते. लोकप्रतिनिधींनी दिलेले अर्ज स्वीकारून त्या पत्रांवर ते शेरा मारून ते पत्र स्वीय साहाय्यकांच्या हाती देत होते. काही नोंदी स्वत: आपल्या डायरीत करीत होते.

नियोजित कार्यक्रमानुसार श्री. केसरकर यांना १० वाजता मंत्रालयात सेवाग्राम विकास आराखड्या संदर्भात बैठक होती. मंत्रिमहोदयांनी याबाबत आपल्या स्वीय साहाय्यकांना कल्पना दिली. बंगल्यावर आलेल्या सर्व अभ्यागतांना भेटून ते बैठकीसाठी मंत्रालयाच्या दिशेने निघाले. आम्हीसुद्धा त्यांच्याबरोबर मंत्रालयाकडे निघालो. मंत्रालयातील सातव्या मजल्यावरील सभागृह क्रमांक ४ येथे ते बैठकीसाठी पोहोचले. या बैठकीसाठी नगरविकास, सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामविकास आदी काही महत्त्वपूर्ण विभागाचे अधिकारी हजर होते. या बैठकीत राज्यमंत्र्यांनी सेवाग्राम विकास आराखड्याबाबत सर्व माहिती जाणून घेतली. या संदर्भात कालबद्ध आराखडा तयार करावा आणि पुढील बैठक लवकरच घ्यावी अशा सूचना त्यांनी या बैठकीत दिल्या. या बैठकीत सेवाग्राम विकास आराखड्याचे अनेक प्रस्ताव आणि नकाशे सादर करण्यात आले होते. राज्यमंत्री महोदयांनी सर्व प्रस्ताव समजून घेतले. ही बैठक अंदाजे दोन तास चालली.

यानंतर मंत्रालयातील त्यांच्या दालनात कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रमासंदर्भात

त्यांनीच आयोजित केलेल्या बैठकीला ते उपस्थित राहिले. या बैठकीत पर्यटन, ग्रामविकास विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी त्यांनी कोकण हा पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण जिल्हा असल्याने पर्यटनाच्या सर्व सोयी-सुविधा पर्यटकांना मिळाव्यात आणि त्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे सांगितले. आपण सिंधुदुर्गचे



**प्रत्येक कार्यक्रमापूर्वी पूर्वतयारी करण्याची त्यांची हतोटी वेगळी असून दुसऱ्या दिवसाच्या प्रत्येक कार्यक्रमाच्या बारीकसारीक बाबींचे ते सूक्ष्म नियोजन करतात. कणकवलीला दुसऱ्या दिवशी त्यांचा दौरा होता. त्यांनी कार्यक्रम समजून घेतला. संबंधित ठिकाणी बोलायच्या मुद्यांची तयारी झाली अथवा नाही, याची माहिती जाणून घेतली आणि वेळेचीसुद्धा खात्री करून घेतली.**



पालकमंत्री असल्याने येथील पर्यटन व्यवसायाला चालना मिळण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. यासंदर्भात पुढील बैठक घेण्याच्या सूचना केल्या. साधारणपणे तासभर ही बैठक चालली. त्यानंतर राज्यमंत्री महोदयांची पुढील बैठक दुपारी २.३० वाजता राज्यमंत्री प्रवीण पोटे-पाटील यांच्या दालनात होती. तोपर्यंत त्यांनी आलेल्या नस्त्या हातावेगळ्या करण्याचे ठरविले. नस्त्यांवर सही करताना प्रत्येक विषय समजून घेतला. साधारणपणे दुपारी १.३० वाजेपर्यंत त्यांचे हे काम चालले होते. बंगल्यावर सिंधुदुर्गातून काही पाहुणे आणि स्नेही आल्याने जेवणासाठी घरी जायचे आहे, असा निरोप स्वीय साहाय्यकाने त्यांना दिला. त्यांनी घड्याळाकडे पाहिले. घरी जेवणासाठी निघत असताना आम्हालाही बंगल्यावर जेवायला चला असे आवर्जून सांगितले.

दरम्यान आम्ही आमच्या कार्यालयात आलो. पुन्हा २.३० वाजता श्री. केसरकर यांच्या पुढील बैठकीच्या ठिकाणी पोहोचलो. बरोबर दुपारी २.३० वाजता श्री. केसरकर हे राज्यमंत्री प्रवीण पोटे-पाटील यांच्या दालनात पोहोचले होते.

राज्यमंत्री प्रवीण पोटे-पाटील यांच्याशी काही मिनिटे स्वतंत्र चर्चा केल्यानंतर दोन्ही राज्यमंत्री सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाबाबतच्या बैठकीसाठी पोहोचले. ही बैठक साधारणपणे दोन तास चालली. यानंतर पाच वाजता आम्ही मंत्रिमहोदयांच्या दालनात आलो. त्यांनी त्यांच्या जिल्ह्यातील विविध कामांच्या यादीच्या पाठपुराव्यासाठी संबंधित सचिवांना फोन केले. याबाबत माहिती घेतली. त्यानंतर त्यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन, राज्याच्या वित्तीय स्थितीविषयक श्वेतपत्रिका, केळकर समितीचा अहवाल अशा विविध विषयावरची माहिती तसेच अधिवेशनादरम्यान प्रश्नोत्तरांच्या तासात आणि लक्षवेधी सूचनादरम्यान दिलेल्या उत्तराची प्रतिपूर्ती करण्यासाठी पुढील आठवड्यात बैठका घेण्यात याव्या अशा सूचनाही आपल्या स्वीय साहाय्यकांना केल्या. आमच्या दौऱ्याचा शेवट होत होता. पण या दिवसाभरात एक मंत्री म्हणून पाहताना लक्षात आले की, राज्यमंत्री पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर राज्यमंत्री केसरकर यांनी या विभागाकडे खूप लक्ष दिले आहे. एक दिवस मंत्र्यासोबतच्या शेवटच्या टप्प्यात आम्ही पोहोचलो होतो. जेव्हा ते पुन्हा बंगल्यावर जायला निघाले, आम्ही त्यांना गाडीपर्यंत सोडायला गेलो. गाडीत बसताना आमचा स्मितहास्याने मंत्रिमहोदयांनी निरोप घेतला.

❐ ❐

# गतिमान तयारी-सुयोग्य नियोजन

**येत्या जुलै महिन्यात देवभूमी नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळा भरणार आहे. यात कुठलीही कमतरता राहू नये, सर्व सुविधा वेळेच्या आधी तयार असाव्यात म्हणून जिल्हा प्रशासन शिकस्त करत आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री आणि राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांचे मार्गदर्शन, दर आठवड्याला सिंहस्थ कामाचा आढावा घेण्यासाठी होणारी भेट आणि मंत्रालयातून सातत्याने कामावर असलेली देखरेख, अधिकाऱ्यांशी नियमित असलेला संपर्क यामुळे या कामांना गती आली आहे. कोणतीही अडचण तातडीने सोडवण्यासाठी मंत्रिमहोदय प्रयत्नशील असतात.**

**कुंभमेळा ही भक्तांसाठी पर्वणी असली तरी राज्य शासन आणि जिल्हा प्रशासनासाठी परीक्षा असते. या परीक्षेची तयारी कुठपर्यंत आली ?**

तुमचे म्हणणे अगदी खरे आहे. ही आमच्यासाठी परीक्षाच आहे. जनतेला आणि साधुसंत, जे या कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे जमणार आहेत, त्यांना कसलीही अडचण येणार नाही, तक्रार करायला जागा राहणार नाही, अशी उत्तम सुविधा देऊ, हे मी खात्रीने सांगू शकतो. ही परीक्षा आम्ही शंभर टक्के उत्तीर्ण होऊ, असा मला विश्वास आहे.

अर्थात, माझा संघ, मग त्यात जिल्हाधिकारी असोत वा पोलीस आयुक्त आणि जिल्हा पोलीस अधीक्षक असो, बांधकाम विभागाचे अभियंते असोत वा नगरपालिका - महापालिका आयुक्त आणि त्यांचे सहकारी, या साऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नातून पालकमंत्री या नात्याने मी हा रथ पुढे नेऊ शकेन.

विवेक भावसार

**साधुसंतांना पुरेशी जागा मिळाली नाही म्हणून त्यांचे सरकारशी बऱ्याचदा वादविवाद झाले आहेत. ते टाळण्यासाठी आपण काय उपाययोजना केली आहे?**

खरंय. साधूंना पुरेशी जागा दिली नाही तर त्यांचा रोष पत्करावाच लागेल. कुंभमेळा हा सामान्य भाविकांसाठी पवित्र सोहळा आहेच, पण त्याहून जास्त तो साधूंचा आहे. त्यांना पुरेशी जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. आपल्याकडे नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ कुंभमेळा भरतो. नाशिकला वैष्णव पंथाचे तीन आखाडे आहेत. तर त्र्यंबकेश्वर येथे शैव पंथाचे दहा आखाडे आहेत. त्यांच्या मागणीची पूर्तता होत आहे.

**साधूंच्या निवासासाठी जागेची उपलब्धता कशी करणार आहात?**

नाशिकला २८३ एकर क्षेत्रावर साधुग्रामची उभारणी केली जात आहे. धार्मिक संस्थांच्या काही जागा आहेत. त्यातील ३३ एकर क्षेत्रही साधुग्रामच्या उभारणीसाठी उपयोगात आणले जात आहे. त्र्यंबकेश्वर येथेही दहा आखाड्यांची स्वत:च्या मालकीची जागा आहे. त्याशिवाय या ठिकाणी १५ एकर क्षेत्रावर साधुग्राम उभारले जाईल. साधुग्रामप्रमाणेच भाविकांसाठी भाविकग्राम निर्माण केले जात आहे.

**या कुंभमेळ्यातील अपेक्षित भक्तांची संख्या किती असू शकते?**

या धार्मिक सोहळ्यादरम्यान नाशिक व त्र्यंबकेश्वर या तीर्थस्थळी दररोज ५० लाख भाविक सहभागी होतील, अशी अपेक्षा आहे. शाही स्नानाच्या दिवशी एक कोटीहून अधिक भाविक शहरात दाखल होतील, अशी अपेक्षा आहे. धार्मिकस्थळी पोहोचण्यासाठी खासगी वाहनव्यवस्था उपलब्ध असेल. शिवाय सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेने प्रवास करणाऱ्यांसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या तीन हजार बसेस उपलब्ध असतील.



**या काळात स्वच्छता आणि आरोग्याचा मोठा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यासाठी काय उपाययोजना केली आहे?**

स्वच्छतेच्या दृष्टिकोनातून आम्ही भाविक व साधुसंतांसाठी २२ हजार



# भव्यदिव्य सोहळा

**ध्वज पर्व**
मंगळवार १४ जुलै २०१५

**शाही स्नान**
**नाशिक**
**पहिले** – शनिवार, २९ ऑगस्ट २०१५
**दुसरे** – रविवार, १३ सप्टेंबर २०१५
**तिसरे** – शुक्रवार, १८ सप्टेंबर २०१५

**त्र्यंबकेश्वर**
**पहिले** – शनिवार, २९ ऑगस्ट २०१५
**दुसरे** – रविवार, १३ सप्टेंबर २०१५
**तिसरे** – शुक्रवार, २५ सप्टेंबर २०१५

तात्पुरती शौचालये उभारण्याची आखणी केली आहे. शिवाय भाविकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी व्यावसायिक, उद्योजकही उत्सुक आहेत. यामध्ये महिंद्रा ॲण्ड महिंद्रा, गोदरेज, रिलायन्स आदींचा उल्लेख करता येईल. भक्तांची गैरसोय होऊ नये यासाठी साधुग्राममधील अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा, शौचालये, प्रसाधनगृहे, विद्युत व्यवस्था सुसज्ज असेल. नाशिक येथील शासकीय रुग्णालयात अतिरिक्त २०० खाटांची व्यवस्था असेल. त्र्यंबकेश्वर येथील ग्रामीण रुग्णालयदेखील सुसज्ज असेल. पिण्याच्या स्वच्छ पाणीपुरवठ्यासाठी त्र्यंबकेश्वर येथील गौतमी गोदावरी धरणातून पिण्याचे पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध केले जाईल.

**प्रदूषणाचा प्रश्न तुम्ही कसा हाताळणार आहात?**

पवित्र गोदावरी नदीत स्नान करणे हा भाविकांसाठी श्रद्धेचा विषय आहे. त्यामुळे भाविकांच्या सोयीसाठी नाशिकमध्ये ३,९९० मीटर तर त्र्यंबकेश्वर येथे ९५० मीटरचा घाट तयार आहे.

कुंभमेळा 'हरित मेळा' म्हणून प्रस्थापित करण्याचा आमचा प्रयत्न आहे. नदी प्रदूषणमुक्त आणि स्वच्छ ठेवण्यासाठी आम्ही आवश्यक त्या उपाययोजना करत आहोत.

**हरित कुंभमेळा**

हरितकुंभाच्या दृष्टीने प्लास्टिकमुक्तीसाठी ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्या वापरणाऱ्या आस्थापनांचे परवाने रद्द करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त एकनाथ डवले यांनी दिले आहेत. दरम्यान शालेय शिक्षण विभाग प्लास्टिकला पर्याय म्हणून नागरिकांना मोफत कापडी पिशव्या वितरित करण्याचा उपक्रम राबवत आहे.

**महत्त्वपूर्ण समित्या**

काटेकोर नियोजनाची खबरदारी येण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय तर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती आणि कुंभमेळ्याच्या कामासंबंधी समन्वय साधन्यासाठी राज्य उच्चस्तरीय अधिकाऱ्यांचा समावेश असलेली समन्वय समिती स्थापन करण्यात आली आहे.

**वाहनतळाची काय व्यवस्था केली आहे?**

नाशिक येथे तीन तर त्र्यंबकेश्वर येथे चार आणि कवनाई येथे एक असे एकूण आठ वाहनतळ विकसित करण्यात आले आहेत. याव्यतिरिक्त दोन त्र्यंबकेश्वर येथे तर नाशिक येथे सहा अंतर्गत वाहनतळ विकसित करण्यात आले आहेत. परिसरातील बस स्थानकांचाही विकास सुरू आहे.

**कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी कोणती खबरदारी घेतली जात आहे.**

लाखो भाविकांची गर्दी होणार असल्याने नाशिक व त्र्यंबकेश्वर येथील परिसर सीसीटीव्हीच्या निगराणीखाली असेल. शिवाय टेहळणी मनोरे, बॅरिकेड्स, बॉम्ब शोधक पथक, वायरलेस कम्युनिकेशन सिस्टम, जाहीर सूचना आदी व्यवस्था असेल. शिवाय कुंभमेळ्यादरम्यान येथे येणाऱ्या विदेशी पर्यटकांना महाराष्ट्रातील प्रमुख पर्यटनस्थळांची माहिती देऊन त्यांना आकर्षित करण्याचे प्रयत्न पर्यटन विकास महामंडळातर्फे केले जातील.

(लेखक हे दै. एशियन एज मुंबई येथील विशेष प्रतिनिधी आहेत.)
**संपर्क :** ०९९३०४०३०७३

# विद्यार्थ्यांच्या हितासाठी शुल्क आणि प्रवेश नियंत्रण



नुकत्याच संपलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये प्रलंबित शुल्क नियंत्रण व प्रवेश नियंत्रण कायदा चर्चा होऊन पारित व्हावा असा आमचा मानस होता. परंतु या विधेयकावर अधिवेशनात चर्चा झाली नाही. मात्र पावसाळी अधिवेशनात या विधेयकावर नक्कीच चर्चा होईल आणि या अध्यादेशाचे कायद्यात रूपांतर होईल.

राज्य सरकारने आणलेला शुल्क नियंत्रण व प्रवेश नियंत्रण कायदा हा मुळातच सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या विविध याचिकांवर दिलेल्या महत्त्वपूर्ण निकालानुसार आणण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार खासगी शिक्षण संस्थांच्या शिक्षण शुल्क व प्रवेश शुल्क यावर नियंत्रण ठेवण्यात येणार आहे. जोपर्यंत राज्य सरकार न्यायालयाच्या निकालनुसार सर्वसमावेशक कायदा आणत नाही, तोपर्यंत खासगी महाविद्यालयांचे शुल्क आणि प्रवेश प्रक्रियेवर नव्याने गठित केलेल्या समितीचे नियंत्रण असणार आहे. त्यामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेश आणि शुल्क निश्चितीच्या प्रक्रियेत पारदर्शकता येणार आहे. यासाठी उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली प्रवेश विनियामक प्राधिकरण आणि शिक्षण शुल्क विनियामक प्राधिकारणाची स्थापना करण्यात येणार आहे. या प्राधिकारणास दिवाणी न्यायालयाचे अधिकार असतील. कायद्याचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाईची तरतूद करण्यात आली आहे. न्यायालयाच्या निकालानुसार प्रस्तावित करण्यात आलेली यापूर्वीची समिती आणि आता नवीन कायद्यानुसार स्थापन करण्यात येणारे विनियामक प्राधिकारण यामध्ये फरक आहे.

**राज्य सरकारने आणलेला शुल्क नियंत्रण व प्रवेश नियंत्रण अध्यादेश हा शिक्षण संस्थांच्या विरोधात नसून तो विद्यार्थी हिताचा आणि त्यांच्या उच्च शिक्षणाला प्राधान्य देणारा आहे. खासगी शिक्षण संस्था एका अर्थाने सरकारच्या शिक्षण देण्याच्या कामात मदतच करीत आहेत. पण ज्या संस्था शैक्षणिक कार्याच्या नावाखाली व्यवसाय करत असतील त्यांना या कायद्याच्या माध्यमातून चाप लावण्याचा निर्धार राज्य सरकारने केला आहे.**

**विनोद तावडे**
शिक्षणमंत्री

नवीन विनियामक प्राधिकारणामध्ये सीए, आयसीडब्ल्यूए, विद्यापिठांचे माजी कुलगुरू, संचालक तंत्रशिक्षण, आरोग्य विज्ञानपिठाचे कुलुगरू याचबरोबर वित्त विभागातील उच्च अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. शुल्क नियंत्रणाबाबत वित्त विभागातील अधिकारी त्या शिक्षण संस्थांच्या प्रस्तावाची छाननी करतील. यामुळे खासगी शिक्षण संस्था तसेच विद्यार्थ्यांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होणार नाही असा निर्णय या नवीन प्राधिकारणाच्या मार्फत होणे अपेक्षित आहे. त्याचबरोबर प्रवेश नियंत्रण प्राधिकारणामध्ये तंत्रशिक्षण विभागाचे संचालक असतील. त्यांच्यामार्फत परीक्षा घेण्यात येतील. नवीन कायद्यामुळे खासगी शिक्षण संस्थाचालकांना त्यांची स्वतंत्र सीईटी परीक्षा घेता येणार नाही. या स्वतंत्र सीईटीमुळे मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याच्या तक्रारी सरकार दरबारी दाखल झाल्या आहेत. त्यामुळे राज्य सरकाराच्या वतीने एकच सीईटी परीक्षा घेण्यात येईल. विविध अभ्यासक्रमासाठी घेण्यात येणाऱ्या सामायिक प्रवेश परीक्षे (MH-CET) बाबत यात तरतूद आहे. या अध्यादेशात विविध अभ्यासक्रमासाठी घेण्यात येणारी सामायिक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (CAP) राबवण्यासाठी स्वतंत्र सामाईक प्रवेश परीक्षा आयुक्तांची नियुक्ती करण्याची तरतूद या अध्यादेशाद्वारे केली आहे. मात्र केंद्रीय परीक्षेतील प्रक्रियेद्वारे प्रवेश देण्याचे अधिकार राज्य शासनास राहणार आहेत. त्यामुळे खासगी विनाअनुदानित संस्थांना पुढील वर्षापासून स्वत:ची सीईटी घेता येणार नाही. यासमितीच्या निकषानुसारच प्रवेश देणे बंधनकारक असणार आहे. खोटी माहिती देणाऱ्या संस्था चालकावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच 'राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षण अभियान (रुसा)'ची अंमलबजावणी राज्यात करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. या माध्यमातून ३५ टक्के राज्याचा व ६५ टक्के केंद्राचा असा पुढील २ वर्षात ५५० कोटी निधी मिळणार आहे. राज्य सरकार पूरक निधी देऊन याचा उपयोग विद्यापीठात संशोधनाच्या संधी वाढविणे, गुणात्मक दर्जाचे शिक्षण देणे, स्वायत्त महाविद्यालयाचे विद्यापीठात रूपांतर करणे यासाठी होणार आहे.

**शब्दांकन : वर्षा फडके**

**माता, बालमृत्यू, कुपोषण हे राज्यातील कायमचे प्रश्न नेहमीसाठी सोडविण्याचा माझा प्रयत्न आहे. गरोदर माता व बालक यांच्या आरोग्याचा तपशील उपलब्ध व्हावा व त्यांच्यावर आवश्यक ते वैद्यकीय उपचार तातडीने करता यावे यासाठी 'मदर अँण्ड चाईल्ड ट्रॅकिंग प्रणाली'चा वापर करण्यास विभागाने सुरुवात केली आहे. जन्मत:च बाळाचे वजन व मातेचे आरोग्य आदी बाबींचा तपशील संग्रहित करून पुढील काळात बाळाचे कुपोषण नियंत्रणात आणण्यासाठी 'मदर अँण्ड चाइल्ड ट्रॅकिंग प्रणाली' महत्त्वाची ठरणार आहे.**



# निरोगी आणि सुदृढ

## डॉ. दीपक सावंत

आरोग्य मंत्री

दुर्गम व डोंगराळ भागात मातामृत्यू रोखण्यासाठी राज्यातील ५८ ठिकाणी माहेरघर योजना आम्ही सुरू केली. गर्भवतीला बाळंतपणाच्या ७ दिवस अगोदर या माहेरघरात ठेवून सर्व प्रकारची काळजी घेतली जात आहे. यामुळे मातामृत्यूचे प्रमाण कमी होत आहे.

चांदा ते बांद्यापर्यंत सर्वसामान्य माणसाला आरोग्याच्या उत्तम सुविधा मिळाव्यात, असा माझा प्रयत्न आहे. त्याचा एक भाग म्हणून सार्वजनिक आरोग्यासाठी 'ऑपरेशन कायापालट' सुरू केले आहे. प्राथमिक शहरी व ग्रामीण आरोग्य केंद्रे, उपजिल्हा व जिल्हा रुग्णालये यांना आधुनिक यंत्रसामग्री व तज्ज्ञ डॉक्टरांसह सुसज्ज करण्याचा माझा प्रयत्न आहे.

चार-पाच महिन्यांच्या कालखंडात विभागाने प्रभावी पावले उचलली आहेत. मुंबईतील जे. जे. रुग्णालयाची उंची वाढवून १००० खाटांचे हे रुग्णालय करण्याचा निर्णय असो वा औषध खरेदीत सुसूत्रता आणण्यासाठी औषध खरेदीचे धोरण पुढील काळात जाहीर करण्याचे असो, हे निर्णय आरोग्य सुविधा देण्यातील महत्त्वाचे भाग असतील. रुग्णांना निरोगी रक्ताचा पुरवठा व्हावा यासाठी रक्तदात्याच्या रक्ताच्या चाचणीसाठी नॅट (NAAT) टेस्ट राज्यातील किमान प्रमुख १६ ब्लड बँकेत उपलब्ध व्हावी, यासाठी केंद्रीय मंत्र्यांशी चर्चा केली आहे. आरोग्यविषयक जागृती करण्यासाठी ९ जिल्ह्यांत १७ ठिकाणी कम्युनिटी रेडिओ सुरू केले आहेत. संसर्गजन्य रोगांचा प्रश्न सोडविण्यासाठी मी केंद्रीय मंत्री जे.पी. नड्डा यांची दिल्लीत भेट घेतली. 'स्वाइन फ्लू'सारख्या जीवघेण्या आजारावर नियंत्रण आणण्यासाठी केंद्र सरकारकडे निधीची मागणी केली आहे. राज्याकडे प्रशिक्षित मनुष्यबळ आहे. स्वाइन फ्लूच्या तपासणीचे दर कमी करावेत, ५० खाटांपेक्षा अधिक क्षमता असणाऱ्या खासगी रुग्णालयांनी स्वाइन फ्लुच्या रुग्णांसाठी स्वतंत्र कक्ष निर्माण करावा, असे निर्देश दिले आहेत.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांबरोबर आम्ही शहरी गरिबांसाठी नागरी अभियान हाती घेतले असून ४१३ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांची दुरुस्ती, १९८ केंद्रांचे नवीन बांधकाम हाती घेण्यात आले आहे. एमडीआर व एक्सडीआरसारख्या 'टीबी'च्या गरीब रुग्णांना पोषण आहार देण्यासाठी 'आरोग्यवर्धिनी' हा उपक्रम मुंबईत सुरू केला आहे. किशोरवयीन मुला-मुलींच्या शारीरिक व मानसिक निकोप वाढीसाठी त्यांच्या वयाला भेडसावणाऱ्या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी, समुपदेशनासाठी मुख्यमंत्र्यांच्या पत्नी श्रीमती अमृता फडणवीस यांच्या हस्ते राष्ट्रीय किशोर स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत १८००२३३२६८८ या हेल्पलाइनचा शुभारंभ करण्यात आला. निरोगी महाराष्ट्राचे जे स्वप्न मी पाहत आहे ते सत्यात उतरवण्यासाठी मी प्रयत्नांची पराकाष्ठा करणार आहे.

**शब्दांकन : आकाश जगधने**

**दुर्गम भागात दुर्धर आजाराच्या निदानाबाबत टेलिमेडिसिनसारख्या अत्याधुनिक उपचार पद्धतीचा अवलंब**

**'ऑपरेशन कायापालट'द्वारे आरोग्य व्यवस्था आधुनिक यंत्रसामग्री व तज्ज्ञ डॉक्टरांसह सुसज्ज करणार**

**राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांबरोबर आता शहरी गरिबांसाठी नागरी आरोग्य अभियान राबवणार**




# शेंद्रा-बिडकीन, नव्या वळणावर...



आपल्या ऐतिहासिक खुणा अंगावर मिरवत औरंगाबाद जिल्ह्याने आधुनिकतेची कास धरली आहे. त्यामुळेच उद्योगांसाठी औरंगाबाद हे पसंतीचे ठिकाण बनले आहे. प्रस्तावित शेंद्रा बिडकीन ही स्मार्टसिटी औरंगाबादच्या वैशिष्ट्यात आणखी भर घालेल हे निश्चित.

मराठवाड्याचे विभागीय केंद्र असलेल्या औरंगाबादमध्ये ऐतिहासिक वारशांची जितकी जपणूक झाली आहे, तितकीच उद्योगांची भरभराट झाली आहे. जागतिक ऐतिहासिक स्थळ असलेले अजिंठा / वेरूळ याच जिल्ह्यात आहे आणि महाराष्ट्रात उद्योगासाठी पसंतीचा पहिला जिल्हाही औरंगाबादच आहे. ऑटो क्षेत्रासह, औषध निर्मिती, ॲल्युमिनियम प्रक्रिया, प्लास्टिक प्रक्रिया, ग्राहकोपयोगी वस्तू निर्मितीचे कारखाने, कृषिप्रक्रिया उद्योग आणि जैवतंत्रज्ञानावर आधारित अनेक उद्योग औरंगाबादेत उभे राहिले आणि वाढीस लागले आहेत. त्यामुळे ऐतिहासिक परंपरांची जपणूक करणाऱ्या औरंगाबादला पर्यटक आणि उद्योगधंद्यांत गुंतवणूक करणाऱ्यांची पसंती मिळत आहे. औरंगाबादची सध्याची जी काही वैशिष्ट्ये आहेत ती काही अलीकडच्या काळात निर्माण झालेली नाहीत. आपल्या भौगोलिक स्थानामुळे भारतातील औद्योगिकदृष्ट्या विकसित झालेल्या इतर जिल्ह्यांना जोडण्यास औरंगाबादला मदत होते, त्यामुळे चार दशकांपूर्वीच औरंगाबाद व्यापाराच्या दृष्टीने महत्त्वाचे शहर बनून गेले. भारताच्या उत्तर-पश्चिम समुद्राला जोडणाऱ्या मार्गावर औरंगाबाद येत असल्याने त्याचे महत्त्व वाढत गेले. १८८९ मध्ये शहरात पहिली सूतगिरणी सुरू झाली. यामध्ये ७०० हुन अधिक जणांना रोजगार मिळाला. १९०० मध्ये हैदराबाद-गोदावरी खोरे रेल्वे सुरू झाली. त्यानंतर उद्योगाला चालना मिळाली. अनेक कारखाने उभे राहिले.

**शेंद्रा बिडकीन मेगा इंडस्ट्रीयल पार्क डीएमआयसीअंतर्गत विकसित केला जाणार आहे. त्याला निवास, व्यापारी आणि औद्योगिक केंद्रासारख्या जागतिक दर्जाच्या सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. १० हजारांहून अधिक हेक्टरवर विकसित होणाऱ्या या प्रकल्पाची तीन टप्प्यांत उभारणी होणार. २०२२ पर्यंत २ हजार ३०० हेक्टर क्षेत्रावर विकास होणार आहे.**

वर्षा कुलकर्णी

१९६० मध्ये मराठवाडा महाराष्ट्र राज्यात विलीन झाला आणि औरंगाबादने औद्योगिक भरारी घेतली.

भौगोलिकदृष्ट्या औरंगाबाद मध्यवर्ती ठिकाणी असल्याने येथे बंदरातून कच्चा माल आणणे आणि प्रक्रिया झालेला पक्का माल निर्यात करणे खूप सोपे आणि कमी खर्चिक बनले. त्याचबरोबर पायाभूत सुविधांमध्ये झालेल्या सुधारणांमुळे व्यापार करणे अधिक सुलभ झाले आहे.





















### मोठे प्रकल्प

नाशिक, जालना, जळगाव, अहमदनगर जिल्ह्यांनी औरंगाबाद वेढला आहे. शेंद्रा-बीडकीन, चिखलठाणा आणि वाळुंज एमआयडीसी या औद्योगिक वसाहती शहराच्या अवतीभवती आहेत. शहरात अनेक मोठे प्रकल्प कार्यरत असून ऑटोमोटीव्ह, औषधनिर्माण, ॲल्युमिनियम आणि ऊर्जा क्षेत्रातील कंपन्यांसाठी पाच विशेष आर्थिक झोनची निर्मिती करण्यात आली आहे. औरंगाबादमध्ये मराठवाडा ऑटो क्लस्टर नावाने क्लस्टर निर्माण करण्यात आले आहे. महाराष्ट्रात असा प्रयोग फक्त नाशिक आणि पुणे येथे झाला आहे. इलेक्ट्रॉनिक उत्पादनात मोठे नाव असलेल्या सिमेन्स या कंपनीने येथे रेल्वे कोचेस निर्मितीचा मोठा प्रकल्प उभा केला आहे. दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉरमध्ये शेंद्रा-बिडकीन हा महत्त्वाचा प्रकल्प आहे. हे औद्योगिक क्षेत्र पूर्णत्वास गेल्यावर ८० चौरस किलोमीटरची जमीन केवळ उद्योगांसाठी समर्पित करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या प्रस्तावित शंभर स्मार्ट सिटीसाठी पहिल्या टप्प्यात सात जागा केंद्र सरकारने निश्चित केल्या आहेत. त्यापैकी गुजरातमधील ढोलेरा आणि

- **३ लाख रोजगार निर्मिती होणार**
- **कॉरिडॉरच्या दोन्ही बाजूस २०० कि.मी. परिसरात उद्योग व मूलभूत सुविधांच्या विकासासाठी फायदा.**
- **आंतरराष्ट्रीय दर्जाचे उद्योग औरंगाबादनजीक येतील. पर्यटनातही वाढ होईल.**
- **अत्याधुनिक औद्योगिक शहरात २४ तास अखंडित व नियमित विद्युत पुरवठा, शुद्ध पाणीपुरवठा, ड्रेनेज आदी उपलब्ध होईल.**


महाराष्ट्रातील शेंद्रा-बिडकीन येथे काम सुरूही झाले आहे. हे शहर ९०३ हेक्टरमध्ये वसणार आहे आणि त्यापासून औरंगाबाद औद्योगिक वसाहत अवघ्या २० किलोमीटर अंतरावर आहे. जमीन अधिग्रहण अगोदरच झाले असल्याने प्रकल्प गतीने पूर्ण करता येणार आहे.

येत्या पाच वर्षात येथे रोजगारनिर्मिती दुप्पट, तिप्पट उत्पादन आणि निर्यातीत तीनपट वाढ राज्य शासनाला अपेक्षित आहे.

येथील सर्वात मोठी प्राथमिकता आहे ती पायाभूत सुविधांची निर्मिती. एनएच २११ आणि दोन उड्डाणपुलांनी शहराचा संपर्क सोपा झाला असला तरी मलनि:सारण, पाणी पुरवठा आणि इतर पायाभूत सुविधांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. शेंद्रा-बिडकीन मेगा इंडस्ट्रीयल पार्क अर्थात एमआयपी डीएमआयसी (दिल्ली मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉर) अंतर्गत विकसित करण्यात येत आहे. एमआयसीसाठी ५०००-१०००० हेक्टरची गरज आहे. येथे जागतिकदर्जाच्या सोयी सुविधा उपलब्ध होणार करून दिल्या जाणार आहेत.

(लेखिका या मुक्त पत्रकार आहेत.)
संपर्क:०७७१५८१५१२७

# शिवशाहिरांचा सन्मान



**ज्येष्ठ इतिहास संशोधक, स्वातंत्र्यसैनिक, प्रतिभावंत साहित्यिक, शिवप्रेमींच्या तीन पिढ्यांना शिवचरित्रात न्हाऊ घालणारे अफाट वक्तृत्वाचे धनी, नकलाकार, कलाकार, दिग्दर्शक, निर्माते, कवी, संघटक, दानशूर समाजसेवक, साने गुरूजी कथामालेतील कथाकथनकार आणि विविध प्रकल्प व दुर्बल व्यक्तींचे आधारस्तंभ असलेले इतिहास संशोधक ब. मो. तथा बाबासाहेब पुरंदरे यांना यंदाचा 'महाराष्ट्रभूषण' पुरस्कार महाराष्ट्र शासनाने नुकताच जाहीर केला आहे. यानिमित्ताने हा विशेष लेख -**

डॉ. सागर देशपांडे

गेली ७५ वर्षे जगभरातल्या शिवप्रेमींच्या मनावर ज्यांनी गारुड केलं आहे ते म्हणजे 'शिवशाहीर' – बाबासाहेब पुरंदरे ! खुद्द छत्रपती शिवाजी महाराजांच्याच घराण्याच्या वंशज राजमाता सुमित्राराजे भोसले यांनी बाबासाहेबांना सन्मानपूर्वक 'शिवशाहीर' या किताबानं गौरवलं आहे असे ख्यातनाम इतिहास संशोधक.

सह्याद्रीतल्या भक्कम चिरेबंदी गडकोटांच्या टेहळणी बुरुजाप्रमाणं हा शिवशाहीर कळत्या वयापासून, आठव्या वर्षापासून या मावळमुलखाशी एकरूप झाला. शिवचरित्रातल्या हकिकतींनी अक्षरश: वेडा झाला. बेभान झाला. त्यासाठी सर्वस्व देण्याच्या निर्धारानं झपाटून गेला. पण भान ठेवून संशोधन, भटकंती करीत कष्टसाध्य अभ्यासाच्या दिशेनं मार्गस्थ झाला. 'छत्रपती शिवाजी महाराज' हे तीन शब्द त्याच्या आयुष्याचा जणू मंत्रच झाले. या मंतरलेल्या मनानंच ह्या सह्यपुत्रानं अक्षरश: जगभरातल्या मावळमनांवर शिवचरित्राचं पालाण घातलं. स्वत:सह समोरच्या हजारो लक्षावधी शिवभक्तांना ३०० वर्षापूर्वीच्या काळात नेण्याचं, शिवचरित्राचं वेड लावण्याचं, गडदुर्गांशी सलगी करण्याचं, शिवकथांचं निरूपण करण्याचं, शिवपराक्रमाच्या पोवाड्यांचं, छायाचित्रणाचं, चित्रनिर्मितीचं, अश्वमोहिमांचं 'वेड' या माणसानं लावलं.

लहानपणापासूनच घरातल्या ऐतिहासिक अन् खानदानी वातावरणाचा झालेला परिणाम, प्रख्यात चित्रकार असलेल्या वडलांमुळे समाजाच्या विविध थरातील दिग्गजांचा सहवास छोट्या बळवंतरावांना लाभला. त्यातूनच त्यांची जडणघडण होत गेली.

### इतिहास संशोधन अन् शिवचरित्राचा ध्यास

दुसरं महायुद्ध सुरू असताना वडलांनी त्याबाबत समजावून दिलेली आणि काळ्या घोंगडीवर नकाशे काढून वर्णन केलेली माहिती, जगाचा इतिहास आणि बदलता भूगोल याचं आणून दिलेलं भान, राजकीय अन् सामाजिक क्रांती व चळवळी हे सारं संचित अभ्यासता अभ्यासता, कोणत्याही मऱ्हाटी मुलाप्रमाणं मातीचे पुतळे अन् गड-किल्ले करणारे बळवंतराव पुरंदरे भारत इतिहास संशोधक मंडळाचे विद्यार्थी कधी झाले हे त्यांचं त्यांनाच कळलं नाही. पण त्यानंतर कळला, उमगला अन् उलगडला तो शिवछत्रपतींच्या कर्तृत्वाचा देदीप्यमान अन् अवघ्या भारताला ललामभूत ठरेल असा इतिहास... अन् ते त्यातच रमले, गुंतले, एकरूप झाले.

परिणामी रात्रंदिवस शिवचरित्राचा अभ्यास हाच एक ध्यास झाला... तोच श्वासही झाला. त्यातच ग. ह. खरे, शंकरराव जोशी यांच्यासारखे व्रती, त्यागी आणि साक्षेपी गुरू इतिहास संशोधक मंडळात लाभल्यानं कागदोपत्री अभ्यासाच्या जोडीला प्रत्यक्ष त्या त्या ठिकाणांचाही अभ्यास सुरू झाला. पायी, सायकलनं अन् पुढं मिळेल त्या वाहनातून लक्षावधी मैलाची भ्रमंती सुरूच राहिली आणि टोकाचे परिश्रम घेऊन संशोधित केलेलं, आचार्य अत्र्यांच्या मते खास 'महाराष्ट्ररसात' लिहिलेलं 'राजा शिवछत्रपति' हे छत्रपती शिवाजी महाराजांचं दशखंडी चरित्र १९५७ मध्ये प्रकाशित झालं. आजपर्यंत या ग्रंथाच्या १९ आवृत्या प्रकाशित झाल्या आहेत.

### भाजी विकणारे शिवशाहीर

याच दरम्यान १९५४ साली दादरा-नगर हवेलीच्या रणसंग्रामात बाबासाहेबांनी प्रत्यक्ष घेतलेला सहभाग, पोर्तुगीजांविरुद्ध झालेल्या या सशस्त्र संग्रामाच्या दरम्यान दमणगंगेच्या काठी शिवचरित्रावर दिलेलं

प्रेरणादायी व्याख्यान, पुढं पंडित नेहरूंनी या प्रश्नी नेमलेल्या अभ्यासक-संशोधकांच्या समितीचे सदस्य म्हणून घेतलेले जिवापाड कष्ट आणि याच काळात शिवचरित्राच्या प्रकाशनाकरिता सोसलेल्या मानसिक, आर्थिक व शारीरिक हालअपेष्टा - त्यासाठी हडपसरमधून कोथिंबिरीच्या पेंढ्या घेऊन मुंबईच्या भायखळा मार्केटमध्ये विकण्याचा केलेला उद्योग, अनेक लेखकांची अन् स्वतःचीही पुस्तकं गावोगावच्या शाळांमध्ये विकण्यासाठी सोसलेल्या यातना, हालअपेष्टा अन् अपमान, वडलांच्या निधनानंतर सोसलेले दारिद्र्याचे चटके, शिवचरित्र प्रकाशित झाल्यावर मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी खास बोलावून घेऊन केलेलं कौतुक आणि गेल्या ५८ वर्षांमध्ये या शिवचरित्राच्या निघालेल्या लक्षावधी प्रतींच्या आवृत्त्या... बाबासाहेबांनी या साऱ्याच अनुकूल, प्रतिकूल परिस्थितीशी एखाद्या स्थितप्रज्ञाप्रमाणे सामना केला.

### जगण्याचं प्रयोजन

एवढं सगळं एका माणसाच्या हातून कसं घडू शकतं असा आपल्याला प्रश्न पडतो. बाबासाहेब 'गंगेचंच पाणी अन् गंगेलाच अर्ध्य' असं म्हणत या साऱ्याचं श्रेय शिवचरित्र आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी घडवलेल्या प्रेरणादायी इतिहासाला देतात.

पण पु. ल. देशपांडे यांच्या एका मनोगतामधून याचं रहस्य उलगडलं आहे. पु. ल. म्हणतात, 'जगण्यासाठी फार महत्त्वाची गोष्ट मिळवावी लागते. ती म्हणजे जगण्याचं प्रयोजन. पुरंदऱ्यांना हे प्रयोजन वयाच्या १६ व्या, १७ व्या वर्षीच गवसलं, शिवचरित्र लिहिणं. हे प्रयोजन सापडल्यावर पुढल्या बिकट वाटांचे राजरस्ते झाले.

एका ड्रॉइंग मास्तराच्या बळवंत नामक मुलाला शिवनेरीच्या शिवरायानं झपाटलं. त्या झपाटलेल्या अवस्थेतच त्यांच्या जीवनाचा प्रवास चालू आहे. यापुढंही चालणार आहे. इतिहासाचा हा मोठा डोळस उपासक आहे, भक्त आहे. पण त्याच्या भक्तिमार्गावर ज्ञानदीपाचा प्रकाश आहे. निराधार विधान करायचं नाही अशी प्रतिज्ञा आहे. लिहिताना अखंड सावधपण आहे. त्यांच्या अंतःकरणातला कवी मोहोरबंद-गोंडेदार भाषा लिहितो. पण हातातला इतिहासाचा लगाम सुटत नाही. वर्तमानाच्या रिकिबीतून पाय निसटत नाही की नजर डळमळत नाही. हा इतिहासकार भूतकाळाइतकाच वर्तमानाशी जुळलेला आहे.'

### स्मरणशक्तीचं वरदान

'स्मरणशक्ती' हे बाबासाहेबांना लाभलेलं एक दैवी वरदानच म्हणावं लागेल. अगणित विषयांचे नेमक्या शब्दात तपशील मांडण्याचं अफाट कौशल्य बाबासाहेबांच्या मेंदूत कसं संग्रहित झालंय कोण जाणे ? पण स्मरणशक्ती, परिश्रमपूर्वक केलेलं संशोधन आणि अभ्यास, लक्षावधी मैलांची भ्रमंती, पुरंदऱ्यांच्या घरातल्या चांदीच्या ताटवाट्यांमधल्या मेजवान्यांपासून ते दोन वेळचं पुरेसं जेवण नाही आणि पायात घालायला वहाणाही नाहीत इथंपर्यंत जीवनाचे सारे भोग आनंदानं सोसलेल्या बाबासाहेबांना असामान्य प्रतिभा प्राप्त झाली आहे.

### मौलिक साहित्यसंपदा

बाबासाहेबांनी शालेय जीवनापासून कथाकथनाला आणि ऐतिहासिक लेखनाला सुरुवात केली होती. पुढं पुढं वाढत्या अभ्यासानंतर आणि फिरून तो मुलूख पाहिल्यानंतर, खास मावळी भाषेत ओथंबलेलं त्यांचं लिखाण वाचकप्रिय तर होऊ लागलंच, पण त्यांच्या व्याख्यानांप्रमाणे या लेखनाचेही संस्कार घराघरातल्या वाचकांवर होऊ लागले. जाळत्या ठिणग्या, मुजऱ्याचे मानकरी, पुरंदरच्या बुरुजावरून, पुरंदऱ्यांची नौबत, दौलत, सरकारवाडा, कलावंतिणीचा सज्जा, महाराज आणि पुढं शेलारखिंड अशी पुस्तकांची मालिका प्रकाशित होत होती.

'राजा शिवछत्रपती' हा महाग्रंथ आपल्या घरी असणं हे पवित्र कर्तव्य असल्याचंच मानलं जाऊ लागलं. पण त्याचबरोबर 'शेलारखिंड' या ऐतिहासिक कादंबरीमध्ये बाबासाहेबांनी चितारलेली सर्जा डोंबाऱ्याची शौर्यकहाणी अन् प्रेमकहाणी तर मराठी ललित वाङ्मयाचं भूषण ठरावी अशीच जमली.

लेखनी चालवत असतानाच बाबासाहेबांच्या व्याख्यानमालाही सुरू होत्या, विश्रांती हा शब्दच शब्दकोशात नव्हता, फिरतीला काळ-वेळ नव्हता, वेळेला तहानभुकेचं भान नव्हतं, मानापमानाची ओढाताण मानली जात नव्हती की कौतुकाच्या शब्दांनी कर्तव्यकसूरता होत नव्हती, संशोधनाच्या परिश्रमांना दिवसरात्रीचं बंधन नव्हतं, पण त्याचवेळी दिलेला शब्द अन् वेळ पाळण्याचा आजन्म हट्ट होता.

### भटकंती

स्वतः बाबासाहेबांना गड-कोट हिंडण्याची, दऱ्या खोऱ्या धुंडाळण्याची मोठी हौस. अगदी मुसलमान मुल्ला-मौलवींनी पाहिल्या

## आपले महाराष्ट्र भूषण



**पु. ल. देशपांडे**
१९९७ (साहित्य)



**लता मंगेशकर**
१९९८ (संगीत)



**सुनील गावस्कर**
१९९९ (क्रीडा)



**डॉ. विजय भाटकर**
२००० (विज्ञान)



**सचिन तेंडुलकर**
२००१ (क्रीडा)

## शिवसृष्टी अन् 'जाणता राजा' साकारला



**छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला १९७४ मध्ये ३०० वर्षे पूर्ण झाली. अनेक शिवभक्तांनी आणि संघटनांनी बाबासाहेबांना गळ घातली. यानिमित्तानं शिवचरित्रच एका भव्य स्वरूपात मांडण्याची संकल्पना पुढं आली. सगळीच जोखीम बाबासाहेबांच्या खांद्यावर आली. मुंबईत शिवाजी पार्कवर ही शिवसृष्टी साकारण्यासाठी बाबासाहेबांनी अक्षरशः रक्ताचं पाणी केलं. दिवसरात्र एक केली. त्यामुळे न भूतो न भविष्यति अशी शिवसृष्टी लक्षावधी शिवभक्तांना पहायला मिळाली. त्यामध्ये सादर करण्यात आलेल्या राज्याभिषेकाच्या प्रत्यक्ष छोट्या प्रयोगामध्येच 'जाणता राजा' या महानाट्याची बीजं रोवली गेली. पुढं २००-२५० कलाकार, तीन मजली रंगमंच, हत्ती, घोडे, उंट, बैलगाड्या यांचा प्रत्यक्ष वापर केलेलं, पूर्णतः ध्वनिमुद्रित केलेलं 'जाणता राजा' हे जगातील दुसऱ्या क्रमांकाचं महानाट्य म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी दि. १४ एप्रिल १९८४ रोजी साकारलं. छत्रपती शिवाजी महाराजांचं हे प्रेरणादायी चरित्र आता मराठी, हिंदी, इंग्रजी या तीनही भाषांमधून रंगमंचावर आलं अन् गेल्या ३१ वर्षात भारतातील अनेक राज्यांमध्ये अन् खुद्द इंग्लंड, अमेरिकेतही त्याचे हजारांवर प्रयोग झाले.**

नसतील इतक्या मशिदी अन् दर्गे बाबासाहेबांनी पाहिले आहेत, अभ्यासले आहेत, त्यातील वास्तुशिल्पे आणि कलाकुसर याबद्दल ते भरभरून सांगत असतात.

प्रत्यक्ष छत्रपती शिवाजी महाराज ज्या ज्या ठिकाणी गेले त्या पवित्र मातीचा गंध भाळी लावून हा संशोधक भटकू लागला, शिवगान गाऊ लागला, तरुणांमध्ये प्रेरणांचं बीज पेरू लागला अन् महाराष्ट्राच्या घराघरातून शिवचरित्राच्या वाचनाची पारायणं होऊ लागली. तरुण-तरुणींना अन् इतिहासप्रेमींना आपले उपेक्षित गड-किल्ले साद घालू लागले. कुणी घोड्यांच्या मोहिमा काढू लागलं तर कुणी चित्रं-छायाचित्रं यांमधून गडकोटांच्या स्मृती जागवू लागला. त्यासाठी बाबासाहेबांनी स्वतः अशा अनेक शिवभक्तांना, संस्था, संघटना यांना परिश्रमपूर्वक सर्व प्रकारचे सहकार्य केले आहे. त्यामुळेच विजयदुर्ग किल्याचा अष्टशताब्दी महोत्सव असो, सिंधुदुर्ग किल्याचा प्रेरणोत्सव असो की राजमाची परिसरातली विकास कामं असोत - अशा प्रत्येक गडकिल्याच्या परिसरात तरुणांनी आणि ग्रामस्थांनी बाबासाहेबांच्या प्रेरणेतून साकारलेला विधायक कामांचा आविष्कार पाहायला मिळेल.


### परंपरा दानधर्माची

शिवचरित्रविषयक जगभरात दिलेली सुमारे १२ हजारांपेक्षा अधिक व्याख्यानं, 'जाणता राजा' चे शेकडो प्रयोग या साऱ्यांतून बाबासाहेबांनी मंदिरं, मशिदी, दर्गे, शाळा, ग्रंथालयं, इस्पितळं, रुग्णोपचार, भूकंपग्रस्त या व अशा अनेक गरजू व्यक्ती आणि प्रकल्पांसाठी कोट्यवधी रुपयांची थेट मदत तर केलीच, पण या महानाट्यामुळे संयोजकांनी उभारलेल्या निधीतून महाराष्ट्र आणि बृहन्महाराष्ट्रात अनेक मोठी विधायक कामं उभी राहु शकली.

'जाणता राजा' बरोबरच 'खांदेरी-उंदेरीचा रणसंग्राम,' 'फुलवंती' हे नाटक, 'राजमाता' हा बाबासाहेबांनी लिहिलेला आणि सुनीताबाई देशपांडे यांनी सादर केलेला दोन तासांचा एकपात्री नाट्यप्रयोग याचीही निर्मिती झाली. 'पुराव्याशिवाय काही करू नये, जे करू ते लोकोपयोगी अन् भव्य स्वरूपात करू' असा मंत्रच त्यांनी दिला.

जात-पात, धर्म न पाहता समाजाच्या सर्व थरातील गरीब, गरजू मुलांना शिक्षणासाठी स्वतःच्या घरी ठेवून घेतलं. त्यात अगदी मुसलमान विद्यार्थीही होते. अशा ५० पेक्षा अधिक मुलांनी


## आपले महाराष्ट्र भूषण



**पं.भीमसेन जोशी**
२००२ (संगीत)



**डॉ.अभय बंग आणि डॉ. राणी बंग**
२००३ (समाजप्रबोधन)



**डॉ. बाबा आमटे**
२००४ (समाजप्रबोधन)



**डॉ. रघुनाथ माशेलकर**
२००५ (विज्ञान)



**रतन टाटा**
२००६ (उद्योग)

## अविस्मरणीय मुलाखत

**छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवनचरित्र तमाम महाराष्ट्रासाठी कायम प्रेरणादायी आहे. हे प्रात:स्मरणीय चरित्र जेव्हा शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्याकडून ऐकले जाते तेव्हा रोमांच उभे राहतात. या रोमांचकारी अमृत शब्दाचा आनंद घेणाऱ्या नीत पिढ्या महाराष्ट्रात आहेत. शिवचरित्रासाठी आयुष्य वेचणाऱ्या या महान चरित्रकाराला महाराष्ट्र शासनाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार 'महाराष्ट्र भूषण' जाहीर झाला. महाराष्ट्रातील शिवचरित्रप्रेमी नागरिकांना बाबासाहेबांची शिवचरित्र ऐकवण्याची ओघवती शैली यावेळी आठवली नाही तर नवल! अशीच एक आठवण माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडे 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमामुळे या संग्रही राहिली आहे. १८ फेब्रुवारी २०१० रोजी बाबासाहेबांची मुलाखत प्रसारीत झाली होती. शिवचरित्र, शिवाजी महाराजांचा राज्यकारभार, जाणता राजा आणि चरित्र निर्मितीचा त्यांचा प्रवास यावर बाबासाहेब या मुलाखतीत भरभरून बोलले. त्यांनी महाराष्ट्रातील संत साहित्य, महाराष्ट्राने इतिहासात नोंदवलेले देशाप्रतीचे दायित्व आणि दिलेले शूरवीर याचे अनेक ऐतिहासिक दाखले यावेळी दिले आहेत. बाबासाहेब या मुलाखतीसाठी मुंबईत उपलब्ध होऊ शकत नव्हते. त्यामुळे पुणे येथे त्यांच्या निवासस्थानी जाऊन 'जय महाराष्ट्र' टीमने ही मुलाखत घेतली होती. या मुलाखतीस दर्शकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. अनेक अभ्यासक या मुलाखतीचा संदर्भ कायम विभागाकडून मागवत असतात. या टीममधील अनेकांसाठी हा एक अविस्मरणीय क्षण आहे.**

बाबासाहेबांच्या मायेच्या सावलीत राहुन आपलं शिक्षण पूर्ण केलं. त्यांचे ते पालक झाले आणि आज त्यातला कुणी सरकारी सेवेत आहे, तर कुणी चार्टर्ड अकाऊंटंट बनला आहे.

### शिवकल्याण राजा

१९७४ मध्ये शिवराज्याभिषेकाच्या त्रिशताब्दीच्या निमित्तानं स्वत: लतादीदींनी 'शिवकल्याण राजा' या ध्वनिमुद्रिकेची निर्मिती करायचं ठरवलं. कविवर्य शंकर वैद्य, स्वातंत्र्यवीर सावरकर, समर्थ रामदास यांचं काव्य, पं. हृदयनाथांनी दिलेलं तेजस्वी संगीत, मंगेशकर भावंडांचा प्रेरणादायी स्वर अन् त्याच्या जोडीला स्वतः बाबासाहेबांनी लिहिलेलं आणि त्यांनीच सादर केलेलं निवेदन असा हा भरजरी नजराणा सकळ शिवभक्तांसमोर सादर झाला. 'शिवकल्याण राजा' च्या प्रत्यक्ष सादरीकरणाच्या कार्यक्रमातदेखील स्वतः बाबासाहेब निवेदन करीत असतात. लतादीदींच्या कल्पनेतून असा कार्यक्रम थेट रायगडावरही सादर झाला होता.

### शताब्दीच्या उंबरठ्यावरील संकल्प

मुंबईतल्या वजिबदार यांच्याकडून लक्षावधी रुपये खर्चून बाबासाहेबांनी अत्यंत भव्य आणि आकर्षक स्वरूपाची शिवचरित्रावरची पेंटिंग्ज तयार करून घेतली आहेत. ती आर्ट गॅलरीच्या माध्यमातून त्यांना शिवभक्तांसमोर आणायची आहेत. 'जाणता राजा' हे महानाट्य आता पुन्हा नव्या स्वरूपात त्यांना युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया अशा देशोदेशी घेऊन जायचं आहे. 'लेसर शो'च्या माध्यमातून शिवचरित्र कसे मांडावे? याचाही त्यांचा अभ्यास सुरू आहे. पुण्याजवळील आंबेगाव इथं बाबासाहेबांनी महाराजा प्रतिष्ठानच्या माध्यमातून शिवसृष्टी उभारण्याचं अवघड व्रत हाती घेतले आहे.

२९ जुलै १९२२ ही बाबासाहेबांची जन्मतारीख. लवकरच बाबासाहेब वयाची ९३ वर्षे पूर्ण करून ९४ व्या वर्षात पदार्पण करतील. जेजुरीचे खंडेराव अन् तुळजाभवानी ही पुरंदऱ्यांची कुलदैवतं. त्यांना समस्त शिवभक्तांच्या वतीने आपण गाऱ्हाणं घालू या, या शिवशाहिराला उत्तम आरोग्यासह दीर्घायुष्य द्या! शिवचरित्र ब्रह्मांडापल्याड नेण्यासाठी!

(लेखक हे जडणघडण मासिकाचे संपादक आणि शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या चरित्राचे लेखक आहेत.)
संपर्क:०९८५०८८५९३६



**आर. के. पाटील**
२००७ (समाजप्रबोधन)



**डॉ. नानासाहेब धर्माधिकारी**
२००८ (समाजप्रबोधन)



**मंगेश पाडगावकर**
२००८ (साहित्य)



**सुलोचना लाटकर**
२००९ (मराठी चित्रपट)



**डॉ. जयंत नारळीकर**
२०१० (विज्ञान)



**डॉ. अनिल काकोडकर**
२०११ (विज्ञान)



# हवामानाचं चाललंय तरी काय?

**भरमसाठ वृक्षतोड, कार्बन उत्सर्जनात झालेली प्रमाणापेक्षा जास्त वाढ आणि लोकसंख्येचा भार यामुळे एकूणच हवामानात प्रचंड प्रमाणात बदल झालेला दिसून येतो. त्याचमुळे अवर्षणप्रवणता एका बाजूला वाढत असताना महापुरांमुळे हजारो लोक दुसऱ्या बाजूला प्रभावित होत आहेत. एकूणच हवामानातील बदलामुळे ऋतुचक्रात बदल होत आहे. त्याचे दुष्परिणाम सर्व जगात दिसून येत आहेत.**

अभिजीत घोरपडे

अलीकडच्या काळात सर्वाधिक विचारला जाणारा हा प्रश्न.. मग तो ग्रामीण भाग असो, नाहीतर शहरी भाग. ग्रामीण भागात पिकांचे नुकसान सोसावे लागते म्हणून, तर शहरी भागात होणारी गैरसोय आणि बऱ्याचशा प्रमाणात उत्सुकता म्हणूनही!

या चर्चेला कारणीभूत ठरला, ऐन उन्हाळ्याच्या तोंडावर पडणारा पाऊस आणि प्रचंड प्रमाणत होणारी गारपीट ! त्याच्यामुळे कोकणातील आंब्यापासून देशावर द्राक्षे, केळी, इतर फळबागा, रब्बीची पिके यांचे होणारे नुकसान ओघाने आलेच. बहुतांश पिकांच्या बाबतीत घास हाताशी आलेला असताना फटका बसला.

तो जिव्हारी लागणारा होता. तसे अधूनमधून हे व्हायचेच. म्हणून तर ऐन उन्हाळ्यातला पाऊस आणि पडणाऱ्या गारा सर्वांनाच परिचित आहेत. पण गेल्या वर्षी (२०१४) ते मोठ्या प्रमाणात घडले. फेब्रुवारी ते एप्रिल या काळात महाराष्ट्रात कुठे ना कुठे ते घडतच होते... पण गेल्या वर्षी हे इतक्या मोठ्या प्रमाणावर पहिल्यांदाच घडले. त्यामुळे त्याच्याकडे पाहिले गेले, एक अपवाद म्हणून! कारण हवामानात निसर्गत:च इतके चढउतार असतात की, मधूनच कधीतरी असेही घडते. हा अपवादच नियम सिद्ध करणारा ठरतो. मात्र, असेच काहीसे पुन्हा आताच्या वर्षी (२०१५) घडले. त्यामुळे त्याचे गांभीर्य वाढले, ते काळजी करण्याचे कारणही वाटले.

हवामानातील चढउतारामुळे काय होऊ शकते, हे समजून घेण्यासाठी लांब कुठे जायची आवश्यकता नाही. याच वर्षीच्या महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवालात ते अधोरेखित झाले आहे. सरासरीच्या केवळ ७० टक्के पाऊस झाल्यामुळे कृषिउत्पन्नात घट झाल्याची दखल त्यात घेण्यात आली आहे.

कळीचा मुद्दा आहे या बदलांमागच्या कारणांचा आणि त्यात खरंच काही बदल झाले आहेत का याचा. आताच्या गारपिटीच्या मुळाशी जायचे, तर हवामान विभागाला त्यात वेगळे वाटत नाही. हा मुद्दा चर्चेला घेतला की हवामान विभागातील मंडळी सवाल करतात, 'अहो, आपल्याकडे या दिवसांत पाऊस पडतोच, मग तो अवकाळी कसा?' अर्थात आता वर्तमानपत्रे, वृत्तवाहिन्यांसारखी माध्यमे 'अवकाळी'च्या माध्यमातून जणू जगबुडी झाल्यासारखे चित्र उभे करतात हेही खरंच! पण याकडे हवामान विभागाचे पाहणे हे दुसरे टोक. या दिवसांत पाऊस पडतो हे

तांत्रिकदृष्ट्या खरं असेल, आहेसुद्धा. पण या गोष्टीला तांत्रिकतेच्या पलीकडेही पैलू आहेत. हवामानातील छोट्याशा चढ-उतारांचा लोकांवर जो परिणाम होतो, त्याच्याशी त्यांना काहीच देणेघेणे नाही का, अशीच शंका येते.

उन्हाळ्याच्या तोंडावर असा वादळी पाऊस, गारपीट होण्यामागे हवामानाचे विशिष्ट कारण आहे. हिमालय व उत्तरेकडील प्रदेशात 'वेस्टर्न डिस्टर्बन्सेस' नावाचा घटक प्रभाव टाकत असतो. म्हणजे त्या भागात पश्चिमेकडून बाष्पयुक्त वारे येतात.  मान्सूनचा काळ वगळता वर्षभर तो अधिक सक्रिय असतो. त्याचा परिणाम म्हणूनच हिमालयात मोठ्या प्रमाणात हिमवृष्टी होत असते. या 'वेस्टर्न डिस्टर्बन्सेन'प्रमाणेच कधी पूर्वेकडूनही वारे येत असतात. पूर्वेकडून येतात म्हणजे ते बंगालच्या उपसागरावरून बाष्प आणतात. हे दोन्ही प्रकारचे वारे कधीकधी एकमेकांना भिडतात. त्या वेळी उत्तर भारत, मध्य भारत आणि महाराष्ट्रासह आसपासच्या राज्यांमध्ये वादळी पाऊस, गारपीट




होते. हवामानशास्त्रीय नोंदी असे सांगतात की, मार्च महिन्यात पाच ते सहा वेस्टर्न डिस्टर्बन्सेस येतात. त्यापैकी एक-दोन पूर्वेकडून येणाऱ्या वाऱ्यांशी भिडतात. गुढीपाडव्यापर्यंत (२१ मार्च) असे चार वेस्टर्न डिस्टर्बन्सेस आले होते. मार्चच्या अखेरीस आणखी एक येईल, असा अंदाज होता. आतापर्यंत आलेले जवळजवळ सर्व वेस्टर्न डिस्टर्बन्सेस पूर्वेकडील वाऱ्यांना भिडले. त्यामुळेच आपल्याकडे उन्हाळ्याच्या तोंडावर एकापाठोपाठ एक असा वादळी पाऊस, गारपिटीचा तडाखा बसला.

पाऊस, गारपिटीची तीव्रता गेली सलग दोन वर्षं मोठी होती. या बदलांच्या मुळाशी नेमके काय आहे, याचे समाधानकारक उत्तर अजून तरी हवामान विभाग देऊ शकलेला नाही. दरम्यानच्या काळात शेतीची आर्थिक गणिते बरीच बदलली आहेत. लहानशा घटनेमुळेसुद्धा होणारे नुकसान आता कितीतरी पटीने वाढते. त्यामुळे आता त्याची चर्चा मोठ्या स्वरात होणे स्वाभाविक आहे.

आता मुद्दा उरतो- या बदलांमधील सातत्याचा. पुढंही हे असंच होत राहणार का? ही लोकांची काळजी आहे. त्याचा संबंध माणूस करत असलेल्या प्रदूषणाशी, नैसर्गिक साधनसंपत्तीच्या हानीशी आहे का, याबाबत उत्सुकताही आहे. जागतिक तापमानवाढ (ग्लोबल वॉर्मिंग) आणि त्याच्यामुळे होणारे हवामानबदल हे वास्तव आहेच, पण वादळी पाऊस, गारपीट यांची वाढलेली तीव्रता हे त्याचेच परिणाम आहेत का, हे सांगणे कठीण आहे. कारण तसा संबंध जोडण्यासाठी किमान काही शतकांच्या घटना आणि त्यांचा कल पाहावा लागतो. केवळ दोन-चार वर्षांच्या अनुभवावरून तसा निष्कर्ष काढता येत नाही.

एक बाब मात्र निश्चित- असे बदल घडत असताना त्यांच्याशी जुळवून घेण्यासाठी नैसर्गिक व्यवस्थांचे जतन आणि संवर्धन करणे आवश्यक ठरते. सध्याच्या परिस्थितीत पावसाचा काळ बदलत असेल तर आपल्याला गरज असताना पाणी उपलब्ध होणे, कमी वेळात जास्त पाऊस पडण्यामुळे येणारे पुराच्या समस्येतून मार्ग काढणे महत्त्वाचे ठरते. त्यासाठी परिसरातील नद्या, तळी,पाणथळींसारख्या जलव्यवस्था चांगल्या स्थितीत राहणे गरजेचे आहे. सध्या त्यांची स्थिती पुरती बिघडलेली आहे. हवामानात बदल होत असताना आणि ते नेमके कशा दिशेने होणार याबाबत शाश्वती नसताना सर्वच नैसर्गिक व्यवस्थांचे महत्त्व ठळकपणे समोर येते. या व्यवस्थांचे संवर्धन करणे आणि हवामानाच्या बदलांनुसार जुळवून घेणे हेच तातडीचे उपाय आपल्या हातात आहेत.

वसुंधरा दिनाच्या निमित्ताने खेदाने सांगावेसे वाटते की, या दोन्ही बाबतीत महाराष्ट्र हे राज्य म्हणून आणि भारत हा देश म्हणून आपण योग्य वाटेवर चाललेलो नाही. शाश्वत विकासाचा विचार करून पर्यावरणपूरक धोरणे, लोकांमध्ये नैसर्गिक साधनसंपत्तीबाबत  पुरेशी जागरूकता, कचऱ्यासारख्या समस्येचे व्यवस्थापन, साधनसंपत्तीच्या वपराबाबतची शिस्त अशा बाबतीत आपण खूप मागे आहोत. दीर्घकाळ प्रगती करायची असेल तर हे चित्र बदलावे तर लागेलच.. कारण सध्या तरी त्याच्याशिवाय दुसरा मार्ग दिसत नाही... आणि हे चित्र बदलायला बाहेरून कोणी थोर पुरुष, महात्मा, प्रेषित येणार नाही. हे काम आपल्यालाच हाती घ्यावे लागणार आहे. त्यामुळे मरगळ झटकून सज्ज व्हा. निदान संसाधनांचा अपव्यय टाळून आपला खारीचा वाटा उचला.

(लेखक पर्यावरण अभ्यासक आणि
दै. लोकसत्ताचे ज्येष्ठ पत्रकार आहेत.)
**संपर्क:०९८२२८४०४३६**

# दुष्काळमुक्तीसाठी देवस्थानांची मदत




राज्य दुष्काळमुक्त व्हावे आणि शेती समृद्ध व्हावी यासाठी सिद्धीविनायक संस्थान व शिर्डी संस्थानने पुढाकार घेऊन आदर्श निर्माण केला आहे. दुष्काळमुक्त महाराष्ट्रासाठी जलयुक्त शिवार अभियानात व्यावसायिकांनी योगदान द्यावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत या संस्थांनी एका जिल्ह्यास एक कोटी रुपये याप्रमाणे ३४ जिल्ह्यांसाठी निधी देण्याचे जाहीर केले आहे. दरम्यान राज्यातील चारशे गावे दत्तक घेण्याचा संकल्पही स्वयंसेवी संस्थांनी केला आहे.

जलयुक्त शिवार अभियानाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सह्याद्री अतिथीगृहात आयोजित करण्यात आलेल्या एका बैठकीत या संस्थांनी अभियानात योगदान देण्याचा संकल्प जाहीर केला. यावेळी जलसंधारण राज्यमंत्री विजय शिवतारे, मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय, जलसंधारण विभागाचे सचिव प्रभाकर देशमुख, डिलीव्हरिंग चेंज फाऊंडेशनचे अभिजित पवार आदी उपस्थित होते. शाश्वत सिंचनाचे उद्दिष्ट असलेल्या या अभियानातून दरवर्षी पाच हजार गावे दुष्काळमुक्त होणार आहे. जलयुक्त शिवार अभियान हा केवळ शासकीय उपक्रम नसून, त्यात नागरिकांचा व व्यावसायिकांचाही सहभाग आवश्यक आहे. व्यावसायिकांनी दत्तक घेतल्यामुळे एखादे गाव जर दुष्काळमुक्त झाले तर त्याचे संपूर्ण श्रेय त्या व्यावसायिकाला देण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. या बैठकीस या अभियानात योगदान देणाऱ्या अंबुजा, जे.एस.डब्ल्यू फाऊंडेशन, अदानी, एच.यू.एल फाऊंडेशन, फिनोलेक्स, रिलायन्स फाऊंडेशन, एशियन पेंट, एल अँड टी, महिंद्रा अँड महिंद्रा, कोका कोला आदी विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# महाराष्ट्र लोक सेवा हक्क अध्यादेश

नागरिकांना निश्चित कालमर्यादेत शासनाच्या सेवा मिळाव्यात यासाठी 'महाराष्ट्र लोक सेवा हक्क अध्यादेश २०१५' काढण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या अध्यादेशानुसार सुरुवातीच्या टप्प्यात साधारणत: १६० सेवा उपलब्ध करण्यात येतील.

महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क अधिनियमाचा मसुदा नुकत्याच पार पडलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधानसभेत मांडण्यात आला होता. विहित कालावधीत सेवा न पुरविणाऱ्या किंवा सेवा पुरविण्यास कसूर करणाऱ्या पदनिर्देशित अधिकाऱ्यांना किमान ५०० रुपये व कमाल ५ हजार रुपये दंड करण्याची तरतूद यामध्ये करण्यात आली आहे. या विधेयकातील तरतुदी तातडीने अमलात येण्याच्या दृष्टीने राज्यपालांच्या मान्यतेसाठी अध्यादेश सादर करण्यात आला होता. त्याला मान्यता देण्यात आली. पावसाळी अधिवेशनात या अध्यादेशाला विधेयकाचे स्वरूप देण्यात येणार आहे.

## तारांकित

### 'ई सहकार आणि ई-टेंडरिंग' पोर्टलला राष्ट्रीय पुरस्कार

महाराष्ट्र शासनाच्या 'ई टेंडरिंग' पोर्टलला प्लॅटिनम पुरस्कार तर सहकार विभागाच्या 'ई सहकार' वेब पोर्टलच्या तंत्रज्ञानाच्या अभिनव प्रयोगाला केंद्र शासनाचा रौप्य पुरस्कार मिळाला आहे. केंद्रीय दूरसंचार व माहिती तंत्रज्ञान मंत्री रवीशंकर प्रसाद यांच्या हस्ते संबंधित अधिकाऱ्यांनी सन्मान स्वीकारला.

महाराष्ट्र शासनाचा माहिती व तंत्रज्ञान विभाग सातत्याने उत्तम कार्य करत असून देशात अग्रेसर आहे. शासनाचे सर्व विभाग माहिती तंत्रज्ञानाने जोडले असून महाराष्ट्र




शासन देशातील अन्य राज्यांसाठी मार्गदर्शक ठरले आहे.

नॅशनल इन्फर्मेटिक सेंटर (एनआयसी) आणि डिपार्टमेंट ऑफ इलेक्ट्रॉनिक अॅण्ड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात देशातील विविध सरकारी माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या वेब पोर्टलसाठी 'वेब रत्न पुरस्कार २०१४' प्रदान करण्यात आले. राज्यांसाठी देण्यात आलेल्या पुरस्कारात महाराष्ट्र शासनाच्या 'ई टेंडरिंग' पोर्टलला देण्यात आलेला देशातील सर्वोच्च प्लॅटिनम पुरस्कार माहिती व तंत्रज्ञान विभागाचे संचालक विरेंद्र सिंह यांनी स्वीकारला. सहकार विभागाच्या 'ई सहकार' वेब पोर्टलला मिळालेला पुरस्कार राज्याचे सहकार आयुक्त चंद्रकांत दळवी यांनी स्वीकारला. या पोर्टलवर राज्यातील सर्व सहकारी संस्थांची माहिती उपलब्ध करून दिली आहे.

# महाराष्ट्राकडून नेपाळला भरीव मदत

महाराष्ट्राने नेपाळवर कोसळलेल्या भूकंपाच्या संकटात राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, परराष्ट्र मंत्रालय यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणात मदतीचा ओघ सुरू केला आहे. या काळात इस्रायल दौऱ्यावर असणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या कामावर कायम लक्ष ठेऊन होते. मुख्यमंत्र्यांनी पहिली प्राथमिकता महाराष्ट्रातील जनतेला त्यांच्या घरापर्यंत पोहोचविण्याच्या कार्याला दिली.

नेपाळला २५ एप्रिलला भूकंप आल्यानंतर मुंबई येथे मंत्रालयात आपत्ती व्यवस्थापन विभागाचे संचालक सुहास दिवसे व नवी दिल्ली येथील अतिरिक्त आयुक्त समीर सहाय यांच्या नेतृत्वात मदत केंद्राची निर्मिती करण्यात आली. या केंद्राशी नेपाळ येथील महाराष्ट्रातील पर्यटक, त्यांचे नातेवाईक, पर्यटन कंपन्या, एप्रिलपर्यंत नवी दिल्ली येथील मदत केंद्रातून ३०७ पर्यटक पोहोचल्याची नोंद करण्यात आली आहे. यापैकी बहुतेक पर्यटक हे एअर इंडियाच्या विमानाने दिल्लीत पोहोचले होते. रस्ते मार्गाने अनेक जण परस्पर महाराष्ट्रात पोहोचले. या सर्वांच्या सुखरूप पोहोचण्याची नोंद मुंबई व दिल्ली केंद्राकडून घेतली जात आहे. राज्यातील जवळपास १२०० पर्यटक या दुर्घटनेच्या वेळी नेपाळमध्ये होते. त्यापैकी बहुतांश घटनेनंतरच्या पाच दिवसांत महाराष्ट्रात सुखरूप पोहोचले आहेत. दिल्लीच्या महाराष्ट्र सदनात या पर्यटकांच्या निवासाची व जेवणाची मोफत सुविधा करण्यात आली. आवश्यकता असेल त्यांना रेल्वेचे मोफत तिकिट उपलब्ध करण्यात आले. अशा आणीबाणीच्या प्रसंगात काम करण्याची सवय असणाऱ्या वैद्यकीय



गिर्यारोहक व नेपाळमध्ये पर्यटनावर वा निवासी असणारे सरकारी कर्मचारी, उद्योजक यांचा संपर्क साधण्यात आला. पहिले दोन दिवस पर्यटक नेमके कुठे आहेत, कुणी आपत्तीत सापडले तर नाही ना, याची खातरजमा करण्यात आली.

मुंबई आणि दिल्ली येथील केंद्रात सर्व माध्यमातून जमा झालेली माहिती परराष्ट्र मंत्रालयात दिली जाते. या ठिकाणावरून मदतीची कार्यदिशा ठरवली जाते. या दोन केंद्रावरील कर्मचाऱ्यांच्या अहोरात्र प्रयत्नाने महाराष्ट्रातील १२०० लोकांचा शोध घेता आला. पर्यटकांना काठमांडू विमानतळ, काठमांडू शहर, लुंबिनी, पोखरा आदी भागात एकत्रित करता आले. त्यामुळे त्यांच्या परतीच्या प्रवासाची सोय झाली. २९ अधिकाऱ्यांचे ३० जणांचे वैद्यकीय पथक केंद्र शासनाच्या समन्वयातून रवाना करण्यात आले आहे. मुंबई महानगरपालिकेच्या ४० परिचारिका नेपाळकडे जखमींच्या सेवेसाठी रवाना झाल्या आहेत. आणखी १४० परिचारिकांची मागणी केंद्राकडून आली आहे. राज्यातून मोठ्या प्रमाणात औषधीसाठा पाठविण्यात आला आहे.

यामध्ये प्रामुख्याने जखमींवर औषधोपचाराचे साहित्य व रोगप्रतिकारक औषधांचा समावेश आहे. अन्य राज्यांच्या तुलनेत अधिक सक्रिय आणि तयार असणाऱ्या महाराष्ट्राच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाची मोठ्या प्रमाणात केंद्र शासनाला मदत होत असून यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताच्या कामगिरीचे कौतुक होत आहे.

## तारांकित

### बालगृहातील ५३ मुले स्वगृही



डोंगरी बालगृहातील बिहारच्या ५३ मुलांना महिला व बालविकास राज्यमंत्री विद्या ठाकूर यांच्या उपस्थितीत त्यांच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले.

राज्यात एकूण ४३ शासकीय बालगृहे आहेत. डोंगरी येथील बालगृह चिल्ड्रेन एड सोसायटीचे असून त्यात बालकामगार, अनाथ , निराधार मुलांना दाखल करण्यात येते. त्यानंतर संस्थेतर्फे पालकांचा शोध घेऊन बाल कल्याण समितीसमोर त्यांच्या सुटकेसाठी प्रस्ताव सादर केले जातात. समितीच्या आदेशानुसार त्यांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्याची कार्यवाही केली गेली.

डोंगरी येथील बालगृहात ऑगस्ट २०१४ पासून आजपर्यंत १९३१ मुले आणि ४८७ मुली असे एकूण २४१८ जण दाखल झाले असून याच कालावधीत २३८६ मुलांच्या पालकांचा शोध घेऊन त्यांना त्यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. दरम्यान बालगृहात एकूण ४३७ मुले व मुली असून त्यापैकी ५३ जणांना पालकांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. या मुलांना त्यांच्या पालकासोबत बिहारमध्ये पाठविण्यात येत असून अशा मुलांवर शासनाच्या एकात्मिक बाल संरक्षण योजनेंतर्गत बालकामगार विभागामार्फत विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे.

# मला आणा कोल्हापुरी साज...



**महाराष्ट्राच्या वैभवशाली आणि समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडवणारे नवे सदर.**

**'एक हौस पुरवा महाराज मला आणा कोल्हापुरी साज'**
**असा लडिवाळ हट्ट केला नाही अशी गृहिणी महाराष्ट्रात तरी विरळच. माणिकाचे लालचुटूक पेंडंट, मधोमध मिरवणारा ठसठशीत कोल्हापुरी साज असा प्रत्येकीला भुरळ घालणारा.**

कीर्ती पांडे

दागिन्यांची हौस स्त्रियांना स्वभावत:च असते. कुणाला ठसठशीत, कुणाला नाजूक, कुणाला रोज वापरण्यासाठी तर कुणाला फक्त सणसमारंभासाठी दागिने हवे असतात. यामुळेच भारतातील प्रत्येक प्रांतांचे जसे पोषाख बदलतात तसे दागिन्यांचे घाट आणि घडणावळही बदलते. प्रत्येक ठिकाणची भौगोलिक, आर्थिक परिस्थिती शिवाय मानवी स्वभाववैशिष्ट्य यांचा परिणाम दागिन्यांवर झालेला दिसतो.

महाराष्ट्रापुरते बोलायचे तर महाराष्ट्रीयन स्त्रीचे सौंदर्य थोडेसे रांगडे आहे. ते काश्मिरी किंवा उत्तरप्रदेशी स्त्रियांसारखे नाजूक नाही. त्यामुळेच या दागिन्यांमध्येही एकप्रकारचा ठसठशीतपणा दिसतो. पाटल्या, बांगड्या, तोडे, पुतळीहार, चपलाकंठी, ठुशी, मोहनमाळ किंवा नथ, तन्मणी चिंचपेटी यासारखे मोत्याचे दागिने सारेच ते सुरेख, देखणे आहेत पण त्याचबरोबर ठसठशीत आहेत. मराठी स्त्रियांना अगदी हवाच हवा असा वाटणारा आणखी एक दागिना म्हणजे कोल्हापुरी साज.

कोल्हापूरच्या अंबाबाईइतकाच मराठी स्त्रियांच्या तो जीवाभावाचा. लग्नसमारंभात भरजरी पैठणी आणि त्यावर कोल्हापुरी साज गळ्यात घालवून मिरवणारी स्त्री तिच्या सासरमाहेरच्या संपन्नतेने दर्शन उपस्थितांना घडवत असते. हे आणखी एक कारण स्त्रियांच्या कोल्हापुरी साज घेण्याच्या हट्टामागे आहे.

कोल्हापुरी साज हा खरंच एक वैशिष्ट्यपूर्ण दागिना आहे. सोन्याचे मणी आणि काही पेंडंट एकत्र केलेला गळ्यातला दागिना असे याचे वर्णन नक्कीच करता येणार नाही. एक तर कोल्हापूरी साज हा विवाहित महिलांनी घालावा असा संकेत आहे. त्यांच्या सौभाग्याचेच ते प्रतीक न राहता ती एक शुभशकुनांची माळ बनते. हेच कोल्हापुरी साजाचे वैशिष्ट्य. साधारणपणे एकसारखेपणा, नाजूकपणा आणि कलाकुसर यांना दागिन्यांच्या घडणावळीत अनन्यसाधारण महत्त्व असते पण कोल्हापुरी साज नीट निरखून बघितलात का? प्रत्येक पेंडट वेगवेगळ्या आकाराचे वेगळ्या घाटाचे असते तरीही या माळेला एकसंधपणा येतो. नव्हे एक वेगळे सौंदर्य या दागिन्याला यामुळे प्राप्त होते. मला वाटते माणसाच्या सदिच्छा, आशा, आकांक्षा, उज्ज्वल भविष्याप्रत असणारी त्याची मानवीसुलभ अपेक्षा ज्या एकत्रित सोनेरी धाग्याने बांधल्या की तयार होतो तो साज म्हणजे कोल्हापुरी साज.

हा साज किती पानांचा आहे यावरून जशी त्यांची लांबी, रुंदी ठरते तशी घरच्या धन्याची प्रतिष्ठाही. साधारणपणे स्त्रियांचा, ११, १३, १५, १७, १९ किंवा २१ पानांचा कोल्हापुरी साज घेण्याकडे कल असतो. २, ४, ६, ८ पदकांचा कोल्हापुरी साज त्या घेत नाहीत याचे कारण आहे. सम संख्याचे पदक हे आयुष्याला परिपूर्णतेची भावना देतात त्यामुळे जीवनाचा उत्कर्ष मंदावतो तर विषम संख्येतील पदक जीवनाची वाढ लयीत ठेवतात. या साजातलं प्रत्येक पान हे वैशिष्ट्यपूर्ण असते त्याला एक सांकेतिक अर्थ आहे.

यातील पहिले पान चाफेकळी तर शेवटचे म्हणजे एकविसावे पान हे कीर्तिमुख किंवा ताईत. यात मत्स्य, कूर्म, नरसिंह हे विष्णूचे अवतार, बेल पान, फुलं, कारलं चाफेकळी, पाच पानडी यासारखी पानं, फुलं, वाघनखं, नाग, मोरपिस असे प्राण्यांशी निगडित चिन्हे, सूर्य, चंद्र या आकाशस्थ देवता यांचे आकार सामावलेले असतात.



# ॥ संस्कृती ॥



**कोल्हापुरी साज** ही २१ पानांची सोनेरी धाग्यात ओवलेली माळ असते.

यातील प्रत्येक पानाला एक अर्थ असतो.

- **चाफेकळी** सौंदर्याचे आणि सुगंधाचे प्रतीक ती उत्कर्ष आणि समृद्धीचा संकेत देतो.
- **पाच पानडी** अर्थात पाच पान बेल, तुळस, विड्याचे पान, आंब्याचे पान आणि दुर्वा ही सगळीच पाने शुभ मानली जातात. या पाच पानांचा संकेत देते ती पाच पानडी
- **बेलपान** महादेवाचे आवडते पान. त्रिमुर्ती म्हणजे ब्रह्मा, विष्णु, महेश यांचे प्रतीक
- **दोडके** भाज्या आणि वनस्पतीचे प्रतीक
- **कारले** पाच रसांचे – कटू, तिखट, मधुर, खारट आणि तुरट संकेत देते.
- **सूर्य** समृद्धी, संपन्नतेचे प्रतीक
- **माणिक पानडी** सूर्याचे प्रतीक असणारे माणिक हे रत्न मैत्री, गुरू शिष्य नात्याचे आणि सेवातत्परतेचे प्रतीक.
- **मत्स्य** विष्णूचा दहावा अवतार. विष्णूचा हा अवतार. मुलाबाळांनी नांदणाऱ्या घराचे प्रतीक
- **कूर्म** विष्णुचा दुसरा अवतार, दीर्घायुष्य आणि नम्रता शिकवतो.
- **नरसिंह** विष्णुचा तिसरा अवतार. न्यायपूर्ण वागणुकीचे महत्त्व सांगतो
- **फूल** गुलाबाचे फूल प्रेम आणि सुखाचे प्रतीक
- **भ्रमर** सौंदर्याचा नाश न करता त्याचा उपभोग घेणे शिकवतो. उच्च विचारशक्तीचे प्रतीक
- **चंद्र** शांतीचे प्रतिक
- **पाचू पानडी** संपन्नतेचे प्रतीक असणारी ही पदकं जोडप्यातले प्रेम वृद्धिंगत करते आणि विद्वत्तेचे द्योतक आहे.
- **गंडभैरी** पतिपत्नीचे प्रतीक जोडप्यातील प्रेम वाढवते.
- **मोरचेल** संपन्नता, ऐश्वर्य दर्शवते.
- **मयूरपंख** सौंदर्य, संपन्नता आणि सुखाचे प्रतीक
- **शंख** पावित्र्याचे प्रतीक
- **वाघनख** शस्त्राचे प्रतीक
- **नाग** पतिपत्नीमधील बंध दर्शवते. तसेच लग्नाच्या वेळी दिलेल्या वचनांचे स्मरण करून देते.
- **ताईत किंवा कीर्तिमुख** पतीचे दुष्ट शक्तींपासून रक्षण करते.



थोडक्यात आकाशाखाली जे जे काही अस्तित्वात आहे, त्या अशुभांपासून पतीचे रक्षण व्हावे हीच इच्छा कोल्हापुरी साज घालताना स्त्रियांची असते.

वेगवेगळ्या आकारांची आणि घाटाची ही पान एका सूत्रात बांधली जातात. तसेच संसारातील वेगवेगळ्या स्वभावाची सासर आहे. माणसं एका सुत्रात बांधण्याचे कौशल्य स्त्रियांना मुलत:च असते त्याची सतत आठवण त्यांना राहावी, यासाठी हा दागिना लग्नात घातला जातो.

काळ बदलतोय तशी स्त्रियांची दागिन्यांची हौसही. त्यामुळे दागिन्यांच्या घडणावळीतही खूप बदल झाले आहेत. तसे ते कोल्हापुरी साजातही झाले. या साजातल्या मण्यांचा आकार थोडाअधिक नाजूक झाला. फक्त सोन्यात कोल्हापुरी साज घडवायचा तर कमीतकमी ३० ग्रॅम सोनं लागतं आणि हल्ली ते परवडत नाही. त्यामुळे गोल्डप्लेटेड कोल्हापुरी साजाला आता खूप मागणी आहे. या साजाला फक्त महाराष्ट्रातूनच नाही तर विदेशातूनही मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. सुमारे ४५ वर्षांपूर्वी या शहरातील एका पेढीने खास तयार केलेला कोल्हापुरी साज ब्रिटनच्या राणी एलिझाबेथ यांना भेट दिला होता. कोल्हापुरी साज घडवणे तसे खूप मेहनतीचे आणि कलाकुसरीचे काम आहे. त्यामुळेच खूप काळजीपूर्वक करावे लागते. कोल्हापूर शहरात आणि आसपासच्या परिसरात असे खास कोल्हापुरी साज घडवणारे अनेक ज्वेलर्स आहेत. हल्ली या साजाच्या पारंपरिक रूपाला थोडे बदल करून अनेक प्रकारचे दागिने घडवलेले बघायला मिळतात. साजामध्ये तोऱ्यात मिरवणारे माणकाचे पेंडंट आता मंगळसूत्रातही बघायला मिळते. यातील घागऱ्या, गहुमणी यांनी इतर दागिन्यांतही मानाचे स्थान मिळवले आहे. याशिवाय कोल्हापूरचे कारागीर या साजाच्या डिझाइन्समध्ये नावीन्य आणण्यासाठी प्रयत्न करत असतात. यामुळे पारंपरिक आणि फॅशनेबल असे प्रकार जरी या कोल्हापुरी साजाचे बघायला मिळाले तरी त्याने आपल्या स्त्रियांच्या मनातील स्थान मात्र कायम ठेवले आहे.



**कोल्हापुरी साज हा नेमका कधी किंवा कोणत्या काळात अस्तित्वात आला हे कुणीच सांगू शकत नाही. पण याला शेकडो वर्षांची परंपरा असावी हे नक्की. कोल्हापूर शहराची परंपरा, इतिहास, त्याचे ऐश्वर्य यांचा सुंदर मिलाफ साजाच्या घडणावळीत बघायला मिळतो. कलाकुसर, एंम्बॉसिंग करणे, सोन्याचा मुलामा चढवणे, कोरीव नक्षी काढणे यामध्ये महाराष्ट्रातील कारागिरांचा हातखंडा होता आणि आहे, हे कोल्हापुरी साज बघितला की नक्की कळते. कोल्हापुरी साज घडवतांना प्रत्येक पदक कमीत कमी १४ वेळा हाताळावे लागते. आता ही पदकं मशिनवर तयार करता येत असली तरी पदकांचे दोन भाग जोडणे, त्यात लाख भरणे शिवाय ही पानं एकत्र गुंफणे हे हातानेच करावे लागते. हे कौशल्य फक्त कोल्हापुरी कारागिरालाच जमते.**

संपर्क: ०९५९४९४४८००

# अभेद्य दुर्गनीती

**महाराष्ट्रातील तीन दुर्गांच्या रचनेची आणि अभेद्य बांधणीची चर्चा मी येथे करणार आहे. मध्ययुगीन इतिहासात दुर्गांचे महत्त्व हे अनन्यसाधारण होते. शत्रूच्या आक्रमणांविरुद्ध सगळ्यात मोठा आधार हा दुर्गांचा असे. रामचंद्रपंत अमात्यांनी कोल्हापूरच्या छत्रपती संभाजी महाराजांना शिवाजी महाराजांची जी दुर्गनीती सांगितली त्यात 'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग' असेच म्हटले आहे. दुर्गांच्या अभेद्यतेविषयी सविस्तर लिहिण्यासाठी मी तीन दुर्ग निवडले आहेत. त्यातील पहिला दुर्ग आहे औरंगाबादजवळचा देवगिरी अथवा दौलताबादचा दुर्ग. दुसरा आहे शिवछत्रपतींची पहिली राजधानी किल्ले राजगड आणि तिसरा आहे किनारी दुर्ग-विजयदुर्ग!**

निनाद बेडेकर

दौलताबाद, राजगड आणि विजयदुर्ग हे तीन दुर्ग कसे आहेत आणि त्यांच्या अभेद्यतेत कसे वैविध्य आहे हे आपल्याला या दुर्गांची पाहणी केल्यावर कळून येईल. दगड काढून दुर्ग बळकट करता येतो, दगड वापरून किल्ला अभेद्य करता येतो पण महाराष्ट्रातील तिसरे उदाहरण अद्वितीय आहे. ते म्हणजे दगड अदृश्य करून दुर्ग अभेद्य करण्याचे!

पहिला दुर्ग आहे देवगिरी. ज्यावेळी वेरूळच्या लेणीत छिन्नी हातोडे चालले त्या वेळेसच देवगिरीच्या या टेकडीवर दगड काढावयास सुरुवात झाली. प्रचंड मोठा, विस्तृत, रुंद खंदक, छिन्नी लावून गुळगुळीत केलेले कातळकडे, दगडात खोदलेली पाण्याची टाकी या दुर्ग वैशिष्ट्याबरोबरच एक अतर्क्य देवगिरीत आहे. ते म्हणजे साडेतीन वेटोळ्यांची अंधारातून जाणारी वाट- 'अंधारी!' गडावर जाण्यासाठी ही एकमेव वाट. तीसुद्धा दगड खोदून तयार केलेली. चारी बाजूस अक्राळविक्राळ कडे. पाण्याने आणि मगरींनी भरलेले खंदक आणि त्यातून दुर्गात जाणारी ही एकमेव अंधारी वाट. अंधार इतका की मशाल पेटवूनच त्यातून मार्ग काढावा लागतो. ज्ञानेश्वरांनीदेखील ही वाट पाहिलेली असावी. तसा उल्लेख ज्ञानेश्वरीत आहे. देवगिरीच्या या दुर्गाचे खोदकाम किती वर्षे चालले असेल हे नक्की माहीत नाही. मात्र या दुर्गाच्या निर्मितीचे श्रेय यादवकुलाकडे जाते. 'राष्ट्रकूट, शिलाहार यांची नावे इतिहासात गडप झाली. या अंधारी वाटेच्या शेवटी एक तवा तापवत असत. शत्रू चुकून आत आला तर तो एकतर घुसमटत असे अथवा ताजी हवा आत येणाऱ्या वाटेकडे वळल्यास एकदम खंदकात पडत असे. देवगिरीच्या या टेकडीतून एकूण किती टन दगड काढला असेल याचा एक प्राथमिक अंदाज करता येतो. बेसॉल्ट म्हणजेच डेक्कन ट्रॅप याची Specific Gravity म्हणजे विशिष्ट गुरुत्व अंदाजे २.७ आहे. हे धरले तर आदी साधा अंदाज म्हणून किमान वीस लाख टन दगड या डोंगरातून पोखरून हा दुर्ग अभेद्य केला आहे. या दुर्गाचा रागरंग पाहिल्यावर कळून येते की फितुरीशिवाय हा दुर्ग जिंकणे अवघड आहे. शिवाय खंदक असलेल्या तीन तटबंद्या आहेत. महाकोट, अंबरकोट आणि काळकोट या त्या तीन तटबंद्या. या दुर्गाच्या पाठीमागे मात्र कोणताही कोट नाही. त्या बाजूने दुर्गावर चढून येण्याचीही शक्यता नाही. आहे तो दगड काढून दुर्ग अभेद्य करण्याचे हे एक विलक्षण उदाहरण.

दगड वापरून तर सारेच दुर्ग बनवतात. शिवाजी महाराजांनी १६४५-४६ मध्ये मुरुंबदेवाचा म्हणजे ब्रह्मदेवाचा डोंगर जिंकून घेतल्यावर तेथे स्वराज्याची पहिली राजधानी बांधावयास काढली. किल्ले राजगड! या राजगडाच्या बांधणीचे वैशिष्ट्य काय? एक म्हणजे नीरा, वेळवंडी, कानंदी, गुंजवणी अशा नद्यांच्या गराड्यात असलेला हा डोंगर. त्याच्या तीन बाजूला पसरत गेलेले उतार; आणि त्यांच्या मध्यभागी असलेला बालेकिल्ला! हे पसरत गेलेले भाग राजांनी तटबंदी बांधून सुरक्षित केले. उतारावर असलेल्या भागाला म्हणतात 'माची'. राजकोशात याला म्हटले 'उपत्यका'. यातील संजीवनी माची ही साधारण दीड किलोमीटर्स लांबीची. त्या माचीच्या कडांवर तिहेरी तटबंदी, शेरहाजी असलेले बुरूज, मध्येच असलेला अळू दरवाजा हे सारे विलक्षण आहे. हे बांधकाम ३५० वर्षे टिकून आहे! तशीच ती सुवेळा माची. त्यावरचे लांब पाण्याचे टाके, नेढं, काळकाई, दरवाजे हेही अतर्क्य. नाही म्हणायला पद्मावती माचीवर थोडी पसरट जागा, पाण्याचा मोठा साठा, हे सारे पाहण्यासारखे आणि अनुभवण्यासारखे. या सगळ्यात वेगळा म्हणजे बालेकिल्ला. याला म्हणायचे 'अधित्यका'! बालेकिल्ल्यावर जायची वाट फार दुर्गम. नराचा वानर झाल्याखेरीज वर चढताच येणार नाही. बालेकिल्ल्यावर इमारती, पाण्याचा साठा, तोही अनुभवण्यासारखा. येथून सभोवार फार विस्तृत प्रदेश नजरेत येतो. पुरंदर, रोहिडा, तोरणा, सिंहगड, लोहगड-विसापुरापासून ते रायगड, प्रतापगड, मकरंद गडापर्यंतचा प्रदेश नजरेत येतो. पावसाळ्याच्या सुरुवातीला खाली असलेल्या पांढऱ्या मेघसमुदायावर वर्तुळाकृती इंद्रधनुष्य म्हणजेच इंद्रवज्र दिसते. राजगडाला लागलेला दगड किमान सात-आठ लाख टन. हा दगड कोठून आणला, कसा घडवला, कसा बसवला, चुना कोठे केला, किती लोक कामास जुंपले हे प्रश्न अनुत्तरित आहेत. दगड वापरून दुर्ग अभेद्य केल्याचे हे एक उत्तम उदाहरण.

आता तिसरे म्हणजे दगड अदृष्य करून दुर्ग बळकट केल्याचे उदाहरण! हे उदाहरण अजब आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात वाघोटन नदीच्या आणि सिंधुसागराच्या काठावर विजयदुर्ग हा किल्ला आहे. जवळच असलेल्या गिर्ये या गावामुळे या दुर्गाला 'घेरिया' म्हणत असत.



दौलताबाद किल्ला



विजयदुर्ग किल्ला



राजगड किल्ला



वैभव गडकिल्ल्यांचे

शिवाजी महाराजांनी 'विजय' संवत्सरात हा दुर्ग ताब्यात आणला. मुंबईचा गव्हर्नर चार्ल्स बून याने १७१९ च्या आसपास या दुर्गावर नाविक हल्ले केले. 'फ्राम' नावाचे एक वेगळे जहाजही त्यासाठी खास बांधण्यात आले होते. इंग्रजांचे हल्ले मात्र कारीगर होईनात. आंग्र्यांच्या लोकांनी वाघोटन नदीकडे जाणारा रस्ता लाकडे बांधून बंद केला होता. इंग्रजांना या दुर्गाच्या जवळ सागराकडूनही जाता येत नव्हते. शेवटी इंग्रजांना काही जहाजे गमवावी लागली. 'फ्राम' हे खास जहाज सागरात बुडवावे लागले. बूनला माघार घ्यावी लागली.

इंग्रजांच्या या पराभवाचे रहस्य १९९१ साली उलगडले. वेस्टर्न नेव्हल कमांड आणि गोव्याच्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशनॉग्राफी या दोन संस्थाच्या जहाजांनी, पाणबुड्यांनी, संशोधकांनी शोध घेतला असता त्यांना विजयदुर्गाच्या सागराकडील भागामध्ये दुर्गापासून तीन-साडेतीनशे फुटांवर समुद्रात एक दगडी भिंत आढळली. ओहोटीच्या वेळीसुद्धा ही भिंत दिसत नाही. दुर्गाच्या

**बालेकिल्ल्यावर जायची वाट फार दुर्गम. नराचा वानर झाल्याखेरीज वर चढताच येणार नाही. बालेकिल्ल्यावर इमारती, पाण्याचा साठा, तोही अनुभवण्यासारखा.**

तटबंदीला समांतर अशी तीनशे फूट लांब आणि वीस-बावीस फूट रुंद दगडी भिंत येथे आहे. ती वरून दिसत नाही आणि तिचा अंदाजही येत नाही. या भिंतीत काही घडीव दगड वापरलेले आहेत. गोव्याच्या पोर्तुगिजांना या भिंतीविषयी माहिती होती असे पोर्तुगीय कागदपत्रांवरून दिसते; पण इंग्रजांना मात्र या भिंतीचा पत्ता नसल्याने त्यांचे मोठे नुकसान येथे झाले.

दगड अदृश्य करून दुर्ग अभेद्य केल्याचे हे एक उदाहरण आहे. ही भिंत कोणी बांधली हे कळावयास काही मार्ग नाही. परंतु तेथील दगडावर आढळलेल्या काही खुणांमुळे ही भिंत सतराव्या शतकात बांधली असल्याचा अंदाज गोव्याच्या डॉ. सिला त्रिपाठी यांनी व्यक्त केला आहे. त्यांनी परत एकदा या भागाचा सर्व्हे केला होता.

महाराष्ट्राचे हे दुर्गवैभव वैशिष्ट्यपूर्ण नाही असे कोण म्हणेल? पर्यटकांना, अभ्यासकांना हे दाखवता येईल. परदेशी पर्यटकांना आकर्षित करता येईल. दुर्गबांधणीची ही वैशिष्ट्ये त्यांच्यासमोर उलगडून दाखवता येतील. महाराष्ट्राचा डोंगरी, सागरी इतिहास त्यांना ज्ञात होईल.

असे होईल का? का आमचे स्वप्न हे फक्त स्वप्नच राहील! सत्यात कधी उतरणार नाही? नाही! हे जमेल! प्रत्यक्षात येईल! एकदिलाने काम केले तर हे सहज शक्य आहे. तो सुदिन लवकर उजाडावा हाच आदिशक्ती श्री तुळजाभवानीकडे जोगवा!

**संपर्क: ०९८२२०३८३५५**

# नवा ऋतू... नवा

**महाराष्ट्रातील काही पर्यटनस्थळांना भेट देण्याचा उत्तम काळ कोणता असा प्रश्न विचारला तर त्याचे पटकन उत्तर देता येत नाही. याचे कारण तीनही ऋतूत ही पर्यटन स्थळे वेगवेगळी भासतात. त्यांचे सौंदर्य वेगळे भासते. पन्हाळ्याचे नाव अशा पर्यटनस्थळांत सर्वात वरचे आहे.**



पन्हाळ्याच्या वेशीवरच वीररत्न बाजीप्रभू देशपांडे यांचा आवेशपूर्ण पुतळा पर्यटकांचे मन वेधून घेतो.

पावसाळ्यात मुसळधार सरींनी चिंब चिंब झालेला पन्हाळा हिरवागार भासतो तर हिवाळ्यात धुक्याची दुलई अंगावर ओढून दुधी रंगाचा होतो. उन्हाळ्यात संध्याकाळी लालकेशरी रंगाचा पन्हाळा आणखीनच वेगळा भासतो. पन्हाळा प्रत्येक ऋतूत नवाच दिसतो.

महाराष्ट्रातील लोकांना 'पन्हाळा' हे नाव अपरिचित असण्याचे कारण नाही. इतिहासाच्या पानांतून हे नाव सहजपणे मेंदूत घट्ट बसले आहे. सुमारे बाराशे वर्षांचा इतिहास आपल्या अंगावर मिरविणारा 'पन्हाळा' केवळ इतिहासाचा साक्षीदार नाही तर तो महाराष्ट्राच्या ग्रामीण सौंदर्याचा नमुना आहे. त्याचमुळे तो जास्त आपला आणि जवळचा वाटतो. तुम्ही कोल्हापूरहून पन्हाळ्याच्या दिशेने निघाल्यावरच एक वेगळीच अनुभूती येते. रस्त्याच्या दोन्ही



बाजूला वडाच्या झाडांचा मांडवच रस्त्याला घातला आहे. त्या मांडवातून गाडी पुढे जात असताना हा रस्ता संपूच नये असे वाटत राहते. अगदी ८ ते १० किलोमीटर गेल्यावर एक घाट लागतो. कोल्हापूर-रत्नागिरी रस्त्यावर (जेथूनच पन्हाळ्याला जायला लागते) छोटे मोठे घाट आहेत, पण पन्हाळ्याला जाण्यापूर्वीचा घाट हा छोटा पण कठीण आहे. अलीकडच्या काळात अनेक घाट रुंद

## प्रवीण कुलकर्णी

होत गेले आहेत. त्यामुळे प्रवास सुखकर झाला हे खरेच, पण त्या घाटांचे नैसर्गिक सौंदर्य मात्र लोप पावले आहे. इथला घाट मात्र या जुन्या घाटांचा साक्षीदार बनून राहीला आहे. 'घाटातली वाट काय तिचा थाट' ही कवितेची ओळ आठवल्याशिवाय राहत नाही. त्यानंतर येतो पन्हाळा. महाराष्ट्राच्या इतिहास, भूगोलाचे अमीट

# पन्हाळा





पानच. पण त्याशिवाय थंड हवेचे ठिकाण. ऐन चैत्र-वैशाखात सूर्य आग ओकत असताना तो पन्हाळ्यावर मात्र थोडासा कृपादृष्टीने वागतो की काय असेच वाटते. थंड हवेचे ठिकाण म्हटले की महाराष्ट्रात 'महाबळेश्वर' हे नाव चटकन समोर येते. त्यात गैरही नाही. पण गेल्या बाराशे वर्षांपासून आपले हे वैशिष्ट्य जपणारा पन्हाळा तितकाच थंड आणि शांत आहे. डोळ्यांत निसर्गाची हिरवाई साठवून इथल्या ऐतिहासिक खुणांना बघता येते.

पन्हाळगड प्रथम शिलाहार भोज राजा नृसिंह याच्या कारकिर्दीत बांधला गेला. अफजलखान वधानंतर शिवरायांनी हा किल्ला २८ नोव्हेंबर १६५९ ला ताब्यात घेतला. २ मार्च १६६० मध्ये किल्ल्यास सिद्दी जौहरचा वेढा पडला. १७१० मध्ये पन्हाळा कोल्हापूरची राजधानी झाली नंतर १८४४ मध्ये हा किल्ला इंग्रजांच्या ताब्यात गेला. ❐❐

**गडावरील पाहण्यासारखी ठिकाणे:**

- राजवाडा हा ताराबाईचा वाडा होय. वाडा प्रेक्षणीय असून यातील देवघर बघण्यासारखे आहे. येथे नगरपालिका कार्यालय पन्हाळा हायस्कूल व मिलटरी बॉइज होस्टेल आहे.
- सज्जाकोठी राजवाड्यावरून पुढे गेल्यावर ही इमारत दिसते.
- राजदिंडी ही दुर्गम वाट गडाखाली उतरते.
- अंबारखाना हा पूर्वीचा बालेकिल्ला. याच्या सभोवती खंदक आहे
- चार दरवाजा हा पूर्वेकडील अत्यंत मोक्याचा व महत्त्वाचा दरवाजा होय. येथेच 'शिवा काशीद' यांचा पुतळा आहे.
- गडावर संभाजी महाराजांचे मंदिर आहे.
- महालक्ष्मी मंदिर आहे. हे गडावरील सर्वात प्राचीन मंदिर आहे..
- तीन दरवाजा, बाजीप्रभुंचा पुतळा

## असे जाता येईल

- कोल्हापूरपर्यंत रेल्वेने किंवा बसने
- कोल्हापूर ते पन्हाळा एसटी बसची सुविधा
- जवळचे विमानतळ कोल्हापूर

## येथे राहता येईल

- पन्हाळ्यावर राहाण्याच्या खूप सोयी-सुविधा आहेत.
- एमटीडीसी च्या २१ खोल्या, सिझनल ४, २ डॉर्मिटोरिझ उपलब्ध आहेत. त्याचे बुकिंग मुंबई, पन्हाळा आणि कोल्हापूर येथून करता येते.
- टोल फ्री नंबर- १८००-२२९९३०, आरक्षणासाठी दूरध्वनी क्रमांक- ०२२-२२८४५६७८ (मुंबई)

## जवळचे ठिकाण

- जोतिबा देवस्थान अवघ्या १२-१३ किलोमीटरवर आहे.
- कोल्हापूरची अंबाबाई, रंकाळा तलाव
- कोल्हापूरपासून नृसिंहवाडी ५२ किलोमीटरवर आहे. श्री दत्तगुरूंचे हे ठिकाण असून कृष्णा-पंचगंगेचा संगम येथे होतो.

# आनंदी जगा...
# रक्तदाब टाळा

**आजच्या धकाधकीच्या जीवनात सगळ्यांच्या जीवनशैलीमध्ये आमूलाग्र बदल झालेले आहेत. गतिमान आयुष्य जगण्याच्या नादात ज्या सर्वात महत्त्वपूर्ण बाबींकडे आपले दुर्लक्ष होते ते म्हणजे व्यक्तीचे स्वत:चे आरोग्य होय. आरोग्याच्या हेळसांडीमुळे आणि बदलत्या जीवनशैलीच्या परिणामस्वरूप 'उच्च रक्तदाब' संभवतो. सध्याच्या काळात हा आजार जगापुढील विशेषत: भारतापुढील एक मोठी आरोग्यविषयक समस्या बनला आहे.**

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते उच्च रक्तदाब हा वाढत्या वैश्विक रुग्णभाराच्या प्रमुख कारणांपैकी एक आहे. आकडेवारीच्या भाषेत बोलायचे झाल्यास जगभरातून सुमारे साडेसात दशलक्ष मृत्यू (आजारपणात दगावलेल्या एकूण संख्येच्या १३ ते १५%) आणि ९२ दशलक्ष अपंगत्व समायोजित जीवनवर्षे याला कारणीभूत घटक म्हणून उच्च रक्तदाबाकडे निर्देश करता येईल. (जागतिक आरोग्य संघटना-२००१) उच्च रक्तदाब असलेल्या व्यक्तीचे हृदय व त्याच्या रक्तवाहिन्यांसंबंधीचे आजार, हृदयविकाराचा झटका, किडनीसंबंधीचे आजार, डोळ्यांमधील रेटिनावर होणारा परिणाम शरीराच्या इतर रक्तवाहिन्यांसंबंधीचे आजार यासारख्या

डॉ. मनीषा महाजन

नानाविध आजारांना बळी पडण्याची शक्यता बळावते म्हणजे उच्च रक्तदाब हा इतर आजारांना आमंत्रण देणारा ठरतो असे म्हणता येईल. उच्च रक्तदाब म्हणजे शरीरातील धमन्यांमधून वाहणाऱ्या रक्तप्रवाहाचा धमन्यांच्या भिंतींवरील दबाव वाढणे होय आणि ही प्रक्रिया दीर्घकाळ सुरू राहिली तर त्याचा हृदय आणि इतर अवयवांवर परिणाम व्हायला सुरुवात होते. रक्तदाब हा Systolic (आकुंचन) व Diastolic (प्रसरण) असा मोजला जातो व त्याचे एकक चचक्ष (उदा. सामान्य रक्तदाब हा १२०/८० MMHg असतो) आहे.

**रक्तदाबाचे वर्गीकरण** Systolic (MMHg) Diastolic (MMHg) **सामान्य (Normal) :**
< १२० आणि > ८०
**उच्च रक्तदाब (Prehypertension):**
१२०-१३९ किंवा ८०-८९
**Stage 1 Hypertension:**
(प्रथम पायरी)
१४०-१५९ किंवा ९०-९९
**Stage 2 Hypertension :**
(द्वितीय पायरी) १६० किंवा १००
Isolated Systolic Hypertension
१४० आणि > ९०

**रक्तदाबाचे वर्गीकरण**

**उच्च रक्तदाबाचा प्रादुर्भाव कोणामध्ये होऊ शकतो?**

- वृद्ध व्यक्ती
- वजन जास्त असलेले किंवा लठ्ठ व्यक्ती
- आनुवंशिकतेने पुढच्या पिढीमध्ये
- स्त्री आणि पुरुषांमध्ये समानतेने आढळतो
- सामान्यत: वयाच्या पंचेचाळिशीच्या आधी पुरूषांमध्ये तर वयाच्या पासष्टीनंतर स्त्रियांमध्ये प्रादुर्भाव होतो.
- आरोग्यास अपायकारक आहाराच्या सवयी असलेल्या व्यक्तीमध्ये
- आहारात जास्त प्रमाणात मिठाचे सेवन करणाऱ्या व्यक्तीमध्ये होतो

## उच्च रक्तदाबाची लक्षणे

- घाम येणे
- धाप लागणे
- झोप न लागणे
- धडधड होणे
- तीव्र डोकेदुखी,
- जीव घाबरणे
- नाकातून रक्तस्राव होणे

## हे वर्ज्य करा




**मिठाचे प्रमाण शक्यतो कमीच असावे. पन्नाशीनंतर आहारातील मिठाचे प्रमाण १५०० एमजी त्यापेक्षा कमी करावे.**

**मनावर नियंत्रण ठेवा आणि फास्ट फूड शक्यतो टाळाच. भूकेसाठी सोबत पोळीभाजीचा डबा आवर्जून घ्यावा.**





**मद्यपान, धूम्रपान हे तर घातकच. त्याचबरोबर सॉफ्ट ड्रिंक करणेही टाळा.**

**कॅफिनचा समावेश असलेल्या कॉफीसारख्या उत्तेजक पेयाबरोबरच अति मांसाहार टाळावा.**



- आहारातून पुरेशा प्रमाणात पोटॅशिअम न मिळालेल्या व्यक्ती
- शारीरिक हालचालींचा अभाव असल्यास
- धुम्रपान करणाऱ्या व्यक्तीमध्ये
- मानसिक ताणतणावग्रस्त व्यक्ती

**उच्च रक्तदाबाची कारणे**

- किडनीचा जुना आजार, थॉयरॉइडचा आजार, झोपेमध्ये होणारा श्वसनाचा अडथळा यासारख्या वैद्यकीय समस्यांमुळे रक्तदाब वाढू शकतो.
- दम्याच्या औषधांसारख्या काही औषधांच्या सेवनामुळेही रक्तदाब वाढू शकतो.

## निरामय

- गर्भनिरोधक औषधे, गर्भवती स्त्रिया, संप्रेरक चिकित्सापद्धती (Harmonal Therapy) यामुळे स्त्रियांमध्ये रक्तदाब वाढू शकतो.

**आहारात मिठाचे प्रमाण जास्त उच्च रक्तदाबाची हमी**

- त्यामुळे आहारातील मिठाचे सेवन कमी ठेवा.
- रोज फक्त २३०० mg पर्यंतच मिठाचे सेवन करा. कमी केलेत तर उत्तम.
- वयाची पन्नाशी उलटल्यानंतर व्यक्तीने आपल्या आहारातील मिठाचे प्रमाण १५०० mg किंवा त्यापेक्षा कमी करावे. यामुळे तुम्हाला दोन ते आठ mmHg इतका रक्तदाब कमी करता येईल.
- मद्यपान वर्ज्य करा व शक्यतोवर कमी करा.
- धूम्रपान टाळा. धूम्रपानाद्वारे शरीरात जाणाऱ्या निकोटिन या पदार्थाचा रक्तदाब वाढीशी संबंध असतो. म्हणून तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनापासून लांब रहा.
- कॅफिनचा समावेश असलेल्या कॉफीसारख्या उत्तेजक पेय पदार्थांचे सेवन टाळा.
- तणावग्रस्त असल्यास समुपदेशनाचा अवलंब करून ताण कमी करा. व्यायाम, योगासने व शारीरिक हालचाली आणि डॉक्टर्सचा नियमित सल्ला याद्वारे रक्तदाबावर नियंत्रण मिळवता येते.
- उच्च रक्तदाबासाठी घ्यावयाची औषधे ही डॉक्टरांच्या सल्ल्यानेच घ्यावीत.

उच्च रक्तदाबाविषयी सामाजिक जागरूकता निर्माण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर World Hypertension League (WHL) ही संस्था काम करते. २००५ पासून सुरू केलेल्या जागरूकता मोहिमेच्या स्मरणार्थ १७ मे हा दिवस दरवर्षी 'जागतिक उच्च रक्तदाब दिवस' म्हणून साजरा केला जातो. येणाऱ्या १७ मे च्या दिवशी उच्च रक्तदाबाविषयी जागरूकता वाढवण्याचा आणि आपल्या आरोग्याची योग्य काळजी घेण्याचा संकल्प करू या.

(लेखिका या गोकुळदास तेजपाल रुग्णालयात निवासी वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.)
**संपर्क :** ०९८५०५२१६००

### उच्च रक्तदाबाचे प्रकार

- **आवश्यक उच्च रक्तदाब:** यामध्ये रक्तदाब वाढण्याची निश्चित कारणे माहीत नसतात. याप्रकारचा रक्तदाब हा ९०% पेक्षा जास्त व्यक्तींमध्ये आढळतो.
- दुय्यम वा द्वितीयक उच्च रक्तदाब



**उच्च रक्तदाब टाळण्यासाठी चालणे / धावणे हा उत्तम व्यायाम आहे.**

### अन्नात आवर्जून समावेश करा

**हिरव्या ताज्या पालेभाज्यांचा रोजच्या आहारात समावेश असू द्यावा.**





**पालेभाज्यांबरोबर ताजी आणि रसाळ फळांचे सेवन रक्तदाब आटोक्यात ठेवण्यास मदत करते.**

**कमी स्निग्धांश असलेल्या दूधाचा समावेश आवश्यक**



### अशी घ्या काळजी

- आहाराच्या सवयीमध्ये केलेले बदल रक्तदाब नियंत्रणामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका निभावू शकतात. पुढील बाबींचा अंमल केल्यास रक्तदाब कायमस्वरूपी नियंत्रणात राहतो.
- शरीराचे जास्तीचे वजन कमी करणे व कमरेचा घेर नियंत्रणात आणणे. वाढत्या वजनाच्या प्रमाणात रक्तदाब वाढत जातो. फक्त १० पौंड (४.५किग्रॅ) वजन कमी केले तर रक्तदाब नियंत्रणात राहील.
- कमरेचा घेर पुरुषांमध्ये चाळीस इंच (१०२cm) आणि स्त्रियांमध्ये पस्तीस इंच (८९cm) पर्यंत असणे आवश्यक परंतु यापेक्षा अधिक वाढल्यास आटोक्यात आणण्याचे प्रयत्न करावे.
- व्यक्तीचा शरीर वस्तुमान निर्देशांक (Body Mass Index) BMI hm › 25kg / m2 इतका असावा.
- दररोज ३० मिनिटे नियमितपणे व्यायाम केल्यास व्यक्तीचा रक्तदाब चार ते नऊ mmHg इतका कमी होतो.
- स्वत:ची आहार दैनंदिनी असावी. त्यामध्ये काय, किती, केव्हा आणि का खाता याची नोंद असावी.
- आहारातील पोटॅशिअमचे प्रमाण वाढवण्यासाठी जास्तीत जास्त फळे व पालेभाज्यांचा आहारात समावेश करावा.
- सुजाण खरेदीदार व्हा आणि आरोग्यास अपायकारक पदार्थ खरेदी करणे टाळा.
- मनावर ताबा ठेवा आणि DASH च्या आहार नियमावलीचे कटाक्षाने पालन करा.

# परिश्रमातले सातत्य

मूळचे बीड जिल्ह्यातील खोडवेकर कुटुंबीय, १९८० च्या दुष्काळात अर्थार्जनासाठी मुंबईकडे आलेले. आई व वडील दोघेही बांधकाम मजूर. परंतु मुलांना शिकवण्याची जिद्द मनाशी बाळगून ते शिक्षण देत होते. ग्रामीण भागातील गरीब मात्र होतकरू विद्यार्थ्यांसाठी नवोदय विद्यालय आशेचा किरण आहे. नवोदयमध्ये निवड झाल्यानंतर माझ्या आयुष्याला खरी कलाटणी मिळाली. या

**बल्बचा शोध लावणाऱ्या थॉमस एडिसनने हजारो वेळा प्रयत्न केले आणि तितक्याच वेळा त्याला अपयश आले. पण अखेरीस बल्बचा शोध लावला. पहिल्या दोन प्रयत्नांत मुख्य परीक्षा पास; पण इंटरव्ह्यू कॉल नाही. तिसऱ्या प्रयत्नांत इंटरव्ह्यू कॉल पण फायनल लिस्टमध्ये नाव नाही. अखेर चौथ्या प्रयत्नांत आयएएस. अतिशय प्रतिकूल परिस्थिती असतानाही केवळ शालेय जीवनात पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी जिद्द बाळगून यूपीएससीच्या परीक्षेत यश मिळवले. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे आयुक्त सुशील खोडवेकर सांगताहेत त्यांच्या यशाचा मूलमंत्र.**

ठिकाणच्या शैक्षणिक वातावरणाने आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाने माझ्या प्रतिभेला चालना मिळाली. नवोदय विद्यालयात शिकत असताना नववीमध्ये मला जिल्हाधिकाऱ्यांच्या हातून एक मेडल मिळाले होते. त्या वेळी वाटले, की आपणही असे कलेक्टर व्हायला हवे. पण कलेक्टर कस होतात हे काहीच माहिती नव्हते. ही माहिती मिळाल्यानंतर खऱ्या अर्थानं स्पर्धा परीक्षा द्यायची असा निर्णय झाला. त्यानंतर मग मी मुंबईच्या रुईया कॉलेजमधून एम.एस्सी केलं. २००३ मध्ये एम.एस्सी झाल्यावर ग्लीनमार्क कंपनीत रिसर्च असोसिएट्स म्हणून २००७ पर्यंत नोकरी केली. परंतु कलेक्टर होण्याचे स्वप्न मला काही स्वस्थ बसू देत नव्हते. माझ्या ध्येयाने माझ्या अर्थार्जन करण्याच्या विचारावर मात केली. त्यानंतर नोकरी सोडून पूर्ण वेळ यूपीएससीची तयारी करण्याचा निर्णय घेतला. माझा हा निर्णय माझा लहान भाऊ विष्णू खोडवेकर याच्यामुळे मी घेऊ शकलो. कारण तो सी.ए. होता, प्रॅक्टिस करत होता, त्यामुळे घराला आर्थिक आधार होता. त्याच्या पाठिंब्यामुळेच मला मन लावून अभ्यास करणे सहज शक्य झाले.

### पूर्व, मुख्य परीक्षेची तयारी

परीक्षेची तयारी करताना मी स्वत:च्या नोट्स काढण्यावर भर दिला. मी दररोज हिंदू, इंडियन एक्स्प्रेस, टाइम्स ऑफ इंडिया, इकॉनॉमिक टाइम्स आणि एशियन एज या ५ वृत्तपत्रांचे वाचन करायचो. समाजशास्त्र आणि लोकप्रशासन हे माझे मुख्य परीक्षेचे विषय होते. सी डी देशमुख संस्थेत सर्व अभ्यास केला. कोणतेही कोचिंग क्लास लावले नाहीत. मित्रांबरोबर अभ्यास करताना ग्रुप डिस्कशनवर भर दिला. ncert ची ८ ते १२ पर्यंतची सगळी पुस्तके वाचून काढली. तसेच ignou, NBT , gov. of india gazzet यांचा संदर्भ साहित्य म्हणून उपयोग केल. IIPA चे मासिक ही संदर्भ साहित्य म्हणून वापरले. या सर्वांचे केवळ वाचन न करता अभ्यासक्रमात त्याचा काय संबध आहे याकडे विशेष लक्ष दिले. वाचन आणि मनन याबरोबर सर्वात आवश्यक असते ते लेखनकौशल्य. यासाठी शाब्दिक मर्यादेत लिहिण्याचा सराव करण्यावर विशेष भर दिला. मुख्य परीक्षेसाठी ३० मार्कांचे, ६० मार्कांचे प्रश्न मी लिहून काढले. दररोज लिहिण्याची प्रॅक्टिस या परीक्षेत खूप महत्त्वाची आहे. साधारणपणे ३०० शब्दांचे, ५०० शब्दांचे प्रश्न लिहून बघत असे. माझा किमान २ तास तरी लिखाणाचा सराव होत असे. लिहिण्यामुळे लिखाणात नेमकेपणा येतो. आत्मविश्वास वाढतो. वाचन, लेखन आणि मनन यांचा ताळमेळ साधला तर लेखी परीक्षेत यश सहज मिळते असा माझा विश्वास अहे. या अभ्यासकाळात श्रावण हर्डीकर, भूषण पाटील, शैलेंद्र मिश्रा, सी. डी. देशमुख संस्थेचे प्रकाश बाळ यांचे विशेष मार्गदर्शन मिळाले.



### यशाची सूत्रे

- गट चर्चेवर भर
- ८वी ते १२वीपर्यंतची सगळ्या पुस्तकांचे बारकाईने वाचन
- स्वत:च्या नोट्स्‌वर भर
- शाब्दिक मर्यादा पाळत लेखन कौशल्यावर भर
- लिखाणाचा सराव
- विविध ठिकाणच्या अभिमत मुलाखतीद्वारे मुलाखतीचा सराव फायदेशीर
- आवड सुस्पष्ट आणि खरी लिहावी
- मानसिक स्थैर्यासाठी काही प्रयत्नानंतर शक्य असेल तर नोकरी शोधावी
- इंग्रजी वर्तमानपत्राचे सातत्यपूर्ण वाचन आवश्यक

### मुलाखतीची तयारी

मुलाखतीच्या तयारीसाठी मला महाराष्ट्र शासनाच्या वतीने विविध ठिकाणी आयोजित mock interview चा खूप फायदा झाला. यशदा, महाराष्ट्र परिचय केंद्र दिल्ली ,राज्य प्रशिक्षण संस्था येथे मी मुलाखतीचा सराव केला. यावेळी सचिन गायकवाड, मीरा बोरवणकर, सतीश चंद्र, सरंगी सर या मान्यवर अधिकाऱ्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी उणीवा दाखवून देतानाच त्या कशा दुरुस्त करावयाते हे सांगितले. मुलाखत देताना तुम्ही अलर्ट असणे गरजेचे आहे. कुठल्याही प्रश्नाची अतिरेकी उत्तरे नको, असे मला वाटते. माझ्या इंटरव्ह्यूमध्ये तरी मी बुद्धाचा सम्यक मार्ग अवलंबला. कोणी कितीही बुद्धिमान असला तरी शंभर टक्के प्रश्नांची उत्तरे कोणालाच येत नाहीत. त्यामुळे जे येत नाही ते सरळ' नाही येत म्हणून सांगा. तुमचा प्रामाणिकपणा बोर्ड मेंबर्सना आवडतो.

### छंद खरा हवा!

**माझा छंद वेगवेगळ्या प्रदेशातील खाद्यपदार्थ खाणे, त्याची रेसिपी समजून घेणे, हा लिहिला होता.**

**माझ्या इंटरव्ह्यू पॅनेलचे अध्यक्ष उत्तर प्रदेशचे माजी मुख्य सचिव प्रशांत कुमार मिश्रा होते. त्यांनी मला वडापाव काय असतो हे विचारलं होतं. तसंच मी त्या वेळी चेन्नईला काराईकुडी इथे सेक्शन ऑफिसर म्हणून काम करत होतो. तिथला प्रसिद्ध आणि तुमच्या आवडीचा पदार्थ कोणता, असाही प्रश्न मला विचारला होता. तेव्हा मी चिकन चेट्टीनार हा पदार्थ सांगितला होता. हा पदार्थ म्हणजे चेट्टीयार समाजाची स्पेशालिटी आहे.**

**थोडक्यात काय, तर तुम्ही जे काही लिहिलंय ते खरं लिहिलंय का, तुम्ही जे काही सांगताय ते खरं सांगताय का हे पॅनल तपासत असतं. आमच्या एक वरिष्ठ सहकाऱ्यांनी आपला छंद स्केचिंग असा लिहिला होता, तेव्हा बोर्डाने लगेच 'आमचे स्केच काढून दाखवा म्हटलं. म्हणून तुम्ही कोणताही छंद लिहिला नाही तरी चालेल, पण खोटा छंद लिहू नका.**

### नियोजन

नागरी सेवा परीक्षेचा अभ्यासक्रम खूप मोठा आहे. त्यामुळे तयारीदरम्यान नियोजनाला खूप महत्त्व आहे. काटेकोर नियोजनाचे तंत्र आपल्याला जमले पाहिजे. मात्र सलग दहा ते पंधरा तास अभ्यास करावा असा काही नियम नाही. आपल्याला जी पद्धत सोपी वाटत असेल ती आपण अवलंबू शकतो. गट चर्चा, स्वत:च्या नोट्स काढणे, माहितीपट पाहणे, बातम्या ऐकणे, ही परीक्षा उत्तीर्ण झालेल्या तज्ज्ञांसोबत चर्चा करणे, एखादे महत्त्वपूर्ण व्याख्यान आदींच्या माध्यमातून आपण अभ्यासात वेगळेपण आणून रटाळपणा बाजूला सारत चांगली तयारी करू शकतो. दरम्यान वाचनाच्या बाबतीत अनेकांना प्रश्न पडतो की काय वाचावे आणि काय नको. स्पर्धा परीक्षेसाठी अनेक प्रकाशनांची असंख्य पुस्तके आणि मासिके बाजारात उपलब्ध आहेत. मात्र ती सर्व वाचण्याएवढा वेळ आपल्याकडे नसतो. शिवाय त्यातून एखाद्या विषयाची संपूर्ण माहिती मिळेलच याची




**अभ्यासाचा उत्साह कायम ठेवण्यासाठी मेडिटेशन, प्रेरणादायी पुस्तके उपयोगी पडू शकतात. उदा. रॉबिन शर्मा, पाऊलो कोहलो यांसारखी. शिवाय एखादा घाम काढणारा व्यायामही तणाव हलका करण्यासाठी, नवी ऊर्जा देण्यासाठी उपयोगी पडू शकतो.**

शाश्वती नसते. यामुळे आपल्या वेळेचा अपव्यय होतो आणि तयारी पूर्ण झाली असा आत्मविश्वासही येत नाही. त्यामुळे मूळ पुस्तकांचे वाचन करावे.

मनाचा निर्धार आणि नियोजनबद्ध बुद्धिमत्तापूर्ण प्रयत्न हेच यशाचे सूत्र आहे. पहिल्या प्रयत्नात यश मिळवणारे खूप कमी लोक असतात. इतर सर्वांना कष्ट, अपार मेहनत आणि आत्मविश्वास अशा सरधोपट मार्गानेच पुढे जावे लागते. तिसऱ्या, चौथ्या प्रयत्नांत मग खूप साचलेपण आणि कंटाळा यायला लागतो. दोन पावले पुढे गेल्यानंतर काही कारणांनी एक पाऊल मागे घ्यावे लागले, तरी सरतेशेवटी एक पाऊल पुढे पडलेले असते. आपले अंतिम ध्येय साध्य करण्यासाठी छोट्या छोट्या टप्प्यांचा वेध घेणे, ती उद्दिष्टे पूर्ण करणे आणि प्रगतीमध्ये सातत्य राखणे, या सर्व गोष्टी महत्त्वाच्या आहेत. मी दुसऱ्या प्रयत्नानंतर इतर परीक्षा द्यायला सुरुवात केली. त्यात चेन्नईला माझं कोराईकुडी इथे सेक्शन ऑफिसर म्हणून सिलेक्शन झाले. त्यामुळे तिसऱ्या प्रयत्नानंतर इतरही परीक्षा देऊन एखादी नोकरी केल्यास मानसिक स्थैर्यासाठी त्याचा फायदा होऊ शकतो. तुमच्या कामात, विचारात, प्रयत्नांत आणि दृष्टिकोनातही सातत्य राखा. याचा फायदा तुम्हाला नक्कीच होऊ शकेल. एखादी गोष्ट किंवा तुम्ही ठरवलेले ध्येय कठीण, तरीही त्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न केलेत, तर तुम्ही त्यापासून दूर जाऊ शकत नाही. एक ना एक दिवस तुम्ही तुमचे ध्येय साध्य करालच.

**शब्दांकन – मनीषा पिंगळे**

# ब्रँडिंग महाराष्ट्राचे

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी मुंबईतील इंदू मिलची जागा राज्य सरकारला हस्तांतरित करण्यासंबंधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत त्रिपक्षीय करारावर झालेल्या स्वाक्षऱ्या, देशातील विविध राज्यांचे मुख्यमंत्री व न्यायाधीशांच्या परिषदेत मुख्यमंत्र्यांनी राज्यातील न्यायव्यवस्था गतिमान करण्याचे दिलेले आश्वासन आणि घुमान (पंजाब) येथे आयोजित ८८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या समारोप प्रसंगी नांदेड येथील स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठात गुरुगोविंदसिंग अध्यासन सुरू करण्याचे आश्वासन देऊन पंजाब व महाराष्ट्राची मैत्री घट्ट करण्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल या राज्याच्या दृष्टीने ठरलेल्या महत्त्वाच्या घटना.**



दयानंद कांबळे

नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात गुरुगोविंदसिंग अध्यासन सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी संत नामदेवांची कर्मभूमी पंजाबमधील गुरुदासपूर जिल्ह्यातील घुमान येथील ८८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या समारोप सोहळ्यात केली. ७५० वर्षांपूर्वी महाराष्ट्र आणि पंजाब राज्याच्या सुरू झालेल्या नात्याला घुमान येथील साहित्य संमेलनाने लकाकी मिळाल्याच्या भावनाही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केल्या. म्हणूनच साहित्य संमलेनाच्या व्यासपीठावरून मुख्यमंत्र्यांनी केलेल्या या घोषणेमुळे पंजाब आणि महाराष्ट्राचे नातेवृद्धींगत होण्याच्या दिशेने हा हृद्य सोहळा ठरला.

मुख्यमंत्र्यांनी 'वाहि गुरुजी का खालसा वाहि गुरुजी की फतह, श्री गुरुग्रंथ साहिब विच जिथे छे गुरु साहिबांना.' अशा पंजाबी भाषेत भाषणाला सुरुवात करताच उपस्थित पंजाबी व मराठी साहित्यप्रेमींनी टाळ्या वाजवून मुख्यमंत्र्यांना उभे राहून अभिवादन केले. या पुढे नगरपालिका क्षेत्रात नगरपालिकेतर्फे बांधण्यात येणाऱ्या गाळ्यांपैकी १ गाळा मराठी पुस्तकांसाठी राखीव ठेवण्यात येणार असल्याचे जाहीर केले. या साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी पंजाबचे मुख्यमंत्री प्रकाश सिंग बादल यांनी अमृतसर गुरुनानक विद्यापीठात संत नामदेव अध्यसन सुरू करण्याची घोषणा केली होती.

डिजीटायजेशन युगाशी जुळताना मानवी संवेदना, हुंकार जिवित ठेवण्याचे आव्हान पेलण्याच्या ताकदीचा आविष्कार व्हावा, त्यासाठी प्रत्येक मराठी माणसाने मराठीला ज्ञानभाषा बनविण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी उपस्थितांना केले. नव्या युगाचे आव्हान स्वीकारून नव्या पिढीला जोडण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज ही त्यांनी बोलून दाखवली. पुढील वर्षी पंजाबी साहित्य संमेलन महाराष्ट्रात घ्यावे असे जाहीर निमंत्रण देत त्यास राज्य सरकार पूर्ण मदत करेल, असे आश्वासनही मुख्यमंत्र्यांनी दिले.




# ज्ञानपीठकारांचा सन्मान



"'पुरस्कार स्वीकारल्यानंतर जबाबदारी जास्त वाढली आहे. भारतीय साहित्यातील सर्वोच्च पुरस्कार जसा सुखावून जातो तसाच तो जबाबदारीची आठवणही करून देतो, ही जाणीव ठेवत मी मानवतेसाठी लिखाण करीन आणि योग्य तेच लिहीन.'

**डॉ. भालचंद्र नेमाडे**

**'कोसला'कार** म्हणून ओळख असलेले सुप्रसिद्ध लेखक व समीक्षक डॉ. भालचंद्र नेमाडे यांना २५ एप्रिल रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते साहित्यिक योगदानासाठी भारतीय साहित्यातील सर्वोच्च ज्ञानपीठ पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

नवी दिल्ली येथील संसद ग्रंथालयाच्या बालयोगी सभागृहात भारतीय ज्ञानपीठ संस्थेच्यावतीने आयोजित एका समारंभात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना डॉ. नेमाडे यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्र, गुजरात आणि मध्यप्रदेश राज्याच्या सीमेवर असलेल्या आपल्या जन्मगावातून त्यांच्यावर झालेल्या साहित्यिक संस्कारापासून ते नोकरी, लेखन आणि संशोधन अशा विषयांतून मिळत गेलेले ज्ञान व सृजनशील लिखाण यावर प्रकाश टाकला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणात विविध उदाहरणांतून देशाच्या विकासात साहित्याचे महत्त्व अधोरेखित केले. तंत्रज्ञान व विज्ञानाच्या युगात डॉ. नेमाडेंनी वैविध्यपूर्ण लिखाण करून भावी पिढीला अक्षरलेणे दिले आहे, अशा शब्दात त्यांनी डॉ. नेमाडे यांचा गौरव केला.

### समृद्ध साहित्यसंपदा

डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी मराठी साहित्य समृद्ध करण्यात मोठे योगदान दिले आहे. कोसला, बिढार, जरीला, झूल, हिंदू-जगण्याची एक समृद्ध अडगळ या त्यांच्या कादंबऱ्यांनी मराठीच्या वैभवात भर घातली. प्रचंड वाचनीय ठरलेल्या त्यांच्या कोसला या कादंबरीमुळे त्यांना कोसलाकार म्हणून ओळखले जाते. शिवाय देखणी, मेलडी या कवितासंग्रहांतून त्यांनी आपल्यातील सृजनशील कवीची ओळख करून दिली आहे. टीकास्वयंवर, तुकाराम, मुलाखती आणि साहित्याची भाषा हे त्यांचे समीक्षाग्रंथ प्रसिद्ध आहेत.

## गतिमान न्यायव्यवस्था

केंद्रीय विधी मंत्रालयाच्या वतीने येथील विज्ञान भवनात आयोजित मुख्यमंत्री आणि न्यायाधीशांच्या परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याची बाजू मांडताना राज्यातील प्रलंबित खटले गतीने निकाली काढण्यासाठी न्यायव्यवस्था गतीमान करण्यात येईल, असे आश्वासन दिले. या परिषेदेस पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित होते. आश्वासन पूर्ण करण्याकरिता उचलण्यात येणाऱ्या महत्त्वाच्या पावलांबाबत माहिती देताना मुख्यमंत्र्यांनी राज्यातील न्यायव्यवस्था सुधारण्यासाठी दंडाधिकाऱ्यांपासून जिल्हाधीशांपर्यंत १७९ पदे तसेच कर्मचाऱ्यांची ७५४ पदे निर्माण करण्यात येतील, उच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या ७५ वरून ९४ पर्यंत वाढविण्यासाठी आवश्यक आर्थिक तरतुदी आणि पायाभूत सुविधांना मंजुरी देण्यात येईल, जिल्हा न्यायालयाच्या अधिकारात २५ लाखांपर्यंतचे कज्जे येतात ती मर्यादा १ कोटी रुपयांपर्यंत वाढविण्याचा



**न्यायाधीशांच्या परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराजसिंग चव्हाण**

निर्णय नुकताच राज्याच्या मंत्रिमंडळाने घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

❒ ❒

# दिलखुलास अर्थसंकल्प

**२०१५-१६ या आर्थिक वर्षाचा राज्याचा अर्थसंकल्प विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात नुकताच मांडण्यात आला. या अर्थसंकल्पातील तरतुदींविषयी तसेच राज्याच्या वनसंपदेचे संरक्षण आणि संवर्धन यासाठी कोणते अभिनव उपक्रम राबवण्यात येत आहेत, याविषयी दिलखुलास कार्यक्रमात राज्याचे वित्त व नियोजन आणि वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रसारित झालेल्या मुलाखतीचा हा सारांश...**






अर्थसंकल्पाविषयी आपली भूमिका मांडताना श्री. मुनगंटीवार म्हणाले, अर्थमंत्री या नात्याने आणि महाराष्ट्राचा नागरिक या नात्याने मला सांगताना आनंद होत आहे की, अर्थसंकल्प तयार करण्याच्या पद्धतीत प्रथमच आमूलाग्र बदल करण्यात आला. अर्थसंकल्प मांडताना एका सामान्य व्यक्तीसमोर जे प्रश्न असतात त्याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला. चांदा ते बांदा असे जे महाराष्ट्राचे वर्णन केले जाते त्या चांद्यातल्या एका सामान्य व्यक्तीने अर्थसंकल्प मांडला. आदिवासी, नक्षलग्रस्त, कुपोषण, दरडोई उत्पन्नात घट, बेरोजगारी हेच प्रश्न प्रातिनिधिक स्वरूपात संपूर्ण राज्यापुढे असल्यामुळे अर्थसंकल्प मांडतांना सर्व राज्यातील आमदार, खासदार, मंत्री यांना सूचना करण्याचे आवाहनही केले होते. पत्रकार, फेसबूक, इंटरनेट, वेबसाइट, वर्तमानपत्र इ. माध्यमांतून सर्वसामान्यांकडून आलेल्या तरतुदींच्या संदर्भात सूचनांचे स्वागत केले. व्हॉट्सॲपच्या माध्यमातून आयएएस अधिकाऱ्यांनीदेखील सूचना पाठविल्या. या सूचना लक्षात घेऊन १३८ दिवसांत राज्याच्या सर्व लोकांचे प्रश्न समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला गेला.

राज्याचा विकास आणि प्रगती ज्या प्रमाणात होणे आवश्यक होती, त्याप्रमाणात आतापर्यंत होऊ शकली नाही. यापूर्वीच्या अर्थसंकल्पातील सर्व त्रुटी, दोष दूर करत राज्याला प्रगतीच्या वाटेवर नेण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पात करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना सहानुभूतीपेक्षा संधीची गरज आहे. त्यामुळे कृषीसाठी भरीव तरतूद केली आहे.

राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालाविषयी सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले, दरवर्षी राज्याच्या आर्थिक प्रगतीची माहिती आर्थिक पाहणी अहवालाच्या माध्यमातून दिली जाते आणि ही माहिती जाणून घेण्याचा राज्यातील जनतेचा अधिकार आहे. याबरोबरच राज्याची दशा आणि दिशा काय असणार आहेत याविषयी तसेच राज्याचे स्थूल उत्पन्न, दरडोई उत्पन्न, रोजगार निर्मिती, उद्योग विस्तार इत्यादी बाबी आर्थिक पाहणी अहवालाच्या माध्यमातून मांडल्या जातात.

'मेक इन महाराष्ट्र' विषयी बोलताना ते म्हणाले, नवीन उद्योगांचे स्वागत आणि जुन्या उद्योगांचे बळकटीकरण करण्याचा प्रयत्न अर्थसंकल्पात केला आहे. शेतकऱ्यांसाठी पाणी हा महत्त्वाचा प्रश्न असल्याने जलयुक्त शिवार हा उपक्रम पूर्ण करण्याचे नियोजन तसेच नवीन वीज पंपाच्या जोडणीबरोबरच पायाभूत सुविधा पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

पर्यटन, सिंचनाबाबत बोलताना ते म्हणाले, पर्यटनाला माझ्या दृष्टिकोनातून खूप महत्त्व आहे. कारण जेव्हा आपण १० लाख खर्च करतो तेव्हा त्यात १३ लोकांना रोजगार मिळतो. तसेच पर्यटन क्षेत्रामध्ये १० लाख खर्च करतो तेव्हा ४३ लोकांना रोजगार मिळतो. यामुळेच पर्यटन व्यवसायाला विकासाच्या प्रगतिपथावर नेण्याचा शासनाचा मानस आहे. वनसंपदेचेही रक्षण के ले जाणार आहे. तर सिंचन विभागाच्या काही योजना आणि प्रकल्प एका वर्षात पूर्ण करणाऱ्यांना १०० टक्के निधी वाटप तसेच दोन वर्षात पूर्ण करण्यासाठी अर्धा निधी वर्षाप्रमाणे देण्याचे प्रयत्न आहेत. याशिवाय कृषी प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी बचतगटांना साहाय्य केले जाणार आहे. कौशल्य विकास कार्यक्रमातून रोजगार उपलब्ध व्हावे यासाठी लघु उद्योग, ग्रामउद्योग, कुटिरोद्योगांकरिता वर्धा येथे प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात येत आहे. संपूर्ण राज्याचा सर्वांगीण विकास डोळ्यासमोर ठेवून अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे, याचा विश्वास या मुलाखतीतून मिळाला.

**यंदाच्या अर्थसंकल्पात कृषी आणि ग्रामविकासासाठी पायाभूत सुविधा तयार करण्यावर शासन भर देत आहे. शेतकरी, महिला, उद्योजक आणि तरुण अशा सर्व घटकांचा विचार यात करण्यात आला आहे. ग्रामीण आणि शहरी भाग असा सुयोग्य समतोलही या अर्थसंकल्पात साधण्यात आला असून राज्याच्या अर्थव्यवस्थेला निश्चितपणे गती प्राप्त होईल.**
**- सुधीर मुनगंटीवार, वित्त व नियोजन मंत्री**

**– मीरा ढास**

## सात शतके लोकप्रियतेची...

# महती मराठी रंगभूमीची

**शासनाच्या विविध योजना आणि धोरणांबरोबरच समाजातील विविधांगी विषयांना स्पर्श करीत त्यांना व्यासपीठ मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण काम माहिती व जनसंपर्क महासंचालनालयनिर्मित 'जय महाराष्ट्र' या कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात येते. एप्रिल महिन्यात या कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रेक्षकांसाठी विविध विषयांच्या तज्ज्ञांना आमंत्रित करण्यात आले होते. या माहितीपूर्ण कार्यक्रमांचा लेखाजोखा...**

जय महाराष्ट्र या कार्यक्रमात यावेळी 'खगोलशास्त्रातील संधी' या विषयावर नेहरू तारांगणचे संचालक अरविंद परांजपे, अंधत्व निवारण सप्ताहानिमित्त राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त डॉ. कल्पना खराडे, जागतिक रंगभूमी दिनानिमित्त मुंबई विद्यापीठाचे नाट्यशास्त्र विभागप्रमुख शफाअत खान, महाराष्ट्राच्या जडणघडणीत राष्ट्रीय विमुक्त आणि भटक्या जमाती आयोगाचे योगदान या विषयावर आयोगाचे राष्ट्रीय अध्यक्ष भिकूजी इदाते, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांची पूर्वतयारी या विषयावर राज्य निवडणूक आयुक्त जे. एस. सहारिया, आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन दलाची कामगिरी या विषयावर अग्निशमन सेवा संचालनालयाचे सल्लागार एम. व्ही. देशमुख, वन विभागाचे सचिव विकास खारगे, प्रसिद्ध उद्योजिका कल्पना सरोज यांना निमंत्रित करण्यात आले होते. या कार्यक्रमांपैकी मुंबई विद्यापीठाचे नाट्यशास्त्र विभागप्रमुख शफाअत खान आणि राष्ट्रीय विमुक्त आणि भटक्या जमाती आयोगाचे राष्ट्रीय अध्यक्ष भिकूजी इदाते यांच्या 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमातील मुलाखतींचा हा थोडक्यात सारांश...

जागतिक रंगभूमी दिनाभोवती गुंफलेल्या 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात जागतिक रंगभूमी तसेच मराठी रंगभूमीविषयीची माहिती, परस्परसंबंध याविषयीची माहिती शफाअत खान यांनी दिली. जगभरात २७ मार्चला जागतिक रंगभूमी दिन साजरा केला जातो. तर महाराष्ट्रातही मराठी रंगभूमी दिन साजरा केला जातो. देशपातळीवर मात्र कुठलाही रंगभूमी दिन साजरा केला जात नाही. गतवर्षी महारंग परिषद मुंबईत झाली होती. मुंबई विद्यापीठाच्या ॲकॅडमी ऑफ थिएटर आर्टस्‌ने ही परिषद भरवली होती. या परिषदेसाठी देशभरातील विविध भाषेतील नाट्यकर्मी एकत्र आले होते. त्यावेळी हा मुद्दा त्यांच्यासमोर मांडल्याचे शफाअत खान यांनी एका प्रश्नाच्या उत्तरादरम्यान सांगितले.

ब्रिटिश नाटकांचा प्रभाव हा भारतीय रंगभूमीवर पडल्याचे पाहायला मिळते. विशेषत: शेक्सपिअरच्या नाटकांचा प्रभाव हा मराठी रंगभूमीवर दिसून आला आहे. त्यात शेक्सपिअरच्या नाटकांच्या रचनेपासून ते नाट्यतंत्रापर्यंत हा प्रभाव पाहायला मिळाला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील किर्लोस्करांच्या 'संगीत सौभद्र' या नाटकाच्या रचनेतही इंग्रजीचा प्रभाव पाहायला मिळाला, असे शफाअत खान म्हणाले.



गेल्या ५० वर्षांहून अधिक काळापासून राज्य शासनाकडून राज्य नाट्यस्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. या स्पर्धेचे त्यांनी कौतुक केले.

राज्यातील अनेक गावातील नाट्यकर्मी हे वर्षभर केवळ या नाट्यस्पर्धांचीच तयारी करीत असल्याचे शफाअत खान यांनी विशेषत्वाने नमूद केले. यावेळी अनेक गाजलेली नाटके त्यातील कलाकार व महाराष्ट्रात ही कला समृद्ध करणाऱ्या नाट्यकर्मींबद्दल त्यांनी गौरवोद्‌गार काढले. यावेळी घाशीराम कोतवालपासून अजब न्याय वर्तुळाचा, हयवदन या नाट्यप्रयोगांचे पाश्चात्त्य रंगभूमीवर झालेले प्रयोग व त्याला मिळालेला प्रतिसाद त्यांनी अधोरेखित केला.

### प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाची ओळख

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लढा दिला. अलीकडेच या महामानवाची जयंती १४ एप्रिल रोजी देशभरात उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात राष्ट्रीय विमुक्त आणि भटक्या जमाती आयोगाचे राष्ट्रीय अध्यक्ष भिकू इदाते यांना आमंत्रित करण्यात आले होते.

महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंतीनिमित्त जय महाराष्ट्र कार्यक्रमादरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनचरित्रावर इदाते यांनी प्रकाश टाकला. त्यांच्या आयुष्यात आलेल्या अनेक प्रसंगांची माहिती त्यांनी दिली. आजच्या परिस्थितीतही बाबासाहेबांचा संघर्ष कसा प्रेरणादायी आहे हे अनेक प्रसंगांवरून त्यांनी पटवून दिले. याबरोबरच राष्ट्रीय विमुक्त आणि भटक्या जमाती आयोगाविषयीची माहितीही त्यांनी कार्यक्रमादरम्यान दिली.

**– अतुल पांडे**



# महान्यूज : स्मार्ट सुसंवाद

**महाराष्ट्रातील सरकारी नोकरी शोधणाऱ्या युवकांना नोकरी शोधा हे सदर म्हणजे मार्गदर्शकच आहे. या सदरातील जाहिरातीचा स्रोत काय असेल, या सदराच्या निर्मितीची संकल्पना कोणाची असेल असे अनेक प्रश्न या वेब पोर्टलला भेट देणाऱ्या प्रत्येकाला पडत असतील. परंतु हे शक्य होते ते एका टीमवर्कमुळे. राज्यातील सर्व वर्तमानपत्रे वाचून व विविध विभागाच्या संकेतस्थळांना भेट देऊन खात्रीशीर माहिती घेऊन ती अपलोड केली जाते. एकाचवेळी महाराष्ट्रातील सर्व शासकीय पदभरतीच्या जाहिरातींची थोडक्यात पण हवी असणारी माहिती येथे मिळते. महाराष्ट्रातील इयत्ता चौथी पास/नापास ते विविध शाखांच्या पदवीधरांनाही शासनाच्या सेवेत येण्याची संधी असते. त्यामुळे ही माहिती गोळा करणे जनसेवेचा आनंद देते.**

आजच्या माहिती तंत्रज्ञान युगात माहितीची देवाणघेवाण तत्काळ स्वरूपात होते. यासाठी सोशल मीडियाचा वापर करून हवी ती माहिती मिळवणे सोपे झाले आहे. विविध ॲप्सच्या माध्यमातून मोबाइलवरही आपण माहिती घेत असतो. विविध घडामोडीच्या बातम्यांसाठी विविध चॅनेल्स, वर्तमानपत्रे यांच्यात स्पर्धा चालू आहे. ही स्पर्धा सोशल मीडियाच्या वापरामुळे जास्तच तीव्र झाली आहे. पण यामुळे शंभर टक्के खात्रीशीर माहिती मिळेल, अशी परिस्थिती नाही. पण महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयांतर्गत असलेल्या 'महान्यूज'या वेब पोर्टलने खात्रीशीर बातमी देण्याचे व्रत जोपासले आहे.

महान्यूज या वेब पोर्टलमधील मुख्य बातमी, मंत्रालय, बातम्यातील महाराष्ट्र, यशकथा, योजना, फर्स्ट पर्सन, लोकराज्य, वाचावे असे काही, जय महाराष्ट्र, दिलखुलास, नेट-भेट, नोकरी शोधा, छायाचित्र दालन, चित्रफीत दालन अशा विविध सदरांच्या माध्यमांतून दररोज अद्ययावत अशी खात्रीशीर माहिती देण्याचे कार्य चालू असते. अर्थसंकल्पीय अधिवेशन २०१५ च्या कामकाजाचे वृत्त देण्यासाठी वृत्त आणि कामकाज असे दोन विभाग करण्यात आले होते. वृत्त या विभागामधून विधानमंडळामधील अधिवेशनाच्या काळामध्ये झालेले विविध कार्यक्रम व इतर वृत्ताची माहिती देण्यात आली. तर कामकाज या विभागात विधानसभा व विधान परिषदेतील कामकाजाच्या बातम्या प्रसिद्ध करण्यात आल्या. जानेवारी २०१५ पासून राज्यामध्ये सुरू करण्यात आलेल्या जलयुक्त शिवार अभियानाच्या सर्व स्तरातील बातम्यांना प्राधान्याने प्रसिद्धी देण्यात येत आहे. राज्य शासनाच्या प्रमुख उपक्रमांना प्रसिद्धी देणे आणि अशा योजना लोकाभिमुख करणे हे कार्य या वेब पोर्टलचे मुख्य उद्दिष्ट आहे.

'नोकरी शोधा' या सदराला सर्वात जास्त नेटीझन्स भेट देतात. या सदरामध्ये महाराष्ट्रातील जिल्हापरिषद, जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस दल, विविध खात्यांच्या अभियानांतर्गत, विविध विभागाच्या तसेच केंद्रीय व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्यावतीने करण्यात येणाऱ्या भरतीच्या जाहिरातीची थोडक्यात पण महत्त्वाची पदनिहाय माहिती व त्या त्या विभागाच्या संकेतस्थळांची माहिती देण्यात येते. नोव्हेंबर ते मार्च २०१५ अखेरपर्यंत एक लाख दहा हजार ५८२ जागांसाठीची माहिती देण्यात आली व हे कार्य अखंडपणे सुरू आहे.

शासन व जनता यांच्यामधील महत्त्वाचा सेतू म्हणून 'महान्यूज' या वेब पोर्टलकडे पाहिले जाते, आणि ती जबाबदारी पार पाडण्याचे मोलाचे कार्य महान्यूज टीम करते. विभागाच्या सचिव मनीषा म्हैसकर-पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेले महान्यूज हे वेब पोर्टल शासन आणि जनता यांच्यामधील खऱ्या अर्थाने सेतू आहे.

**- गजानन पाटील**


❐ ❐



# 'गेट वे ऑफ इंडिया'वर
# लोकराज्य झळकला

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाच्या निमित्ताने १३ एप्रिल रोजी गेट वे ऑफ इंडिया येथे आयोजित कार्यक्रमात लोकराज्य एप्रिल महिन्याच्या अंकाचे प्रकाशन करण्यात आले. या अंकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्वावर आधारित विशेष लेखांचा समावेश करण्यात आला आहे.**

एका बाजूला अरबी महासागर आणि दुसऱ्या बाजुला जनसागर अशा पार्श्वभूमीवर लोकराज्यच्या एप्रिल महिन्याच्या अंकाचे प्रकाशन झाले. निमित्त होते, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती कार्यक्रमाचे. १३ एप्रिल रोजी त्यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग व प्रजासत्ताक भारत संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने गेट वे ऑफ इंडिया येथे एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




याच कार्यक्रमात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विशेष लेख असलेल्या 'लोकराज्य एप्रिल २०१५' या अंकाचे प्रकाशन करण्याची सूचना सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले यांनी केली होती. त्यामुळे त्यांच्याच हस्ते गेट वे ऑफ इंडिया येथे आयोजित कार्यक्रमात अंकाचे प्रकाशन करण्यात आले. या अंकाच्या माध्यमातून या महामानवाला जयंतीच्या पूर्वसंध्येला राज्य शासनातर्फे अभिवादन करण्यात आले.

हा अंक तयार करताना वेगळेपण जपण्यात आले आहे. या अंकामध्ये डॉ. आंबेडकर यांच्या कर्तृत्वाच्या विविध पैलूंचे दर्शन घडविणाऱ्या अभिवादन महामानवाला, घटनेचे शिल्पकार, नवे प्रेरणास्थान, परिवर्तनाचा मंत्र, कर विकासोन्मुख हवेत, महिलांचे कैवारी, युगपुरुषाच्या आठवणी, बाबासाहेबांची तैलचित्रे इत्यादी लेखांचा समावेश करण्यात आला आहे.

डॉ. रूपा कुलकर्णी-बोधी, डॉ. प्रदीप आगलावे, प्रा. शैलेश घोंगडे, मिलींद मानकर, डॉ. सरोज आगलावे या मान्यवरांनी हे लेख लिहिले आहेत. या अंकाला गेल्या महिनाभरात वाचकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे.

### पुढील वर्ष सामाजिक न्याय वर्ष

या प्रकाशन सोहळ्यावेळी बोलताना सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री राजकुमार बडोले यांनी २०१५-१६ हे वर्ष शासनातर्फे सामाजिक न्याय वर्ष म्हणून साजरे करण्यात येईल, असे प्रतिपादन केले. बाबासाहेबांवरील या अंकाचे आंबेडकरी विचारधारेशी जुळलेल्या जनसागरापुढे होत असलेल्या प्रकाशनापेक्षा आनंदाचा क्षण काय असू शकतो. कार्यक्रमाला उपस्थित माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक चंद्रशेखर ओक यांनी यावेळी व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांना अंकाबद्दल माहिती दिली. व्यासपीठावर सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव उज्ज्वल उके,




समाज कल्याण आयुक्त रणजित सिंह देओल, अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त डॉ. हर्षदीप कांबळे, प्रादेशिक उपायुक्त यशवंत मोरे, मुंबई शहरच्या साहाय्यक आयुक्त श्रीमती शेरे, मुंबई उपनगरचे साहाय्यक आयुक्त अविनाश देवसटवार, आयकर आयुक्त सुब्बचन रामसाहेब, तसेच प्रजासत्ताक भारत संघटनेचे अमोल मडामे माहिती व जनसंपर्क विभागाचे संचालक देवेंद्र भुजबळ व लोकराज्य टीम उपस्थित होती.

**- प्रवीण टाके**




**टेकसॅव्ही असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या विकासाच्या अनुषंगाने अनेक महत्त्वाचे निर्णय गेल्या सहा महिन्यात घेतले आहेत. या निर्णयांची माहिती ते तत्काळ ट्विटरद्वारे प्रसृत करतात. गतिमान आणि पारदर्शक विकासासाठी त्यांची आत्यंतिक तळमळ या ट्विटसमधून दिसून येते. गेल्या महिनाभरातील त्यांच्या काही ट्विटसचा हा आढावा.**

**इस्रायल दौऱ्यात उद्योगपतीच्या भेटीनंतर..**

I'm thankful to 100 Indian and Israel industries for showing great interest in @makeinindia through @MakeInMaha.

**नेपाळमध्ये झालेल्या भूकंपानंतर तातडीने वैद्यकीय पथक नेपाळला पाठवण्याचा निर्णय घेतल्यानंतर..**

4 medical teams and medicines from Maharashtra set to leave tomorrow morning, for serving in quake affected area.

**ज्येष्ठ गायक कुमार सानू आणि शंकर महादेवन यांच्या सत्कारानंतर..**

Felicitated singers Shri Kumar Sanu & Shri Shankar Mahadevan. My best wishes to them for even greater success.

**सचिन तेंडुलकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना..**

Wishing The Cricket Legend, Bharat Ratna Sachin Tendulkar a Very Happy Birthday!

**महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी अधिकाऱ्यांची खास बैठक घेतल्यानंतर..**

In a review meeting with secretaries, yesterday, directed to prepare a comprehensive policy soon to stop farmers suicide

**घरांबाबत राज्यातील जनतेला पुन्हा एकदा आश्वासित करताना..**

We are working hard for housing for all. By 2022 no one in Maharashtra will be homeless. (-At NAREDCO Conclave.)

**मुंबई विकास आराखड्याबाबत शासनाची भूमिका विशद करताना..**

State decides to direct BMC to take into consideration the suggestions & objections by citizens & make new DP in next 4 months.

**देशाच्या अर्थव्यवस्थेत महाराष्ट्राचा वाटा विशद करताना..**

Maharashtra contributes 15% of National GDP; 30%of FDI flow coming to India; 30% to entire exports of India. This is the power of Maharashtra.

## आमिर खानच्या सामाजिक जाणिवांचे कौतुक

Met @aamir_khan today, happy to see his knowledge on several social issues, his ideas & eagerness to solve them.



**वसंत व्याख्यानमालेत उद्घाटनाचे व्याख्यान दिल्यानंतर..**

Spoke on the 'Future Development of Maharashtra' at the prestigious Vasant Vyakhyanmala at Tilak Mandir Pune.

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त श्रद्धांजली वाहताना..**



Salutations to the Father of Indian Constitution, A Visionary, Bharatratna Dr. Babasaheb Ambedkar on His Birth Anniversary!

**महात्मा जोतिबा फुले यांना जयंतीनिमित्त श्रद्धांजली वाहताना..**

My Salutations to the Great Social Reformer Mahatma Jyotiba Phule on His Birth Anniversary!


Announced Rs 2000 crore interest free loan for sugar factories & 20% interim rise to sugarcane workers.



सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे निर्मित
शासन आणि जनता
यांच्यात संवाद दृढ करणारे...
सर्वत्र : सर्वोत्तम
लोकराज्य
४ लाख खप
४० लाख वाचक
ऐकायलाच हवा
दिलखुलास
संवाद...
@ २२६४
لوک راجیہ
उर्दू लोकराज्य
जय महाराष्ट्र
लाखो दर्शकांची थेट-भेट घडवून देणारे...
नाबाद...७५१ भाग
बातमी खात्रीची
माहिती प्रगतीची
वेध भविष्याचा
महा न्यूज
@ १ कोटी ६० लाख
MAHARASHTRA
Ahead
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
https://dgipr.maharashtra.gov.in
माध्यमे संवादाची : जनतेच्या विश्वासाची

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 18th to 24th May 2015
Date of Publication : 10th of every Month

# प्रतिबिंब बदलत्या महाराष्ट्राचे...




वार्षिक वर्गणी रु.१००

- जाणकारांचे लेख
- यशस्वितांच्या कथा
- तज्ज्ञांच्या मुलाखती
- उपयुक्त सूचना

संग्राह्य विशेषांक :
एखाद्या विषयाचा सर्वांगीण आढावा घेणारे

आज आणि उद्यासाठीही
लोकराज्य

प्रति/ TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक चंद्रशेखर ओक, महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : चंद्रशेखर ओक